म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय नाटक
दा. क्र. २०००८

# सूर राहू दे

IRBK-0120008
IRBK-0120008

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

12 JAN 1984

JAN 1984

3 FEB 1984

6 FEB 1984

20 MAR 1984

17 APR 1984

18 AUG 1984

( क्र. मा. प. )

५०००-१२-८२

नाटक
20008
2019083

# सूर राहू दे

# सूर राहू दे

शं. ना. नवरे

IRBK-0120008

मॅजेस्टिक बुक स्टॉल

पहिली आवृत्ती :
शतक महोत्सवी प्रयोग :
११ मार्च १९७३

दुसरी आवृत्ती :
जानेवारी १९७७

तिसरी आवृत्ती :
मार्च १९८३

प्रकाशक :
केशव विष्णु कोठावळे
मॅजेस्टिक बुक स्टॉल
गिरगाव नाका, मुंबई ४

मुद्रक :
अ. के. कोठावळे
ॐ मुद्रणालय
२५० अ, शनिवार पेठ
पुणे ३०.

छायाचित्र :
राजदत्त
मुखपृष्ठ : मांडणी
अरुण घाटे

मूल्य बारा रुपये

नाट्य परीक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी प्रमाणपत्र क्रमांक डी. आर्. एम्. ६०५।७२ दि. ४–४–१९७२ खाली या नाटकाला मंजुरी दिली आहे.

महत्त्वाची जाणीव : या नाटकाचे पुनर्मुद्रण, प्रयोग, रूपांतर इत्यादी सर्वाधिकार सौ. अंजली नवरे, 'सौमित्र' डोंबिवली (पश्चिम), जि. ठाणे यांचेकडे आहेत. प्रयोग करण्यापूर्वी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास नैर्बंधिक इलाज केला जाईल.

तत्त्वांनाच परमेश्वर मानणारे
ती. ना. स. श्रीखंडे
आणि
ती. सौ. कमलाबाई श्रीखंडे
यांना आदरपूर्वक

ऑगस्ट '७१ मध्ये श्री. म. वा. देसाई (सध्याचे मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त) यांच्याबरोबर चांदा जिल्ह्याच्या खेडोपाडी फिरण्याची संधी अचानक लाभली आणि त्या भागातून फिरताना या नाटकाची कथावस्तू मला सुचली. तिकडून आल्यानंतर 'अभिजात'चे अनंत काणे, प्रभाकर मोने, नंदकुमार रावते यांच्यापाशी मी ही कल्पना बोलून दाखवली आणि 'अभिजात' साठी हे नाटक लिहिण्याचे ठरले. माझ्या 'मंजू....मंजू' या नाटकाच्या प्रयोगासाठी मी आणि त्या नाटकाचा नायक सतीश दुभाषी पुण्याला जात असताना गप्पांच्या ओघात मी ही गोष्ट सांगितली आणि सतीश उत्स्फूर्तपणे म्हणाला, 'या नाटकातल्या डॉक्टरची भूमिका मला करायची आहे.' त्याने मला काही सूचनाही केल्या. मित्रवर्य प्रभाकर मोने याने एस्. एस्. सी. ला वाऱ्या करणाऱ्या कंपौंडरचे पात्र सुचवले. नाटक मनातल्या मनात आकार घेऊ लागले. प्रत्यक्ष लेखन सुरू झाल्यावर अनंत काणे आणि नंदकुमार रावते यांच्याशी वारंवार चर्चा होऊ लागल्या. प्रत्येक प्रसंग, प्रत्येक संवाद नेमके रूप घेऊ लागला. नाटकाच्या यशात यांचा फार मोठा भाग आहे. तिसऱ्या अंकात एका ठिकाणी आम्ही अडलो आणि वामन शेळकरने मुक्या बेलाला स्वप्नदृश्यात बोलायला लावण्याची कल्पना झटकन् सुचवली. बघता बघता नाटक लिहून पूर्ण झाले. आपल्या तत्त्वांना परमेश्वर मानणारा या नाटकातला डॉक्टर रेखाटताना माझ्या नजरेसमोर मला वडलांच्या जागी असणारे माझे मेहुणे ती. दादासाहेब श्रीखंडे आणि त्यांचा कित्ता गिरवणारे त्यांचे दोन सुपुत्र—एंजिनिअर नीलकंठ आणि सर्जन किशोर—यांच्या प्रतिमा सतत होत्या. नायकाचे नाव म्हणूनच डॉक्टर नीलकंठ ठेवले गेले.

नेपथ्यकार, पडद्यापुढील व पडद्यामागील सर्व कलावंत यांनी कष्टांकडे न बघता हे नाटक जिद्दीने उभे केले. त्या प्रत्येकाचा आणि आज या नाटकाचे शंभर प्रयोग होण्याचे भाग्य आम्हांला लाभू देणाऱ्या रसिक प्रेक्षकांचा मी ऋणी आहे.

११ मार्च '७३ — शं. ना. नवरे

'गोविंद धाम'
डोंबिवली (पश्चिम)
जिल्हा ठाणे

या नाटकाचा पहिला प्रयोग मंगळवार दि. १४ मार्च १९७२ रोजी सायंकाळी पावणेसात वाजता साहित्य संघ मंदिर, गिरगाव, मुंबई येथे 'अभिजात' या संस्थेने सादर केला.

पात्रयोजना

मोहन : अशोक पाटोळे। बेला : पुष्पा भोसले। नीलकंठ : सतीश दुभाषी अरुंधती : लता कर्नाटकी। गंगाधर : शंकर घाणेकर। शेखर : विभाकर विवलकर। बुन्दू : राजू सावंत। छबूराव : वामन शेळकर। फर्नांडिस : शशिकांत राजाध्यक्ष

दिग्दर्शक : नंदकुमार रावते

नेपथ्य व प्रकाश-योजना : बाबा पार्सेकर। ध्वनिसंकलन : राजा देसाई। रंगभूषा : शांताराम विचारे। निर्मिती-व्यवस्था : विजय पितळे, वामन शेळकर। रंगमंच व्यवस्था :-अरुण भागवत, काशिनाथ समगिसकर। व्यवस्थापन : विजय देसाई।

# अंक पहिला । दृश्य पहिले


शाखा
क्र. 20008 ता. 28/10/83
वि. नाटक


पडदा उघडला जातो. डॉ. नीलकंठच्या खेडेगावी घरातली मधली खोली दिसते. नीटनेटकी, स्वच्छ. भिंतीवर कुणाही देशभक्ताचे, पुढाऱ्याचे चित्र नाही. दारावर फक्त गणपतीची तसबीर. फर्निचर अगदी मोजके. वेळ सकाळची.

नीलकंठचा भाचा मोहन टेबलाजवळ काही फायली तपासत आहे. मोहन पंचविशीजवळचा. उत्साही तरुण. गावच्या शाळेतला शिक्षक.

आतून बेला येते. ही मुकी आहे. तरुण. दिसायला अत्यंत आकर्षक. ती न्हालेली आहे. खिडकीजवळ जाऊन ती आपले मोकळे केस झटकते. मोहनच्या फायलीवर पाणी उडते. तो बघतो. बेला त्याच्याकडे बघून स्मित करते. पुढे होऊन फायलीवर उडालेले पाण्याचे थेंब आपल्या पदराने पुसू लागते. मोहन गोंधळतो. त्याला भान राहात नाही. तो झटकन बेलाचे हात धरतो. तिला जवळ ओढतो.

याच क्षणी डॉ. नीलकंठ बाहेरून येतो. डॉ. नीलकंठ चाळिशीजवळचा. साध्या स्वच्छ पोशाखात. चेहऱ्यावर करारीपणा. हे दृश्य पाहून तो ओरडतो—'मोहन!'

रंगमंचावर क्षणभर काळोख.

पुन्हा प्रकाश येतो तेव्हा रंगमंचावर मोहन, डॉ. नीलकंठ आणि नीलकंठाची पत्नी अरुंधती दिसतात. अरुंधती पस्तिशीजवळ. दिसायला चांगली. घरातले वातावरण गंभीर झालेले.

नीलकंठ : मोहन, तुला सुचतोय काही मार्ग ?

मोहन : पण बापूमामा–

नीलकंठ : मला फक्त तुला सुचलेला मार्ग ऐकायचा आहे. सुचलाय् काही मार्ग ? (मोहन गप्प) मला सुचला आहे. तू बेलाशी लग्न करणं हा एकच मार्ग आहे. अरुंधती, खरं तर तूच हा मार्ग सुचवायला हवा होतास !

अरुंधती : मोहनच्या हातून अशी काही चूक झालेली नाहीए, की त्याचं प्रायश्चित्त–

नीलकंठ : प्रायश्चित्तात शिक्षेचा अंश असतो. ही शिक्षा नाहीए.

अरुंधती : म्हटलं तर शिक्षाच आहे ! खेडेगावातल्या अनाथ आणि त्यातून मुक्या मुलीशी संसार करायचा म्हणजे–

नीलकंठ : तिला बोलता येत नाही त्याचा फायदा घेऊन मोहननं तिच्याशी लगट करणं—

मोहन : बापूमामा, मला फायदा घ्यायचा नव्हता.

नीलकंठ : तुझं प्रेम जडलंय बेलावर ? (मोहन मानेनं नाही सांगतो.) फक्त प्रेमात केलेली गोष्टच फायद्या–तोट्याबाहेरची असते. प्रेमाशिवाय होणारी प्रत्येक गोष्ट एकाला फायद्याची आणि दुसऱ्याला तोट्याची असते !

अरुंधती : हे पाहा, त्या पोरीच्या आयुष्याचा नाश होईल अशी काही गोष्ट घडलेली नाहीए.

नीलकंठ : गोष्ट घडली नाही, पण घडणार होती. मी अचानक आलो नसतो तर–

मोहन : मला क्षणिक मोह झाला. चूक झालीय् ती इतकीच आहे. आज दोन वर्षं मी तुमच्याबरोबर सारे मोह सोडून या खेड्यात कार्य करतोय. माझ्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थिनींना विचारा.

नीलकंठ : मला कुणाला विचारण्याची गरज पडत नाही, तुला माहीत आहे. शाळेत तुझ्या हातून काही घडलं असतं तर तुला त्याच क्षणी मी हाकललं असतं.

मोहन : माझ्यामुळं बेलावर कोणतंही संकट आलेलं नाहीए.

अरुंधती : (मोहनला) थांब. (नीलकंठला) तुम्ही डॉक्टर आहात, हवी तर बेलाची तपासणी करून–

मोहन : बापूमामा, मला अजूनसुद्धा हातून फार मोठं पाप झालेलं वाटत नाहीए.

नीलकंठ : पापाचं माप ते करणाऱ्यानं ठरवायचं नसतं.

अरुंधती : त्या पोरटीनंच काही केलं नसेल कशावरून? पुरुषाचंच नेहमी चुकतं असं थोडंच आहे? स्त्रीदेखील—

मोहन : त्यातून तुम्हांला हे पाप वाटत असेल तर त्याबद्दल मी तुमची क्षमा मागतो.

नीलकंठ : मग तुला जे पाप वाटत नाहीए ते मला वाटतंय, म्हणून मीसुद्धा तुझी क्षमा मागितली पाहिजे! पण मोहन, खेड्यातला न्यायाचा तराजू शहरी न्यायाच्या तराजूपेक्षा फार नाजूक असतो. या एवढ्याशा वाटणाऱ्या गोष्टीचा परिणाम आपल्या कर्तव्यावर व्हायचा. आज नुसती कुजबूज आहे. उद्या प्रत्येक तोंड हीच गोष्ट विचारत राहील, मनातल्या शंका खात्रीचा मुखवटा घेऊन फिरतील. मोहन, आपण करतोय् हे कार्य नाहीए, हे एक कर्तव्य आहे. कार्य म्हटलं की कर्तव्याला अहंकार येतो. शहर सोडून आपण खेड्यात आलो आहोत ही भावना जोपर्यंत जागृत आहे तोंपर्यंत शहरात जाण्याचा मोहसुद्धा जागृत राहणार. आपलं वास्तव्याचं ठिकाण हेच ठरलंय. जसे काही आपण इथंच जन्मलो, इथंच राहात आलोय्. मोहन, ही एकच जाणीव आपल्या भोवताली वावरणाऱ्यांना आपल्याजवळ आणणार आहे. आपण उपकार करत नाही आहोत इथल्या लोकांवर. त्यांच्यासाठी काही करायला मिळतं हे त्यांचेच उपकार आहेत आपल्यावर.

मोहन : बापूमामा, मघाचे माझे शब्द विसरा. मला मनापासून इथं राहायचं आहे. शहरात गुदमरणारा माझा जीव या वातावरणातच श्वासोच्छ्वास

करायला लागला. तिकडे शहरात पैसा होता, चैन होती, पण समाधान नव्हतं. कारण कर्तव्याशिवायच जगणं चाललं होतं माझं. आता इथं माझी शाळा आहे, माझे विद्यार्थी आहेत. इथल्या माणसांचा लळा लागलाय मला. कुणाच्या घरात कोण कशानं आजारी आहे हे जसं डॉक्टर म्हणून तुम्हाला माहीत आहे तसंच कुणाच्या घरात काय अडचणी आहेत त्या मला आपोआप पाठ झाल्या आहेत. त्या अडचणी मला माझ्याच वाटताहेत.

[ मोहन बोलत असतानाच बेला येते. तिच्या हातात सकाळची डाक आहे. अरुंधती उत्सुकतेने पुढे जाऊन बेलाच्या हातातली डाक घेते. पत्रे पाहू लागते. ]

नीलकंठ : डाक आज लौकर आली, बेला ?

बेला : (हो.)

मोहन : बापूमामा, मला इथं राहायचं आहे.

नीलकंठ : पण इथं राहायला माझी अट आहे आता, मोहन.

[ नीलकंठ बेलाकडे बघतो. मोहन क्षणभर गप्प राहातो. ]

मोहन : बेलाशी लग्न. हीच अट ना ?

[ बेला उत्सुकतेने मोहनकडे पाहते. अरुंधती पुन्हा डाक बघते. तिची काहीशी निराशा झालीय्. ]

नीलकंठ : हो.

मोहन : माझ्या इथल्या कर्तव्याशी या गोष्टीचा संबंध आहे ?

अरुंधती : (नीलकंठजवळ डाक देता देता मोहनला) थोडक्यात, तू इथून निघून जावंस असा निर्णय दिलाय तुझ्या मामांनी.

मोहन : बापूमामा—

नीलकंठ : अरुंधती, या निर्णयाचे शब्द माझ्या जिभेला पेलवत नव्हते माझा निर्णय तूच सांगितलास आणि माझी सुटका केलीस. मोहन, न्यायाला, तत्त्वाला डोळे नसतात. निर्णय देताना तू माझा भाचा आहेस हे पाहू शकलो नाही मी. बेलाशी लग्न करायचं नसेल तर तू इथं राहणं मला चालणार नाही.

मोहन : बापूमामा, माझं कर्तव्य मला इथं राहायला सांगतंय, पण तुमची अट बरोबर असतानासुद्धा मला ती स्वीकारता येत नाही. माझं स्वतःचं असं काही आहे ना ? बेलाकडे पत्नी म्हणून बघणं मला शक्य नाही. शिवाय, मला आणि तिलासुद्धा यातून सुख लाभेल असं या क्षणी तरी माझं मन सांगत नाही. चुकीचे असले तरी स्वतःचे काही नियम असतात. त्या चुकीचं प्रायश्चित्त घ्यावं लागेल हे धोकतच आपण त्या नियमांचे गुलाम राहिलेलो असतो. मी जातोय् बापूमामा.

नीलकंठ : सुखी हो !

[ मोहन बाहेर पडतो. बेला दुःख आवरता आवरता आतल्या खोलीत जाते. नीलकंठ डाक बघू लागतो. क्षणभराने मोहन गेला त्या दिशेने पाहून आवंढा गिळतो. ]

अरुंधती : सुखी हो म्हणालात, तो खरंच सुखी होईल. मुंबईत चांगली नोकरी मिळेल, इथं राहायचा मूर्खपणा पार विसरून जाईल तो. हं, सुरुवातीला वाटते गोडी काही दिवस—

नीलकंठ : ( डाक वाचता वाचताच ) का ? इथं येऊन मला पाच वर्षंच झाली, पण वाटतं, कालच आलो मी. अरुंधती, दिवसेंदिवस गोडी वाढतेच आहे माझी.

अरुंधती : ( चिडते ) मी माझ्या अनुभवाचं बोलले.

नीलकंठ : माणसानं आपल्याच अनुभवाचं बोलावं. मी कसं म्हटलं ? मला पाच वर्षं झाली, माझी गोडी वाढतेय् . मी 'आपली' असं नाही म्हटलं. आणि शिवाय असं आहे अरुंधती, मनापासून असलं की पहिल्यापासून शेवटपर्यंत गोडी वाढत राहाते. मनापासून नसलं, पण मनात आणलं की आधी कडू वाटणारी गोष्ट नंतर गोडसुद्धा वाटायला लागते.

अरुंधती : मी स्पष्ट बोलले—

नीलकंठ : आणि मीसुद्धा स्पष्टच बोललो. आता आपला बुन्दू. तीन व पुण्याला आहे ना शिकायला ? पण तो रमतच नाहीए शहरात. तो इथंच रमणार आयुष्यभर !

अरुंधती : म्हणजे आयुष्यभर त्याला कसली करमणूक नको.

नीलकंठ : वेडे! इथल्यासारखी करमणूक कुठंच नसेल. निसर्गानं सहस्र हातांनी सौंदर्य उधळलंय इथं. सारं आयुष्य उघड्या माळावर काढलं तरी कंटाळा यायचा नाही. आकाशाचे बदलणारे रंग, चारी बाजूंनी हिरव्या रंगाच्या असंख्य छटा दाखवणारी झाडं, सतत वाहणारी नदी, डोंगर, दऱ्याखोरी.... आयुष्य कमी पडेल इतकी करमणूक आहे ठायीठायी. कधी कवितेचं पुस्तक घेऊन बाहेर अंगणात झाडाखाली बसावं. फांद्यावर झोके घेणाऱ्या पाखरांच्या शिळेवर त्यांच्याच चालीनं कविता वाचाव्यात.

अरुंधती : (कुत्सितपणे) बिचारा मोहन या गमतीला मुकला म्हणायचा! इतकं मोठं पाप घडलं हातून—

नीलकंठ : मोहन आहे इथं?

अरुंधती : (न कळून) नाही. का?

नीलकंठ : माणसाच्या पाठीमागं बोलत नाही मी कधी! तो गेला. जाताना आपला विषय घेऊन गेला. ठेवून गेला फक्त चांगल्या गोष्टींच्या आठवणी. (हातातली डाक बघत) बुन्दूचं पत्र आलंय ना?

अरुंधती : आलंय?

नीलकंठ : मग तू पाहिलंस काय डाकेत? (अरुंधती दचकते.) थांब. आधी मी वाचतो पत्र. (पत्र वाचू लागतो. हसतो.)

अरुंधती : इतकं काय म्हणतोय् पत्रात?

नीलकंठ : वाचू?

अरुंधती : हूं.

नीलकंठ : (पत्र वाचतो) मला किनई, पुण्यात राहायचा जाम कंटाळा आलाय्. रोज वाटतं, शाळा सुटली की दप्तर घेऊन थेट गावाला धावत सुटावं. थोडंसं काही खावं आणि जावं पुस्तक घेऊन माळावर मस्तपैकी. (हसतो. पत्र वाचतो. मग-) अरुंधती, पुढल्या वर्षी त्याला इथल्याच शाळेत घालायचं.

अरुंधती : मला ते चालणार नाही.

नीलकंठ : (पत्र वाचतो.) पुढल्या वर्षी मी पुण्याला मुळीच राहणार नाही. (हसतो) दोन विरुद्ध एक मतानं तुझा ठराव नामंजूर!

[ गंगाधर येतो. पंचविशीजवळचा. हातात पत्र. गंगाधर नीलकंठचा कंपौंडर. एस् . एस् . सी. च्या वाऱ्या करणारा]

नीलकंठ : काय रे गंगाधर, कुणी पेशंट—

गंगाधर : नाही. एक आनंदाची बातमी आहे. म्हटलं, ताबडतोब सांगावी.

नीलकंठ : सांग ना.

गंगाधर : बोर्डाकडून माझा अर्ज मंजूर झाला. ताबडतोब उत्तर पाठवलं हं बोर्डानं. आता मी टायपिंग घेणार आहे.

नीलकंठ : म्हणजे कोणता विषय सोडलास तू येत्या परीक्षेला ?

गंगाधर : इंग्रजी ! खरं तर इंग्रजीचा आता काय उपयोग आहे ?

नीलकंठ : (गमतीने) हो नं.

गंगाधर : एकदा मनात होतं टेलरिंग घ्यावं.

अरुंधती : म्हणजे यंदा टायपिंग जमलं नाही तर पुढल्या वेळी तू टेलरिंग घेणार.

गंगाधर : ते सोडा. ताबडतोब टायपिंगची अशी प्रॅक्टिस सुरू करतो.

नीलकंठ : (हसत) गेल्या वेळी इंग्रजीची केलीस, तशीच ना ?

गंगाधर : त्याचं म्हणजे काय आहे, इंग्रजीला शब्द पाठ करायचे आणि शिवाय ताबडतोब त्यांचं स्पेलिंग. टायपिंगचं तसं नाही. इकडे बघायचं आणि तिकडे टक्–टक्–टक्–टक् टाईप करायचं.

नीलकंठ : ताबडतोब.

गंगाधर : येस् . ताबडतोब. आमच्या वडलांची शिकवण होती. 'ता' वरून माणसाला 'ताबडतोब' ची आठवण झाली पाहिजे ! सत्यं–शिवं–सुंदरम्' सारखे त्यांचे तीन शब्द होते. त्वरित–तत्काळ–ताबडतोब.

अरुंधती : पण तू एस्. एस्. सी. ला काही पास होत नाही आहेस ताबडतोब.

गंगाधर : ताबडतोब कबूल ! पण प्रत्येक खेपेला ताबडतोब पुढल्या परीक्षेची तयारी करतो की नाही ?

अरुंधती : आता येईल ती कितवी वारी ?

गंगाधर : नववी. हॅः सुरुवातीलाच हे टायपिंग वगैरे घेतलं असतं ना–इंग्रजी-

गणितासारखे चक्रम विषय सोडून, तर आज हा गंगाधर पदवीधर झाला असता !

नीलकंठ : पण हे विषय घेतले तर कॉलेजात जाता येत नाही ना ?

अरुंधती : (कुत्सितपणे) खेड्यात कॉलेजं निघताहेत ना हल्ली ! गेला असता तसल्याच एखाद्या कॉलेजात.

गंगाधर : बाकी बोर्डावर आपण खूश आहोत. हा विषय नको, तावडतोब बदलून दुसरा घ्या. तो नको, तिसरा घ्या. त्यामुळं काय होतं—

नीलकंठ : काय होतं ?

गंगाधर : पहिली गोष्ट. कितीही वाऱ्या केल्या तरी कंटाळा येत नाही. दुसरी गोष्ट. प्रत्येक वारीला फ्रेश वाटतं. पूर्वी मॅट्रिकला तेच तेच विषय असत. आणि वर्षातून एक परीक्षा. दोन वाऱ्या झाल्या की माणूस तावडतोब नाद सोडायचा. आज आठ वाऱ्या झाल्या माझ्या. फक्त चार वर्षांत. अजून मला नवव्या वारीचा उत्साह आहे. बापू, बोर्डाचं पत्र आलं तेव्हा एक कल्पना सुचली.

नीलकंठ : काय ?

गंगाधर : आपल्या दवाखान्यासाठी तावडतोब एक टाइपरायटर हवा.

नीलकंठ : दवाखान्याला टाइपरायटर कशाला ?

गंगाधर : दवाखान्याला म्हणजे तावडतोब दवाखान्यालाच नाही काही. पण आपल्या शाळेचा, लायब्ररीचा पत्रव्यवहार, गावच्या एकेक कामाबद्दल सरकारदरबारी अर्ज, माझे बोर्डाकडे अर्ज....(नीलकंठ हसतो) टाईप केलं की तावडतोब इंप्रेशन पडतं. मी कंपौंडरचं काम करतोच, जोडीला टायपिंग करत जाईन.

नीलकंठ : छान आहे कल्पना ! अरुंधती, आपल्याला हे सुचलं नाही हं कधी. शिवाय गंगाधर, टाइपरायटर आला की तुला प्रॅक्टिस करायलासुद्धा उपयोगी पडेल.

गंगाधर : म्हणूनच तावडतोब ही कल्पना काढली. (नीलकंठ हसतो) नाही, म्हणजे....

नीलकंठ : तुझ्यासाठी म्हणून आणू ! झालं ? पास मात्र व्हायला हवं.

अरुंधती : नाही तर सहा महिन्यांनी दवाखान्यासाठी शिवणाचं मशीन आणावं

लागेल. तुझ्या टेलरिंगसाठी.

गंगाधर : पण टायपिंग घेण्याची कल्पना कशी आहे ?

नीलकंठ : चांगली आहे.

गंगाधर : ठरवलंच होतं. बोर्डाकडून मान्यता आल्याशिवाय सांगायचं नाही. (अरुंधती हसते.) बापू म्हणतात तसं. माणसाला लहान का असेना ध्येय हवं ! माझं आपलं हे ध्येय आहे. आयुष्यात एस् . एस् . सी. व्हायचं.

अरुंधती : आणि मग पुढं ?

गंगाधर : ताबडतोब दुसरं ध्येय शोधायचं !

नीलकंठ : हे पाहा गंगाधर, पुढल्या आठवड्यात मी पुण्याला जाईन बुन्दूकडे. तिकडे गेलो की टाइपरायटरची ऑर्डर नोंदवून ठेवतो...ताबडतोब.

गंगाधर : बापू, एस् . एस् . सी. झाल्याशिवाय माणसाला किंमत येत नाही. नाही ?

नीलकंठ : माणसाला किंमत येते— तो आपलं कर्तव्य कसं पार पाडतो त्यावर. तू कंपौंडर म्हणून आपल्या दवाखान्यात डोळ्यांत तेल घालून व्यवस्थित काम करतोएस. तुझी किंमत डॉक्टरइतकीच आहे. तू एस् . एस् . सी. हो, नाही तर होऊ नकोस.

गंगाधर : पण मी बघतो ना होऊन. (नीलकंठ हसतो) ताई, तुम्हांला काय वाटतं ?

अरुंधती : (नीलकंठकडे बघत) खरं सांगू ? तू एस् . एस् . सी. होऊन शहरात कुठं तरी कायमची नोकरी मिळवावीस आणि—

गंगाधर : चूक. एस् . एस् . सी. झालो तरी आता राहायचं इथंच. बापू कसे राहिले ? नाही तर मुंबईला दोन वर्षांत छान जम बसवला होता. पण ध्येय ! ताबडतोब मुंबई सोडली आणि इथं आले.

अरुंधती : कशाला ?

गंगाधर : माझे वडील म्हणत, दिव्यांच्या रोषणाईत आणखी दिवा लावण्यापेक्षा तो अंधारात लावावा. अंधाराला आनंद होतो त्यापेक्षा दिव्याला जास्त होतो.

अरुंधती : तुझे वडील काय करायचे रे ?

गंगाधर : ते इलेक्ट्रिक वायरमन होते ! नेकीनं चाकरी केली, आम्हां मुलांना

चांगली शिकवणूक दिली.... बिचारे शॉकनं गेले.

अरुंधती : शॉकनं?

गंगाधर : हो. मी पहिल्या फटक्यात एस्. एस्. सी. झालो नाही ना, त्याचा शॉक घेतला त्यांनी.

अरुंधती : तुझ्या डोक्यात खेडेगावात राहायचं, इथल्या लोकांची सेवा करायची ही असली खुळं आहेत ना, म्हणून तुला यश मिळत नाही. दुसरं काही नाही.

नीलकंठ : ( अरुंधतीच्या बोलण्याकडे मुद्दाम दुर्लक्ष करत ) गंगाधर, आपली कामं आता वाढली आहेत. पहिली गोष्ट म्हणजे आपल्या शाळेच्या बोर्डावर नोटिस लिहायची– 'आजपासून मोठ्यांचे वर्ग रात्री भरतील.' नोटिस लिहिताना—

गंगाधर : ताबडतोब कळलं! अक्षर मोठं आणि सुवाच्य.

नीलकंठ : शाबास! दुसरे वर्ग सकाळी भरतील.

गंगाधर : टाईम बदलायचं कारण?

नीलकंठ : मला स्वतःला वर्ग घ्यावे लागणार आहेत.

गंगाधर : म्हणजे डॉक्टर–कम्–टीचर–कम्—

नीलकंठ : कम् सगळं काही! खेड्यात हीच मौज असते, आता यंदा नवीन मौज म्हणजे आपली आधुनिक शेतीची योजना. मग डॉक्टर–कम्–फार्मर.

गंगाधर : मी ताबडतोब कंपौंडर कम्–टायपिस्ट! बापू, या 'कम्'चं स्पेलिंग सी ओ एम् ई नाही ना?

नीलकंठ : सी यू एम.

गंगाधर : हां. म्हणजे टायपिंग करताना लक्षात ठेवलं पाहिजे! वा! एल् आय एफ ई लाईफची ही मजा शहरात नाही. नाही!

[ अरुंधती रागाने आत जाते. ]

गंगाधर : आपले मोहनराव गेले म्हणून तुम्ही....

नीलकंठ : हो! जाताना तुला भेटला असेल.

गंगाधर : माझे शिक्षकच ना? भेटले की.

नीलकंठ : माझ्यासाठी काही निरोप?

गंगाधर : अंहं. 'जातो रे गंगाधर' म्हणताहेत तर घशात आवंढाच आला तावडतोब.

नीलकंठ : (गंगाधरच्या 'ताबडतोब' शब्दावर खोटे हसू आणण्याचा विफल प्रयत्न करत) गंगाधर, जवळ येणाऱ्या प्रत्येकावर माझा जीव जडतो ते चुकतं का रे ?

गंगाधर : बापू, मला काही अक्कल आहे का तुमच्या प्रश्नाचं उत्तर द्यायला ? आठ वेळा एस्. एस्. सी. ला बसतोय. आणखी किती वेळा बसावं लागणार आहे—

नीलकंठ : या जवळच्या माणसांना जा सांगताना इतका राग येतो स्वतःचा ! पण तत्त्वांना माणसाहून श्रेष्ठत्व दिलंय ना ? जा सांगावं लागतं आणि मनाचा एकेक कोपरा मुकाट्यानं रडत ठेवावा लागतो. जगातली सगळ्यांत नाजूक गोष्ट म्हणजे जिवंत मन ! (गहिवरतो.)

गंगाधर : (नीलकंठला मूडमध्ये आणण्यासाठी) आणि सगळ्यात कठीण गोष्ट म्हणजे ताबडतोब एस्. एस्. सी. होणं !

[बाहेर जीप थांबल्याचा आवाज. गंगाधर दाराशी जातो. दारात ऐटबाज पोषाखात शेखर उभा.]

शेखर : गुड मॉर्निंग.

गंगाधर : नमस्कार.

शेखर : आपण डॉक्टर नीलकंठ ?

गंगाधर : अंहः कंपौंडर गंगाधर. (नीलकंठ पुढे होतो) हे डॉक्टर नीलकंठ.

शेखर : मी शेखर मिरजकर. विल्सन अॅन्ड ग्रे फर्म.

नीलकंठ : या या – गंगाधर, यांना खुर्ची घे.

गंगाधर : आपल्या जिल्हा–पत्रात फोटो आला होता ना यांचा ? मी ताबडतोब ओळखलं. विल्सन ॲन्ड ग्रे. रासायनिक खतांचे उत्पादक. ती खते वापरून आधुनिक शेतीची प्रात्यक्षिकं.

शेखर : कमाल आहे ! मी यायच्या आधीच माझी सगळी माहिती जमवलेली दिसतेय.

गंगाधर : माझं आपलं असं आहे. पेपर आला की ताबडतोब पहिल्या ओळी-

पासून शेवटच्या ओळीपर्यंत वाचन. ताबडतोब मनन. आमच्या जिल्ह्यात तुम्ही येणार, जवळपासच्या खेड्यात प्रात्यक्षिकं दाखवणार. ताबडतोब कंप्लीट माहिती. हां, आता ‘ प्रात्यक्षिकं ’ म्हणजे काय विचाराल तर—

शेखर : ( लक्ष आत आहे. ) हे मिस्टर ताबडतोब दिसतात.

गंगाधर : ( लाजतो ) आपण आपला प्रयत्न करायचा.

शेखर : ओळखलं की नाही ताबडतोब ?

[ सगळे हसतात. ]

नीलकंठ : बसा. ( शेखर बसतो ) माझी माहिती म्हणजे– इथं येऊन मला पाच एक वर्षं झाली. माझ्या आजोबांची इथं थोडीशी जमीन होती. मुंबईत माझी प्रॅक्टिस चांगली होती, पण मन इथं अडकलं होतं. मग आलो इकडे. शिकलेली माणसं इथं आली, त्यांचा इंटरेस्ट दिसला की गावकऱ्यांनासुद्धा हुरूप येतो.

शेखर : इथं घरात तुम्ही एकटेच की—

नीलकंठ : ( हसतो ) थांबा हं. अरुंधती—

[ गंगाधर दाराशी जातो. हाक मारतो– ‘ ताई ’. अरुंधती बाहेर येते. शेखरकडे बघत राहाते. सावरून घेते. ]

नीलकंठ : ही माझी पत्नी अरुंधती. आणि अरुंधती, हे शेखर मिरजकर.

गंगाधर : ऑफ विल्सन अँड ग्रे फर्म ! एफ्. आय्. आर. एम्. ( अरुंधती आणि शेखर ‘ नमस्ते ’ करतात. )

नीलकंठ : ( अरुंधतीला ) बस ना. ( अरुंधती बसते ) हं, तर मी इथली माहिती सांगत होतो. इथं आता केवढा तरी पसारा वाढवलाय आम्ही. दवाखाना आहेच माझा. शिवाय शाळा, एक छोटीशी लायब्ररी, खेळांच्या सोयी.... आता आधुनिक शेतीची ही योजना.

शेखर : या गोष्टींना पैसा लागतो तो सरकारकडून मिळतो ?

नीलकंठ : अजून मागावा लागला नाही. माझ्या नावावर वडलांनी खूप ठेवलंय.

शेखर : पुढंमागं एम्. एल्. ए., मंत्रीबिंत्री होण्याचा विचार—

नीलकंठ : मुळीच नाही. हा पसारा व्यवस्थित लावायचा. माझा मुलगा मोठा होऊन तो संभाळायला लागला की त्याच्या हवाली करायचा, बस्स.

शेखर : कल्पना छान आहे.

नीलकंठ : मग बोलूच आपण. ( हाक मारतो ) बेला—

[ गंगाधर ' बेला ' म्हणत आत जातो. ]

नीलकंठ : ( शेखर अरुंधतीकडे बघत असताना ) पत्र मिळालं होतं ना वेळेवर ?

शेखर : ( किंचित गोंधळून ) अं ? हो.... हो. अगदी वेळेवर मिळालं. ( गंगाधर बाहेर येतो. )

नीलकंठ : गंगाधरकडे टाकायला दिलं होतं म्हणजे ताबडतोब ते इथं तरी पोस्टात पडणार. ( अरुंधती दचकते. )

नीलकंठ : अचानक पेपरमध्ये तुमचा पत्ता मिळाला—

गंगाधर : पत्रात लिहिलंच होतं !

शेखर : हो. म्हटलं, उत्तर पाठवून ते पोचायच्या आधीच आपण स्वतः जावं.

गंगाधर : ताई, हे बरं झालं की नाही ताबडतोब ?

अरुंधती : हो.... हो ना.

नीलकंठ : मला खात्री होतीच, तुम्ही लगेच याल.

गंगाधर : जिल्ह्याला येणारच होता—

शेखर : ( विषय बदलण्यासाठी खिडकीबाहेर बघतो. ) या गतिशून्य वातावरणाचा कधी कंटाळा.... म्हणजे, मुंबईतल्या माणसाला—

नीलकंठ : ( हसत ) पत्रात होतं असं काही लिहिलेलं ? उलट मी पत्रात लिहिलं होतं, सगळ्यांना खेडेगावात राहावंसं वाटण्यासाठी अत्याधुनिक गोष्टी इथं यायला हव्यात.

अरुंधती : ( जरा स्वस्थ होत ) तुम्ही लिहिलं होतं यांना पत्र ?

नीलकंठ : ( हसत ) मग ऐकते आहेस काय इतका वेळ ? अग, असा परीस जिल्ह्याच्या गावी येतोय, त्याला इथं नको बोलवायला ? गंगाधर, आता संध्याकाळी गावकऱ्यांची सभा घेतोय मी. सगळं गाव हां हां म्हणता सोन्यासारखं होईल.

गंगाधर : हां हां म्हणता नाही बापू. ताबडतोब !

शेखर : डॉक्टरसाहेब—

नीलकंठ : मला बापू म्हणतात सगळे.

शेखर : बापू, तुम्ही मला उगाचच परीस–बिरीस म्हणून लाजवता आहा.

नीलकंठ : ठीक आहे. ( अरुंधतीकडे बघत ) अरुंधती, मी त्यांना परीस म्हटलं यात काही–

अरुंधती : ( आता पूर्णपणे स्वस्थ झालेली ) मुळीच चुकलेलं नाही.

नीलकंठ : झालं आता ?

[ हातात पाण्याचे तांब्याभांडे घेऊन बेला येते. ]

शेखर : ( बेलाकडे बघतो ) या कोण ?

नीलकंठ : ही बेला. या गावातलीच आहे. तिला घरचं कुणी नाहीए.

शेखर : ( बेलाला ) तुम्ही काही बोलत नाही.

गंगाधर : तिला बोलता येत नाही. शॉकनं वाचा गेलीय तिची. डी यू एम् बी. डम्ब्.

नीलकंठ : पण घरातली सगळी कामं टापटिपीनं करते.

शेखर : मीटिंग केव्हा–संध्याकाळी ठेवताय् ?

नीलकंठ : हो. का ?

शेखर : म्हणजे रात्री डाकबंगल्यावर पोचता येईल.

अरुंधती : रात्री इतक्या लांब जाणार ?

शेखर : हो. जीप आहे ना. रात्री दहा–अकरापर्यंत डाकबंगल्यावर पोचता येईल. उद्या मुंबई.

नीलकंठ : ओह् ! नो सर. तुम्हांला मी विनंती करणार आहे. तुम्ही आमच्या गावासाठी निदान आठवडा तरी काढला पाहिजे. नुसती एक मीटिंग घेऊन चालणार नाही.

शेखर : पण एक आठवडा म्हणजे—

नीलकंठ : अरुंधती, तूच सांग. हे आठवडाभर मिळाले तर छान होईल की नाही ? मीटिंग म्हणजे नुसतं भेटणं होतं. इथं राहिलात तर प्रत्यक्षात येणाऱ्या अडचणी, इथले प्रश्न–

गंगाधर : ताबडतोब सगळ्यांचा निर्णय घेता येईल.

अरुंधती : हो नं.

शेखर : पण रोज डाकबंगल्यावरून दहाबारा मैल यायचं– जायचं–

गंगाधर : जीप आहे ना! ताबडतोब गेलात, आलात.

शेखर : बघतो विचार करून. ( अरुंधतीकडे बघतो. )

अरुंधती : इतका विचार करायला हवाय?

गंगाधर : शेखरबाबू, तुम्ही गावातच राहिलात तर?

शेखर : गावात कुठं?

नीलकंठ : आत्ता आहात त्याच घरात.

शेखर : पण तुम्हांला उगाच त्रास–

नीलकंठ : अरुंधती, तुला वाटतं यांचा त्रास वाटेल?

अरुंधती : मला तरी नाही वाटणार.

नीलकंठ : ( हसत ) म्हणजे काय मला वाटणार आहे?

अरुंधती : खेडेगावातले प्रॉब्लेम्स समजावून घ्यायचे तर तिथल्या लोकांच्या सहवासातच राहायला हवं.

नीलकंठ : ऐकलंस गंगाधर? मघाशी काय म्हणत होती–

गंगाधर : परिसाचा ताबडतोब परिणाम.

[ गंगाधर आणि नीलकंठ मोकळेपणी हसतात. नीलकंठ उठतो. ]

नीलकंठ : चलो गंगाधर, संध्याकाळच्या मीटिंगची तयारी केली पाहिजे. त्याच्या आधी दवाखान्यात जाऊन–

शेखर : तुम्ही निघताय?

नीलकंठ : तासाभरात येतोच आहे. तुम्ही आता आठवडाभर आहा ना, बोलता येईल मग सवडीनं. अरुंधती, पाहुण्यांना काय हवं नको बघ. पुन्हा जायचं म्हणायला लागले तर–

अरुंधती : त्यांना जाऊ देणार नाही! झालं?

नीलकंठ : बरंय्.

[ नीलकंठ आणि गंगाधर जातात. अरुंधती आणि शेखर

काहीसे अस्वस्थ. चोरट्यासारखे. ]

शेखर : (उठतो) अरुंधती, अरू–

अरुंधती : शेखर, किती वर्षांनी तुझी ही हाक ऐकतेय. आफ्टर निअर्ली टेन इयर्स ! टेन इयर्स ऑफ बोअरडम.

शेखर : ही बेला खेडेगावातली वाटतच नाही. नाही ? दिसायला खूप स्मार्ट आहे. ( अरुंधती डोळे मोठे करते. ) ओ– के, ओ– के....अरुंधती, आधी मला वाटलं, तू मला पत्र पाठवलंस ते....

अरुंधती : वुई विल् टॉक अबाऊट इट आफ्टरवर्ड्स्. लेट धिस डर्टी गर्ल गो. बेला, साहेबांची जीप बाहेर उभी असेल. मुलंबिलं तिथं येऊन खेळतील–

[ बेला समजूतदारपणे बाहेर जाते. ]

शेखर : अरुंधती, आय् वॉज हॅपी टु रिसीव्ह युअर लेटर.

अरुंधती : मी इतकी वाट बघत होते तुझ्या पत्राची !

शेखर : लगेच पाठवणार होतो उत्तर. तर डॉक्टरांचंच पत्र– आमच्याकडे या.

अरुंधती : मी वैतागले होते आणि एवढ्यात नशिबानं इथल्या भुक्कड पेपरात तुझा फोटो आणि माहिती आली.

शेखर : अरू, डॉक्टरांचं पत्र बघून मी चाटच पडलो. आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन.

अरुंधती : हा दुसरा डोळा आत्ता मिळाला हं.

शेखर : म्हणजे ?

अरुंधती : तुला इथंच राहायला ये म्हणाले ना, तेव्हा !

शेखर : पण मी राहाणार नाही हं इथं.

अरुंधती : तू मला सांगतोस ! मला तर भीती वाटली होती हे तुला राहा म्हणाल्यावर तू लगेच कबूल करतोस की काय म्हणून !

शेखर : आता मी शहाणा झालोय.

अरुंधती : केव्हापासून रे ?

शेखर : सांगू ? तू मला नकार दिलास तेव्हापासून !

अरुंधती : फर्गेट इट.

शेखर : इंग्रजीत कशाला बोलतेस ? ती स्मार्ट पोरगी बाहेर गेलीय. ए, मघाशी तू इंग्रजीत बोलायला लागलीस ना तेव्हा मला जुनी गोष्ट आठवली.

अरुंधती : मला देखील ! तुझ्या घरी मी आल्यावर तुझ्या आईच्या देखत. (एकदम) शेखर, तू लग्न केलंस ?

शेखर : तू नकार दिल्यापासून शहाणा झालोय, याचा अर्थ नाही कळला तुला ? अरू, केवळ तुझ्या आठवणीसाठी मी—

[ शेखर प्रेमभराने पुढे होतो इतक्यात— ]

—काळोख

# अंक पहिला । दृश्य दुसरे

वेळ संध्याकाळची. बेला दिवा लावते. शेखर बाहेरून येतो. तिच्या जवळ जाऊन तिच्या तोंडावर सिगारेटचा धूर सोडतो. ती दूर होते.

शेखर : बस ना जरा.

बेला : ( अंऽहं. )

शेखर : आज चार दिवस बघतोय. तुझं सगळं काम घड्याळासारखं चाललेलं असतं. क्षणभर कधी–

बेला : ( कौतुकाने बुजते. )

शेखर : तू मुंबईला आलीस तर कुणीही तुला ठेवून घेईल, कामावर.

बेला : ( नको. )

शेखर : बघ. येतेस का माझ्याबरोबर? उद्या निघतोय् मी.

बेला : ( नको. )

शेखर : का ग?

बेला : ( का असं नाही, नकोच. )

शेखर : तुला इथं पगार मिळत असेल त्याच्या दुप्पट–

बेला : ( इथं पगार नाही घेत मी. )

शेखर : पगार नाही? मग तू चलच मुंबईला. पगार पाहूनच तू चकित होशील. त्यात तू मुकी. तू न मागता तुला बडबडणाऱ्या मोलकरणीपेक्षा

दुप्पट पगार मिळेल. दिसायला तू मोलकरणीपेक्षा सुंदर दिसणार म्हणजे तर—

बेला : (मी जातेच कशी.)

शेखर : अंहः वाईट अर्थानं म्हणत नाहीए मी. आम्ही दुप्पट तिप्पट पीक काढायला खेड्यात जातो– तू तसा पगार काढायला मुंबईला जायचं.

बेला : (नको म्हटलं ना ?)

शेखर : बघ. अजून विचार कर.

बेला : (नाहीच.)

शेखर : बापूंनी तुम्हांला सगळ्यांनाच इथलं वेड लावलंय. पण अरुंधतीला वेड लावायचं काही जमलं नाहीए त्यांना. बापू– कुठं बाहेर गेले आहेत ?

बेला : (हो.)

शेखर : अरुंधती कुठं आहे ?

बेला : (आत आहेत त्या.)

शेखर : अशा वातावरणात राहायला तुला भीती नाही वाटत ?

बेला : (भीती कसली वाटायची ?)

शेखर : म्हणजे समज. कुणी तुझा हात धरला, काही केलं तर तुला ओरडता यायचं नाही, कुणाला धड सांगता यायचं नाही....तुला लिहिता-वाचता येतं ?

बेला : (अंहं :)

शेखर : शिकलीच नाहीस ?

बेला : (नाही.)

शेखर : मग कठीण आहे. कुणीही तुझा गैरफायदा—(तिच्याजवळ जातो.)

बेला : (का ? माझे हे हात आहेत, नखं, दात आहेत—)

शेखर : (घाबरून दूर होत) बरं झालं हं सांगितलंस ते.

बेला : (असं का म्हणालात ?)

शेखर : नाही, विचारलं म्हणजे सहज आली एक शंका.

[ गंगाधर येतो. ]

शेखर : कोण ? मिस्टर तावडतोब ?

गंगाधर : काय बेलाशी बोलताय्?

शेखर : या मुकीशी काय बोलणार? उगाच वेळ घालवायला म्हणून काही तरी—

गंगाधर : अहो, मग ताबडतोब मला नाही का हाक मारायची? मी मोकळाच होतो, वेळ घेऊन. बापू गावात गेलेत. त्या धाकल्याची सून अडलीय तिकडे. बेला, तू ताबडतोब आत जा. मी आहे ना आता इथं? (शेखरला) बोला.

शेखर : (नर्व्हस) तुम्ही बोललात तरी—

गंगाधर : बोलतो. (पोज घेतो.) शेखरबाबू, एस्. एस्. सी. ला बसतोय मी.

शेखर : इतक्या उशिरा?

गंगाधर : अंहं: गेली साडेचार वर्षं बसतोय्....तर 'टायपिंग' घेण्याबद्दल तुमचं काय मत आहे? म्हणजे ओ पी आय एन आय ओ एन. ओपीनियन?

शेखर : टायपिंग उत्तमच.

गंगाधर : की 'टेलरिंग' घ्यावं?

शेखर : टेलरिंगसुद्धा उत्तमच.

गंगाधर : उत्तमच काय? इंग्रजी–गणित काय उत्तम नाहीत? मी विचारतो म्हणजे असं, की हे विषय घेतले तर पुढं कुठं ताबडतोब संधी—–

शेखर : काही हरकत नाही.

गंगाधर : हरकत नसल्याचं पत्र बोर्डाकडून यायचं ते आलंय– मी अशासाठी विचारलं की या विषयात—

शेखर : माफ करा, हे विषय मला येत नाहीत.

गंगाधर : हे उत्तर उत्तम! असो. तुमची बोर्डात ओळख आहे का, ओळख?

शेखर : का? पासबिस करून घ्यायचंय?

गंगाधर : ह्यः! असा आडमार्ग धरला तर बापू ताबडतोब जाब विचारतील.

शेखर : पण त्यांना कुठलं कळायला?

गंगाधर : कुठलं कळायला? हा वारा असतो ना वारा, तो बापूंना ताबडतोब सगळं सांगतो. हत्तीला मैलावरून माणसाचा वास येतो, बापूंना दहा कोसां-वरून दुसऱ्याच्या मनाचा वास येतो. अशी लबाडी करून पास व्हायचं

माझ्या नुसतं मनात आलं तरी बापूंना कळेल.

शेखर : ताबडतोब ?

गंगाधर : ताबडतोबसुद्धा लेट होईल! त्याच्या आधीच कळेल. हां, मी ओळखीचं विचारलं यासाठी की रिझल्ट मला त्याच्या त्या दिवशी मिळेल. इथं रिझल्ट कळायला दोन दिवस जातात.

शेखर : नाही बुवा. आपली ओळख नाही बोर्डात.

गंगाधर : मग हे ताबडतोब तेव्हाच सांगितलं असतंत तर ? नाही हो. ताबडतोबचं महत्त्व जोपर्यंत. आपल्याला कळत नाही, तोपर्यंत आपण असेच मागे राहणार.

शेखर : वा: ! मोठंच तत्त्वज्ञान सांगितलंत.

गंगाधर : वडील ! वडील सांगायचे हे माझे.

शेखर : असं ? वडील काय करायचे तुमचे ?

गंगाधर : ते टाईमकीपर होते. टाईमकीपर–कम्–वायरमन्.

शेखर : कुठं ?

गंगाधर : इथं इंडियातच. (हसतो.) आता तुम्ही बोला.

शेखर : उद्या मी मुंबईला जातोय.

गंगाधर : उद्या करमणार नाही आम्हांला.

शेखर : का ? मी जातोय म्हणून ?

गंगाधर : अंहं. बापू उद्या पुण्याला जाताहेत म्हणून. त्यांचा मुलगा आहे ना तिकडे शिकायला ? त्याला भेटून येणार आहेत.

शेखर : असं ?

गंगाधर : आणि तिकडे ताबडतोब टाइपरायटरची ऑर्डरपण देऊन येणार आहेत. (उठतो) टाइपरायटर म्हटल्यावर ताबडतोब आठवण झाली.

शेखर : कसली ?

गंगाधर : (हसत हसत) पी आर आय व्ही ए टी ई– प्रायव्हेट आहे.

[गंगाधर जातो. क्षणभराने शेखर कंटाळतो. आत बघतो.]

शेखर : अरुंधती––

[ अरुंधती येते. ]

अरुंधती : हाक का मारलीस ?

शेखर : कंटाळा आला म्हणून.

अरुंधती : मी कशी राहते मग इथं ?

शेखर : तू लग्न केलं आहेस डॉक्टरांशी.

अरुंधती : टोमणा कळला तुझा.

शेखर : थँक्यू.

[ क्षणभर विलक्षण शांतता. ]

अरुंधती : असं गप्प बसण्यापेक्षा तू बोल काही. वाट्टेल ते बोल.

शेखर : कशाला ?

अरुंधती : या शिक्षेपेक्षा ती शिक्षा पत्करीन मी.

[ पुन्हा स्तब्धता. ]

अरुंधती : खरंच बोल. एवढ्यात हे आले तर बोलायचं राहील. उद्या तू निघून जाशील आणि मी ? तू बोलणार नसशील तेसुद्धा बोलला असतास असं मनाशी ठरवून आणखी दुःखी होईन. या कोरड्या वाळवंटात वर्षानुवर्षे चालत राहताना ती खंत उराशी बाळगीन.... बोल, बोल तू. कॉलेजात असताना एखादी जरी संध्याकाळ भेटीवाचून गेली, की तू संतापून बोलायचास तसं बोल. आपण यापुढं एकत्र येऊ शकणार नाही, मला विसरून जा, असं मी सांगायला आले, त्या अखेरच्या संध्याकाळी शब्दांचे धगधगते निखारे ओतलेस तसेच पुन्हा एकदा ओत. त्या निखाऱ्यांनी मनाचे कोळसे धगधगून पेटू देत.... तू बोल रे !

शेखर : अरुंधती, तेव्हा मला नकार देताना तू आईवडलांचं नाव पुढं केलंस, पण ते खोटं होतं. नीलकंठाचं स्थळ आल्यावर तू विचार केलास, शेखर नुसता बी. एस्सी. होणार. पुढं त्याला फारसा वाव मिळणार नाही. ( हसतो. अरुंधती आश्चर्याने बघते. ) तेव्हा एकदा माझ्या मनात बी. एस्सी. झाल्यावर शेती करण्याचा विचार आला होता, तर तू किती टिंगल केली होतीस ! पण शेवटी तुझ्या नशिबी.... ( हसतो. ) तेव्हा तू तसा विचार करणं बरोबरच होतं. नीलकंठ हुशार होता, डॉक्टर होता, पैशाचा पाऊस पाडण्याइतकं कर्तृत्व होतं त्याच्याजवळ. त्या पैशाच्या पावसात तू आपलं

प्रेम धुऊन टाकलंस. आयुष्यभर चैनीत राहायला पैसा लागतो, प्रेम पुरत नाही हा स्वार्थी विचार केलास. अजून कॉलेजच्या पायऱ्यांवरील ती संध्याकाळ दिसते मला. तू थंड चेहऱ्यानं मला तुझा निर्णय सांगितलास आणि निघालीस लगेच. लगेच निघण्यात तुझा डाव होता. आपल्याला दुःख असह्य झालंय हे नाटकी पद्धतीनं दाखवायचं आणि मला तुझा स्वार्थीपणा जवळून पाहायला संधी द्यायची नाही... थांब अरुंधती, बोलू नकोस. दैवानं हाती दिलेल्या या विलक्षण भेटीत निदान खोटं तरी बोलू नकोस. सांग, म्हणतोय् हे खरं आहे ना?

अरुंधती : मला नीट आठवत नाही, पण शेखर, तू म्हणतोस तसं असेलही तेव्हा. ( शेखर गप्प. ) गप्प का झालास?

शेखर : ती गोष्ट तुला नीट आठवेपर्यंत थांबतो मी.

अरुंधती : शेखर—

शेखर : शुक्रवार होता. प्रॅक्टिकल होत आलं होतं. तू मला लॅबमधून बाहेर बोलावलंस, तेव्हा तू घड्याळात पाहात होतीस. नंतर लौकर पळण्याची तयारी आधीच करण्यासाठी. तुझ्या साडीचा रंग—

अरुंधती : बस्स शेखर. मला आठवतंय सगळं.

शेखर : थँक्यू. तू नाइलाजावर बोलत होतीस आणि मला फक्त त्यातला स्वार्थच ऐकू येत होता. लॅबमधलं ॲसिड आणून तुझ्या तोंडावर फेकावं असं सारखं वाटत होतं.

अरुंधती : मग का फेकलं नाहीस?

शेखर : तुझा स्वार्थ आज फसलाय म्हणून म्हणते आहेस हे. अरुंधती, ॲसिड फेकण्याची इच्छा दाबत जेवढं टोचता आलं तेवढं टोचून घेतलं मी तुला. तुझा अपमान केला. चूक तुझी होती. तू शब्दांचे सारे निखारे झेललेस आणि तुझ्या लग्नाच्या होमात ठेवलेस.

अरुंधती : मला क्षमा कर, शेखर.

शेखर : लग्नानंतर आठ वर्षांनी तू परवा पत्र लिहिलंस, मला प्रेमाची जुनी साद घातलीस, तेव्हाच तुला मी क्षमा केलीय.

[ क्षणभर शांतता. ]

अरुंधती : खरं सांगायचं तर लग्नानंतरची दोन वर्षं माझी चांगली गेली.

यांची प्रॅक्टिस उत्तम होती. स्वभाव चांगला होता. तुझी आठवण व्हायची अनेकदा, :पण.... अंहः तेवढी तीव्र नव्हती ती. मग एकदा हे म्हणाले, अरुंधती, आपण खेड्यात जाऊन राहायचं आता यापुढं, इथलं सगळं सोडून. तेव्हा मी फारसं मनावर घेतलं नाही. वाटलं होतं, वर्षा-दोन वर्षांत हे कंटाळतील आणि पुन्हा मुंबईला येतील. पण इथं आले त्याच क्षणापासून ते मुंबई विसरले.

शेखर : आणि स्वार्थाला तडा गेला. त्यातून पहिल्या प्रेमाची आठवण तीव्रतेनं व्हायला लागली.

अरुंधती : माझी चूक मला कळली. त्या वेळी मी तुझाच स्वीकार करायला हवा होता. माझा मूर्ख नकार परत घ्यायला हवा होता.

[ पुन्हा शांतता ]

अरुंधती : या वातावरणात हे रमायला लागले. मी ओळखलं, ह्यांच्या अंगात संचारणारा अमाप उत्साह ते माझा उत्साह शोषून खर्चत होते. आमचा छोटा बुन्दू ह्यांच्या पावलावर आपलं पाऊल टाकत होता. तुला मनातलं सांगायचं तर तेव्हापासून बुन्दूबद्दलची माझी मायाही आटायला लागली. त्याचं आयुष्य या रुक्ष वातावरणात जाऊ नये म्हणून मी ह्यांच्या मागं लागून त्याला पुण्याला शिकायला ठेवलं. माझी कोंडी होत गेली आणि क्षणाक्षणाला मी तुला हाक मारायला लागले मदतीसाठी. त्या संध्याकाळची चूक मला दुरुस्त करावीशी वाटायला लागली.

शेखर : अरुंधती, त्याच संध्याकाळी मी शहाणा झालो. तू मला पैशाचं महत्त्व दाखवलंस. स्त्रीची, प्रेमाची किंमत सांगितलीस. अनेक लटपटी करून मी परदेशात गेलो. तुला पश्चात्ताप करायला लावायचा होता मला. वशिल्यानं ही मोठी नोकरी मिळवली. आज मुंबईत कंपनीच्या खर्चानं मी आलिशान फ्लॅटमध्ये राहातोय. रस्त्याला माझं श्रीमंतीचं पाऊल लागू नये म्हणून कंपनीनं मोटार दिलीय मला. माझ्या हुकमाची वाट पाहात नोकर— आणि मला हवी असलेली सारी सुखं हात जोडून उभी राहिलेली पाहातो, तेव्हा तेव्हा तीव्रतेनं तुझी आठवण होत आलीय. माझं हे यश, माझा हा दरारा बघायला तू यावंस म्हणून. तुझं पत्र आलं—

अरुंधती : आणि यांचंही आलं.

शेखर : या मंद वातावरणात तुझी हौस आणि त्यांचा शहरी स्मार्टनेस् थंड झाल्याचं दोन्ही पत्रांनी सांगितलं. अशा संताचं फार तर एखादे वेळी जरासं दर्शन घ्यायचं, तर तुला त्याच्याबरोबरच संसार करावा लागतोय हे वाचलं मी, आणि वाटलं—

अरुंधती : काय वाटलं तुला ?

शेखर : सांगू ? पोटभर हसावंसं वाटलं. आणि मी हसलोसुद्धा. फ्लॅटभर हसलो मी अरू.

[ क्षणभर स्तब्धता ]

शेखर : इथं आलो. तुझं लाइफ पाहिलं—

अरुंधती : अजून हसावंसं वाटतंय तुला ?

शेखर : नाही....नाही अरू.

अरुंधती : तुझ्या सोबतीतले हे चार-सहा दिवस....शेखर, इथं याच दिवसांत मी जगले. जीपमधून तुझ्याबरोबर भटकले. मनाचे कप्पे रिकामे करून बोलले. पुष्कळदा असाच भास व्हायचा, माझं आणि तुझंच लग्न झालंय.

शेखर : आणि आपण खेड्यात आलोय ?

अरुंधती : हो. सुटीतले चार दिवस मजेत घालवायचे म्हणून. पुन्हा मुंबईला नाही तर कुठल्या तरी शहरात आरामात राहायला परत जायचंय आपल्याला.

शेखर : अरुंधती, अरू, तू बोललीस ते खरं मनापासून की—

अरुंधती : मनाच्या तळापासून.

शेखर : अरू—

अरुंधती : काय ?

शेखर : तू खरंच कंटाळली आहेस ?

अरुंधती : हूं.

शेखर : इथल्या वातावरणाला ?

अरुंधती : माणसांनासुद्धा.

शेखर : मग....मग....माझ्याबरोबर उद्या येतेस ?

अरुंधती : येते. (क्षणभराने) तुला आश्चर्य नाही वाटलं ? मी लगेच येते म्हणाले त्याचं ? गेले चार दिवस हा शब्द ओठांवर ठेवून तुझ्याबरोबर फिरतेय— तू हा प्रश्न विचारावास म्हणून. शेखर, शेखर, हा क्षण कधी विसरता येणार नाही मला. मी पुन्हा देऊ का रे उत्तर ? शेखर, मी तुझ्याबरोबर येतेय.

शेखर : सगळं विसरून ?

अरुंधती : हे सगळं विसरून आणि फक्त पहिलं प्रेम आठवून. सारे बंध झुगारण्याची हीच एक वेळ आहे. आज मन कचरलं तर जन्मभर ते रडत राहील. मी येते उद्या तुझ्याबरोबर....आपल्या पहिल्या प्रेमाची शप्पत.

शेखर : व्हॉट अ गुड न्यूज !

[ एवढ्यात बाहेरून नीलकंठ येतो. खूप दमलेला. हातात बॅग. ]

नीलकंठ : अरुंधती, गुड न्यूज. धाकल्याच्या सुनेची सुटका झाली. छान, गुटगुटीत मुलगा झाला. असा झकास शिसवी रंगाचा.

[ अरुंधती आणि शेखर एकमेकांकडे बघतात. ]

नीलकंठ : गुड न्यूज नाही वाटली ही ?

अरुंधती : वाः ! वाटली ना. धाकल्या आनंदात असेल.

नीलकंठ : आनंदात ? अग, नाचायला लागला वेड्यासारखा.

[ क्षणभर शांतता ]

शेखर : इथल्या लोकांना फॅमिली प्लॅनिंगचं महत्त्व सांगितलंय ना ?

नीलकंठ : फक्त जुजबी माहिती दिलीय. इथं वस्ती थोडी आहे, जमीन खूप आहे. प्रत्येक कुटुंबाची इतकी जमीन आहे, ती कसायला त्यांना घरची माणसंच कमी पडतील. हा प्रॉब्लेम त्यांना दोन–तीन पिढ्यांनंतर येईल.

शेखर : पण देशात खायला अन्न नाही—

नीलकंठ : ते पिकवण्यासाठीच इथं माणसांची गरज आहे ! एकच आहे, या लोकांनी शहराकडे धावायचा मोह ठेवता कामा नये.

शेखर : मग त्यांचं दारिद्र्य कधीच संपायचं नाही.

नीलकंठ : दारिद्र्य कशाचं ? दोन वेळा व्यवस्थित खायला अन्न, लज्जारक्षणापुरतं ल्यायला वस्त्र आणि उन्हापावसापासून रक्षण करायला छप्पर. इतकं मिळालं की दारिद्र्य कसलं ? याला श्रीमंती म्हणायचं की झालं.

शेखर : पण माणसाला हौस असते, चैन असते—

नीलकंठ : मला वाटतं, सुख अडत नसावं त्यावाचून. गरजेपेक्षा जास्त पैसा मिळाला की तो पापच विकत घ्यायला बघतो. पाप मग दुःख विकत घेतं, आणि दुःख शेवटी माणसालाच विकत घेतं.

शेखर : इथं तुम्ही इतके रमला आहात, तुमचं खरंच कौतुक वाटतं मला.

नीलकंठ : शेखरबाबू, कौतुक करायचंच असेल तर ते या वास्तूचं करा. अशी गुणी आहे ही वास्तू. सृष्टिसौंदर्य, सुपीक जमीन....सगळे निसर्गनिर्मित निर्मळ आनंद. सूर्याचं घड्याळ आहे, ऋतूंचं कॅलेंडर आहे. पक्ष्यांचं, नदीच्या धावत्या पाण्याचं, खट्याळ वाऱ्यानं खोडी काढली की हळूच हसणाऱ्या झाडांचं संगीत आहे. रंग म्हणाल तर इतके उधळले आहेत दाही दिशांना ! आकाशाचे रंग, मातीचे, दगडांचे रंग, झाडाझुडपांचे, गवतांचे, फुलांचे रंग. रंग तसेच गंध ! रानफुलांचे, रानफळांचे, पहिल्या पाऊसधारात भिजणाऱ्या मातीचे. आत्ता धाकल्याकडे गेलो होतो, त्यांची गुरं–वासरं बघा. पुरुषार्थाचं दर्शन हवं असेल तर त्याचा एकेक खोंड नजरेत साठवून ठेवावा. अरुंधती, नातू बघितल्यावर मी धाकल्याला म्हटलं, धाकल्या, तुझा नातू असा झकास आहे रे– तर काय म्हणावं त्यानं ? म्हणाला, माझ्या खोंडासारखा असेल तरच कौतिक करा बापू. ( हसतो )

शेखर : ( हसत ) तुम्ही अगदी पक्के या मातीत—

नीलकंठ : शेखरबाबू ! तुम्ही माणसासाठी काही करा, तो फेड करीलच असं सांगता येणार नाही. पण तुम्ही या मातीसाठी झिजा. झिजाल त्याच्या दुपटीनं ती पीक देईल.

शेखर : डॉक्टरसाहेब—

नीलकंठ : बापू !

शेखर : सॉरी ! बापू, तुम्हांला कधी असं नाही वाटत ? आज तुम्ही मुंबईत असता तर ऐश्वर्यात लोळला असता ?

नीलकंठ : पण माझ्या मनाला तिथल्या ऐश्वर्यात कधी अशी शांती, असं समाधान मिळालं नसतं. म्हणून तर मी इथं आलो. आणि इथं आलो त्याबद्दल क्षणभरही मला पश्चात्ताप होत नाहीए. शेखरबाबू, तुम्ही शेतीबाबत इतके प्रयोग केले आहेत, या क्षेत्रात नाव केलं आहे. तुम्हांला नाही कधी आकर्षण वाटलं खेड्याचं ?

शेखर : टु बी फ्रँक बापू, भरपूर पगार मिळतोय म्हणून मी या कार्यात रस घेतोय. एखाद्या बँकेत, एखाद्या प्रायव्हेट फर्ममध्ये मला यापेक्षा जास्त पगार मिळाला, तर मी हे कार्य त्याच क्षणी सोडीन.

अरुंधती : कितीही म्हटलं तरी शेवटी पैशाला महत्त्व आहे. उद्या म्हातारपणी उपयोगी पडेल तो पैसाच. पैसा असला की वाटेल ते मिळतं.

नीलकंठ : आज दुकानंच काढली आहेत ना सगळ्या गोष्टींची. जीवनोपयोगी वस्तूंची दुकानं. शिक्षण, ज्ञान, प्रतिष्ठा, तत्त्व, शील, कर्तव्य, आदर, ध्येय, देशभक्ती, प्रेम....साऱ्या गोष्टी बाजारात ठेवल्या आहेत. या गोष्टींच्या गळ्याला तात बसेल अशी लेबलं लावली आहेत. लेबल वाचायचं, पैसा टाकायचा. वस्तू घ्यायची. अमोल आत्मा असणारी माणसासारखी माणसं जिथं बाहुल्यांसारखी विकत मिळताहेत.

अरुंधती : म्हणूनच म्हणते, एकट्या-दुकट्यानं या बाजारावर बहिष्कार टाकला म्हणून बाजार बंद पडत नाही.

नीलकंठ : अरुंधती, एकटेदुकटे एकत्र येऊनच समाज होतो.

शेखर : पण ते एकत्र आले नाहीत तर ?

अरुंधती : मी हेच विचारणार होते. ते एकत्र आले नाहीत—

नीलकंठ : ते एकत्र आले नाहीत म्हणून एखाद्या एकट्याचा व्यवहारही बंद पडत नाही.

शेखर : समजा, तुम्हांला मी मुंबईत फर्स्टक्लास संधी दिली—

अरुंधती : मी घेईन ती.

नीलकंठ : तुला एकटीला घ्यावी लागेल ती. माझी पाठच असेल तिकडे.

अरुंधती : म्हणजे तुम्ही उभं आयुष्य असंच वाळवंटात काढणार आहात ?

नीलकंठ : अर्थात.

अरुंधती : तुम्हाला सुख घ्यायचं नाहीए ?

नीलकंठ : आहे हेच सुख मला खूप आहे.

अरुंधती : पण माझ्या सुखाचा विचार? आपण लग्न केलंय. माझं सुख हे तुमचंही सुख तुम्ही मानलं पाहिजे.

नीलकंठ : मी तुझंच वाक्य म्हणू?—आपण लग्न केलंय, माझं सुख हे तुझंही सुख तू मानलं पाहिजे. (हसतो) तुझ्यासारखं बोलायला गेलो पण गडबडीत राग हरवल्यामुळं तसं ऐटीत नाही बोलता आलं.

शेखर : माफ करा. मी आपलं सहज विचारलं.

नीलकंठ : छे छे! अशा चर्चा नेहमीच चालतात आमच्या. आणि गंमत अशी आहे– अरुंधतीच्या विरोधामुळं माझा उत्साह वाढतच राहतो. हो की नाही? (अरुंधतीकडे बघतो.)

शेखर : मी उद्या संध्याकाळी नाही तर परवा मुंबईला जातोय.

नीलकंठ : उद्या सकाळी आम्ही पुण्याला जायला निघतोय. मुलाला भेटायला. तुम्ही आमच्या बरोबर चलता का? पुण्याहून मग जा मुंबईला.

शेखर : (अरुंधतीकडे बघत मुद्दाम) कल्पना चांगली आहे. (अरुंधती रागावते.)

नीलकंठ : मजेत बोलत जाऊ—

शेखर : पण काय आहे, मला जिल्हा ऑफिसला आधी जावं लागेल.

नीलकंठ : ठीक आहे, तुमचं आधी ठरलं असेल, तर त्यात मी मोडता घालणार नाही. बाकी तुम्ही होता त्याचा एक फायदा झाला.

शेखर : कसला?

नीलकंठ : अरुंधतीचा वेळ चांगला गेला. (दोघे दचकतात.) मी म्हटलं तरी मला कल्पना आहे. तिचा इथं वेळ जात नाही. कंटाळा येतो. माणसामाणसात फरक ठेवलाय ना ईश्वरानं? मला करमतं इथं, तिला नाही करमत. यात चूक नाहीए तिची. पण गंमत अशी आहे, तिच्याशिवाय मला चैन पडत नाही. घरात यावं आणि तिच्या हातच्या चहाच्या घोटानं तिचं अस्तित्व जाणावं, नव्या दिवसाचा नवा उत्साह पदरी बांधावा. याची इतकी सवय झालीय मला–तिला दोन दिवसांसाठी माहेरी पाठवायचंसुद्धा जिवावर येतं. (शेखर अरुंधतीकडे पाहून हसतो.) शहरातल्या माणसांना हे बोलणं अपरिचित वाटेल, पण खेडोपाडी प्रत्येक घरात तुम्हांला हेच ऐका-

यला मिळेल. विचारा ना, का म्हणून.

शेखर : का?

नीलकंठ : खेडोपाडी प्रलोभनं कमी. आहे त्यात समाधान मानायला ही खेडीच शिकवतात. पटतंय तुला, अरुंधती?

[ अरुंधती रागाने आत जाते ]

नीलकंठ : संसारात गोडी आणायला भांडणं लागतात, लटके रुसवे लागतात. ओह्, शी नोज् इट् परफेक्टली वेल. ( हसतो )

शेखर : त्यांनी ऐकावं म्हणूनच की—

नीलकंठ : चोरून ऐकणं आमच्या इथल्या नियमात नाही.

शेखर : पण ऐकू गेलं तर?

नीलकंठ : त्याचा उच्चार करणं नियमात नाही.

शेखर : हे सगळे नियम कुणी आणले?

नीलकंठ : तेच आले आपण होऊन. आले आणि इथंच राहिले. शेखरबाबू, वडील माणसांसारखे असतात हे नियम. त्यांच्या धाकात आणि प्रेमात मोकळेपणी राहावं माणसानं.

शेखर : आणि नियमांचं उल्लंघन झालं तर?

नीलकंठ : तर?....माणसाला नाइलाजानं घराबाहेरचा रस्ता दाखवावा लागतो. आणि मग स्वतःशीच कुढत बसावं लागतं. घराबाहेर जावं लागणाऱ्यापेक्षा बाहेर जा म्हणणाऱ्यालाच शेवटी सोसावं लागतं. खूप सोसावं लागतं. ( गहिवरतो. )

शेखर : ( उठत ) आज शेवटची सभा आहे रात्री. काही लोकांना प्रश्न विचारायचे आहेत, कुणाच्या शंका आहेत—

नीलकंठ : अरुंधती–( आतून 'ओ' येत नाही ) तिला तुमच्याबरोबर जा म्हणणार होतो. तिला तेवढंच बरं वाटलं असतं.

शेखर : येत नसतील तर राहू दे.

नीलकंठ : थांबा. अरुंधती–( दाराशी जातो. आत बघतो. ) अरुंधती—

[ अरुंधती बाहेर येते ]

शेखर : तुम्ही येताय सभेला?

अरुंधती : नाही.

नीलकंठ : का ग? जा ना जरा वेळ.

अरुंधती : नको. ( शेखरला ) रात्री परत केव्हा येताय? जेवायला थांबायचं की—

शेखर : कदाचित खूप उशीर होईल. माझी वाट पाहू नका.

अरुंधती : ( मुद्दाम ) उद्या जायचं लक्षात आहे ना?

शेखर : आहे. ( नीलकंठला ) बरंय, येतो. ( जातो )

[ अरुंधती आत जाऊ लागते ]

नीलकंठ : अरुंधती—

अरुंधती : काय?

नीलकंठ : थांब ना. ( अरुंधती थांबते ) बस की. ( बसते ) शेखरबाबू खुशीत आहेत?

अरुंधती : नसायला काय झालं?

नीलकंठ : तसं नाही. पण इथलं साधं राहणं. ( अरुंधती गप्प ) माझ्या मनातून सभेला जायचं होतं.

अरुंधती : मग का गेला नाहीत?

नीलकंठ : नाही गेलो. तेसुद्धा म्हणाले नाहीत. म्हणाले नाहीत त्याअर्थी साधीशीच सभा असेल.

अरुंधती : हूं.

नीलकंठ : त्यांना मी राहायचा आग्रह केला आणि तुझ्यावर सगळी जबाबदारी टाकली. त्यांना काय हवं-नको पाहायचं, त्यांच्याबरोबर बाहेर जायचं, बोलायचं—

अरुंधती : ( दचकते, पण ) त्यात काय एवढं वाटतं तुम्हांला!

नीलकंठ : मला दवाखान्याच्या, शाळेच्या पायी वेळच नाही झाला फारसा. बाकी आपल्या गावाला त्यांच्या विल्सन अँड ग्रे फर्मचा फायदा होणार हं. लोकांनीही खूप इंटरेस्ट घेतला. नाही म्हटलं तरी शिक्षणाचा संस्कार होतोच.

[ क्षणभर स्तब्धता ]

नीलकंठ : तुला सांगायचंच राहिलं.

अरुंधती : काय ?

नीलकंठ : उद्या सकाळी आपल्याला पुण्याला जायचंय बुन्दूकडे.

अरुंधती : (दचकते) उद्याच ?

नीलकंठ : हो. का ? जमणार नाही ?

अरुंधती : उद्याच जायचं म्हणजे—सगळी तयारी–

नीलकंठ : म्हणजे आत तू तयारीच करत होतीस ना ? तुझी बॅग भरलीय—

अरुंधती : नाही. ती नुसती आवराआवर—

नीलकंठ : मग शेखरबाबूंच्या पाहुणचाराचं का ? अग, बेला आहे, आपला गंगाधर आहे—

अरुंधती : अंहं !

नीलकंठ : शिवाय ते उद्या संध्याकाळीच जाताहेत.

अरुंधती : मला बरं वाटत नाहीए.

नीलकंठ : (हसत) नवरा डॉक्टर आहे, विसरलीस ?

अरुंधती : (चिडत) मी नाही, तुम्हीच विसरता आहात. इथं येऊन एखाद्या गांवढळासारखं राहायचं–

नीलकंठ : (शांतपणेच) ए वेडे, मघाचं गेलं नाही डोक्यातून ?

अरुंधती : ते कधीच जाणार नाही.

नीलकंठ : अरुंधती, सहवासानं वास्तूसुद्धा प्रिय होते. काही दिवसांनी तुला इथं राहायला आवडेल आणि आपलं हे वाढतं सुख माझ्या कर्तृत्वाला वेगळंच तेज देईल. तुझ्या मनातला हा तिरस्कार—

अरुंधती : दर क्षणाला वाढतोच आहे. तुम्ही वाढवता आहात. तो कधीच जाणार नाही.

नीलकंठ : उद्या तुझ्या प्रियकराबरोबर पळून गेलीस तरी जाणार नाही ?

अरुंधती : आँ ?

नीलकंठ : दचकतं ते पाप असतं. नाही तर भीती असते.

अरुंधती : पण–

नीलकंठ : गोष्ट खरी आहे.

अरुंधती : तुम्हांला कुणी– शेखरनं सांगितलं ?

नीलकंठ : पापाला हिंमत नसते म्हणूनच दचकतं ना ते ? त्यानं नाही सांगितलं. मी क्षणभरापूर्वीच अंदाज बांधला आणि तो नेहमीप्रमाणं खरा ठरला. हा वारा वाहतो ना वारा, तो घेऊन येतो सगळे वास. पापानं अलगद जरी पाऊल उचललं तरी त्याच्या पुढल्या टापांचा आवाज मला ऐकू येतो.

अरुंधती : हो. मी त्याच्याबरोबर जाणार आहे. पण तुम्ही म्हणालात तशी पळून नाही.

नीलकंठ : नुसते शब्द ! अर्थाला घाबरून पळालेले शब्द....अर्थाची सावली पडते म्हणून बिचकलेले शब्द....मी वापरलेलाच शब्द योग्य होता. तू त्याच्याबरोबर वेड्यासारखी पळून जाणार आहेस....तुझी आणि त्याची पूर्वीची ओळख असण्याचा संभव मी आधीच ताडला होता. वर्तमानपत्रात त्याचा फोटो आपण एकत्र पाहिला तेव्हा.

अरुंधती : मग तेव्हाच विचारायला का घाबरलात ?

नीलकंठ : माझ्या मनात तुझ्याबद्दल कोणताच संशय नव्हता म्हणून.

अरुंधती : आणखी काय ताडलं होतं तुम्ही ? (नीलकंठ गप्प) आताच सांगून टाका. मागाहून मोठेपणा घेऊन म्हणाल, ते मला आधीच माहीत होतं.

नीलकंठ : मला आधीच माहीत होतं, तू त्याला पत्र लिहून बोलावलंस ते.

अरुंधती : माझं पत्र तुम्ही चोरून वाचलंत.

नीलकंठ : या पवित्र, प्रामाणिक वास्तूत चोरून केलेली कोणतीच गोष्ट टिकत नाही, तुला माहीत आहे. गंगाधरजवळ तू टाकायला दिलेल्या पत्रात एक पाकीट होतं. त्याच्यावर तुझ्या हस्ताक्षरात त्याचा पत्ता होता. तो पत्ता तेवढाच वाचला मी. जो पोस्टमनसुद्धा वाचू शकतो !....मला वाटलं, आपल्या जुन्या परिचिताला तू बोलावलं असशील. तो इथं आला तर तुला तेवढाच विरंगुळा वाटेल. त्याला यायला संकोच वाटू नये म्हणून मीसुद्धा पत्र लिहिलं त्याला. त्यानं यावंच यासाठी. आणि अरुंधती, त्या क्षणीदेखील माझ्या मनात कोणताच संशय नव्हता. तो इथं आला, त्याला मी राहाण्याचा आग्रह केला तो सुद्धा स्वच्छ भावनेनं. तुझ्यावर पूर्ण विश्वास ठेवून. वेड्यासारखा समजत होतो, अनुभवानं माणसांचा अंदाज मला बांधला येतो. त्यानं जरी हात पुढं

केला तरी तू संसाराची, निदान बुन्दूची रेषा: तरी ओलांडणार नाहीस.... त्याच्याबद्दलचा अंदाज बरोबर ठरला. पण तुझ्याबद्दलचा....तुला मी कधीच काही विचारलं नाही, कारण तुझ्या–माझ्यातले नियमच वेगळे आहेत. असामान्य आहेत.

अरुंधती : काही सांगू नका, तुमची माणसं आमच्यावर पाळत ठेवायला होती.

नीलकंठ : अंहं! इथले सामान्य नियम आपण होऊन पाळत ठेवतात माणसांवर. आणि कुणी जरी पाळत ठेवली असली तरी गोष्ट सत्य आहे.

अरुंधती : (ओरडते) हो. हो. झालं समाधान ?

नीलकंठ : हो म्हटल्यानं झालं, ते तू ओरडून जरासं कमी केलंस.

अरुंधती : लग्नाच्या आधी तुमची ही संताची वृत्ती कळली असती, तर मी लग्नच केलं नसतं तुमच्याशी.

नीलकंठ : आणि वेडे, एक दिवशी तू प्रियकराबरोबर पळून जाशील हे आधी कळलं असतं, तर मी तरी लग्न केलं असतं तुझ्याशी ? आणि तू त्याच्याबरोबर पळून गेल्यानंतर काय वाट्याला येईल हे आता कळलं, तर तू जाशील निघून.... ? जाऊ दे अरुंधती. वाद घालण्यात अर्थ नाहीए. मी तुझ्याहून वयानं, अनुभवानं मोठा आहे म्हणून सांगतो. हे जाणं तुला हितावह ठरणार नाही. मी, ही वास्तू, आपला बुन्दू यांना सोडणं वेडेपणाचं, पश्चात्तापाचं ठरेल. घरात बसून बाहेरच्या उन्हाची कल्पना रंगवणं आणि प्रत्यक्षात त्या उन्हात जाऊन उभं राहाणं यात फार फार अंतर असतं.

अरुंधती : म्हणजे तुम्ही मला—

नीलकंठ : मी कोणतीच बळजबरी करणार नाहीए. देह तुझा आहे. मन तुझं आहे. तूच काय ते तुझ्याबद्दल ठरवायचं. शेवटचं सांगतो, तुझी मला गरज आहे. इथंच राहिलीस तर मला आनंद वाटणार आहे. मला शक्ती येणार आहे.

अरुंधती : तुम्ही हे सगळं सोडून मुंबईला येत असाल, तरच मी त्याला पुन्हा नकार देईन.

नीलकंठ : चूक तुझी आणि अटसुद्धा तुझीच ? अंहं ! ते जमायचं नाही.

अरुंधती : मग मलाही इथं राहाणं जमायचं नाही.

नीलकंठ : सुखी हो.

अरुंधती : मला वचन हवंय एक.

नीलकंठ : दिलं.

अरुंधती : पाळलं पाहिजे.

नीलकंठ : वचन देणाऱ्याकडे ते पाळण्याचं दायित्व असतंच. वचन देणं म्हणजे ते पाळणं, मी जाणतो.

अरुंधती : तुम्ही शेखरला याबद्दल अक्षरानंसुद्धा विचारायचं नाही.

नीलकंठ : तुला त्रास होईल, मला कल्पना आहे. म्हणूनच अरुंधती, दिला शब्द मी पाळल्याशिवाय राहाणार नाही. (आत जाता जाता) तुला इथून काही घेऊन जायचं असेल ते घेऊन जा. ते तुझंच आहे सारं.... बुन्दूला काही निरोप ?

[ अरुंधती तशीच उभी. उत्तर देत नाही. ]

— पडदा

डॉ. नीलकंठचे घर. पहिल्या दृश्यानंतर तीन वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. वेळ संध्याकाळची. बेला दारात वाट बघत उभी आहे. बुन्दू खांद्याला पिशवी लावून शाळेतून आला आहे. तो तसाच आत शिरतो, इतक्यात—

बेला : ( अंहं ! चपला तिथं कोपऱ्यात काढून ठेवायच्या. )

[ बुन्दू चपला कोपऱ्यात ठेवतो. ]

बुन्दू : शाळा सुटली. बेलाताई, दूध दे लौकर.
बेला : ( वेड्या, आधी हातपाय धुणं काही आहे ना ? )

[ बुन्दू आत जातो. बेला थांबलेली. बुन्दू पाय धुऊन येईतो बेला खादीचा स्वच्छ पंचा घेऊन उभी. बुन्दू आल्यावर ती त्याचे हातपाय पुसते. पाय नीट धुतले आहेत की नाहीत पाहाते. ]

बुन्दू : दूध—
बेला : ( आधी बाप्पाला नमस्कार. )

[ बुन्दू गणपतीच्या तसबिरीला नमस्कार करतो. ]

बुन्दू : आणखी काही राहिलंय !

बेला : (आता झालं. घे दूध.–) (दुधाचा पेला पुढे करते. बुन्दूचे दूध पिणे झाल्यावर त्याचे तोंड पुसते.)

बेला : (आता कसा शहाणा झाला माझा बाळ.)

बुन्दू : बेलाताई, शाळेत इतकी धमाल आली आज.

बेला : (असं ?)

बुन्दू : अग, मी कविता पाठ करायचीच विसरलो होतो. आमचे वाणीगुरुजी म्हणजे तुला कल्पना नाही. चुकलं की लगेच छम्. (छडी मारल्याचा अभिनय करतो.)

बेला : (अरे देवा ! मग ?)

बुन्दू : मी मग काय केलं ? दुसऱ्या बाकावर बसलो. गुरुजींनी सुरुवात केली कविता पाठ म्हणून घ्यायला. पहिल्या मुलानं म्हटली कविता, मग दुसऱ्यानं.... मी ऐकत होतो आणि पाठ करत होतो. माझ्या आधी नऊ मुलं होती. म्हटलं, तोपर्यंत होईल पाठ कविता. तर काय झालं बेलाताई, चार मुलांच्यानंतर गुरुजींनी एकदम मलाच हाक मारली.

बेला : (मग ?)

बुन्दू : मी राहिलो उभा. माझे पाय (पाय थरथरून दाखवतो) हे असे होत होते. आणि बेलाताई, मी कविता बरोब्बर म्हटली.

बेला : (खरंच ?)

बुन्दू : तुला दाखवू म्हणून ?

वाटते सानुली मंद झुळुक मी व्हावे ।
घेईल ओढ मन तिकडे स्वैर झुकावे ॥
कधी बाजारी तर कधी नदीच्या काठी ।
राईत कधी वा पडक्या वाड्यापाठी ॥

(गुरुजींसारखे विचारतो) 'सानुली' म्हणजे काय ?.... लहान. छोटीशी. (हसतो) बेलाताई, मी सगळीच्या सगळी कविता म्हटली. शब्दार्थ सांगितले. मार्क दहापैकी—

बेला : (बोटांनी दाखवते—दहा.)

बुन्दू : बेलाताई, तू कधीच बोललेली नाहीस का ग ?
बेला : ( नाही. )
बुन्दू : तुला कधीच वाटत नाही बोलावंसं ?
बेला : नाही.
बुन्दू : ए, बंडल मारू नकोस हं. मला तर इतकंसं मिनिटसुद्धा जमणार नाही गप्प बसणं. खरंच.
बेला : ( रात्री झोपल्यावर ! )
बुन्दू : सांगू ? मी स्वप्नात आमच्या वाणीगुरुजींसारखी भाषणं देत असतो. ( नक्कल करतो ) माझ्या बालमित्रांनो, आज मी तुम्हांला आणि एका महत्त्वाच्या गोष्टीसंबंधी आणि चार शब्द आणि सांगणार आहे. ए बेलाताई, गुरुजी सारखं 'आणि.... आणि' काय बोलतात ग ?

[ नीलकंठ दारात उभा. त्याला हसू येत असते ते दाबतो. ]

बेला : ( चला आता बुन्दूबाबा. कपडे बदलायचे आहेत ना ? )
बुन्दू : कपडे बदलायचे ना ? ( बेला हसते ) ए, तुला न बोलता कसं बोलता येतं ?
बेला : ( येतं आपलं. )
बुन्दू : मी बघतो हं तसं. ( काही खुणा करतो ) कळलं ?
बेला : ( अंहं ! )
बुन्दू : मी म्हटलं, बापू येण्याची वेळ झालीय.
बेला : ( आता कळलं ! त्यांना चहा— )
बुन्दू : बरोबर. त्यांना चहा लागेल तो तयार ठेव.
बेला : ( ठेवलाय. )
बुन्दू : ठेवलाय. बरोबर ?
बेला : ( त्याला जवळ घेऊन— बरोबर रे माझ्या राजा. )
नीलकंठ : ( पुढे येत ) आणि मी आलोय.
बुन्दू : अंहं ! न बोलता सगळं कळलं पाहिजे. तुम्ही न बोलता आला असता तरी कळलं असतं.

नीलकंठ : खरंच. आपण उगाचच शब्द फुकट घालवत असतो. शब्दांनी दुसऱ्याला दुखवता येतं, तितकं त्याचं सांत्वन नाही करता येत.

[ बेला आतून चहा आणून देते. नीलकंठ चहाचा घोट घेतो. चव तेवढी चांगली नाही असे पाहून थांबतो. ]

बेला : ( काही बिघडलंय चहात ? )
नीलकंठ : नाही, ठीक आहे. ( पटकन संपवतो. )
बुन्दू : बापू , तुम्ही फार बोलू नये म्हणता, पण आमचे वाणीगुरुजी—
नीलकंठ : अरे, त्यांना शिकवायचं असतं.
बुन्दू : तसं नाही हो. भाषण देताना ना, ते सारखं आणि ... आणि करतात.
नीलकंठ : ती सवय असते एकेकाची.
बुन्दू : अर्थात तरीसुद्धा आमचे गुरुजी आम्हांला चिक्कार आवडतात.(हसतो)
नीलकंठ : काय झालं रे ?
बुन्दू : अंहं ! आम्ही बेलाताईच्या कानात सांगू .
नीलकंठ : बुन्दू , कुणाच्या कानात नाही सांगू .
बुन्दू : का हो ?
नीलकंठ : कानात सांगितलेलं खोटं असलं तरी मनात शिरतं.
बुन्दू : मग सांगू का ? गुरुजींचं नाव वाणीगुरुजी आहे ना, त्यांना आम्ही सगळे आणिगुरुजी म्हणतो. ( हसतो. )
नीलकंठ : अभ्यास काय म्हणतोय ?
बुन्दू : अभ्यास शहाणा आहे. तो काही म्हणत नाही की बोलत नाही. ( बेला-जवळ जातो. ) बापू , पुण्याची शाळा सोडून या शाळेत आलो ना तेव्हा-पासून तीन वर्षे माझा पहिला नंबर आहे. तो सोडून चालायचं नाही मला.
बेला : ( का ? )
नीलकंठ ! का ?
बुन्दू : तुमच्यासारखं डॉक्टर व्हायचं म्हणजे पहिला नंबर काढावा लागतो. ( बेलाकडे बघत ) हां—खायचं काम नाही.
नीलकंठ : डॉक्टर व्हायचं आणि याच गावात राहायचं.
बुन्दू : मग ? पुणं—मुंबई कसली ? बापू , पुण्याच्या शाळेपेक्षा हीच शाळा

आवडते मला.

नीलकंठ : असं ?

बुन्दू : थोडीशीच मुलं. सगळ्यांच्या ओळखीचे गुरुजी. बापू, आम्हांला नावानंच हाका मारतात. छान वाटतं की नाही असं ? तुकाराम ? हजर. महीपती ? हजर. ज्ञानोबा ? हजर.

नीलकंठ : बुन्दू—

बुन्दू : हजर ! पुण्याला म्हणजे साने ? हजर. जोशी ? हजर.

[ गंगाधर येतो. नुसता उभा राहतो. ]

नीलकंठ : गंगाधर ?

बुन्दू : हजर !

गंगाधर : ( गंभीर चेहऱ्याने ) बापू—

नीलकंठ : काय रे ? काय झालं ?

गंगाधर : रिझल्ट आला आत्ता.

बुन्दू : नंबर कितवा आला तुमचा ?

गंगाधर : पेपरात नंबरच नाही आला माझा.

बुन्दू : नंबरच नाही ?

गंगाधर : मी नापास झालो बुन्दू.

बुन्दू : हॅ: ! चांगलं पास व्हायचं—

गंगाधर : ते आपल्या हातात असतं का ? बापू, पंधरा वेळा बसून नापास होणारं कुणी असेल का हो ? मी म्हणतो, पंधरा वेळा बसलो म्हणून तरी ताबडतोब पास करावं की नाही मला बोर्डानं ?

बुन्दू : तुम्हांला किती वेळा बसायचं असतं परीक्षेला ?

गंगाधर : आता तू पास व्हायच्या आधी जरी मी पास झालो ना, तरी ताबडतोब पेढे वाटीन मी. बापू, ही लाखो मुलं कशी पास होतात हो ?

नीलकंठ : गंगाधर, तू एक नाद तरी सोड परीक्षेचा, नाही तर एकदा विषय नक्की ठरवून परीक्षेला बस.

गंगाधर : ते दर वेळी करतो मी. रिझल्ट आला की ताबडतोब—

नीलकंठ : अंहं ! तू सारखे विषय बदलतोस. तसं करू नकोस.

गंगाधर : मग मी ताबडतोब पुन्हा इंग्रजी घेऊ का? त्यातल्या त्यात इंग्रजीत मला बरे मार्क होते....बारा. नाही तर मी शेती विषय घेतला तर?

नीलकंठ : तो विषय आहे का परीक्षेला?

गंगाधर : बघायचं आता. पुढल्या आठवड्यात मुंबईला जातोय तेव्हा चौकशी करीन.

नीलकंठ : पुढल्या आठवड्यात मुंबईला? कशाला?

गंगाधर : आपला ट्रॅक्टर आणण्यासाठी जायचंय ना मला?

नीलकंठ : हं.

गंगाधर : ट्रॅक्टर येईल तर म्हणतोय शेती विषय घ्यावा.

नीलकंठ : तेव्हा टाइपरायटर आणलास तो धूळ खातोय—

गंगाधर : मी नापास झालो आणि ताबडतोब टाइपरायटर मनातून उतरला माझ्या.

नीलकंठ : शिवणाचं यंत्र आणलं—

गंगाधर : नापास झाल्यावर ताबडतोब ते बंडोबा टेलरला दिलं की वापरायला. आता ते धूळ खातंय. कारण बंडोबा धंद्यात नापास आहे. हां, ट्रॅक्टर आपण शेतातच नेणार म्हणजे तो ताबडतोब धूळ खाणार.... बापू, ट्रॅक्टरसाठी चेक, कंपनीचा फॉर्म सगळं ताबडतोब भरून द्यायचंय तुम्हांला.

नीलकंठ : इतकी काय घाई आहे? पुढल्या आठवड्यात जातोएस ना?

गंगाधर : हो. मागाहून मग ताबडतोब अभ्यासाला लागायचं आहे मला.

बुन्दू : तुम्ही किती वर्षं परीक्षेला बसताय?

गंगाधर : साडेसात. माझी तरी परीक्षेला साडेसाती आहे, नाही तर परीक्षेची मला साडेसाती आहे. बापू, पण एक सांगतो. आपले मोहनराव असते ना, तर मी तीन वर्षांपूर्वीच एस्. एस्. सी. झालो असतो ताबडतोब. त्यांचं शिकवणं म्हणजे असं होतं—

बुन्दू : मोहनराव कोण बापू?

नीलकंठ : माझा भाचा. अगदी लहानपणी पाहिलं आहेस त्याला.

बुन्दू : भाचा म्हणजे बहिणीचा मुलगा. हो नं? आम्हांला एक धडा आहे, त्यात सगळी नाती आहेत. आईचा भाऊ–मामा, आईची बहीण–मावशी. बापू, वर्गात मला गुरुजी एकदा हे प्रश्न विचारत होते हं. मी आपला

बरोबर उत्तरं देत होतो, तर महीपती काय म्हणाला माहीत आहे ?
नीलकंठ : अंहं ! नाही माहीत. ( हसतो )
बुन्दू : तो म्हणाला, तुला आईच नाहीए.

[ नीलकंठ आणि बेला एकमेकांकडे बघतात. ]

गंगाधर : काय हल्लीचे विद्यार्थी तरी. बाकी मीसुद्धा अजून हल्लीचाच विद्यार्थी.
बुन्दू : महीपतीचं काय चुकलं हो बापू ? त्यासा वाटलं ते म्हणाला तो. मी लगेच म्हटलं, आई नसली तरी बेळाताई आहे माझी. ती माझं सगळं करते. हो की नाही बेलाताई ?
बेला : ( हो रे राजा )
बुन्दू : आपण कशाला घाबरायचं ?
नीलकंठ : ( विषय बदलण्यासाठी ) गंगाधर, तुला चेक हवाय ना ? आणि हो, तुला आधी मी 'ट्रॅक्टर' कंपनीचं माहितीपत्रक देतो वाचायला. ते नीट बघून ठेव. ( आत जातो. )
गंगाधर : बुन्दू, येणार का मुंबईला ?
बुन्दू : बेलाताई, मी जाऊ का ग ?
बेला : ( मुळीच जाऊ नकोस. )
बुन्दू : बेलाताई नाही म्हणतेय. आणि मलादेखील नाहीच यायचं. मुंबईला काय आहे ?
गंगाधर : तुझी आई आहे ना. बापूंनी परवानगी दिली तर ताबडतोब आपण तिचा पत्ता शोधून काढू.

[ बेला बुन्दूला 'नको' सांगते. आत बघते. ]

बुन्दू : पण नाही म्हटलं ना मी ?
गंगाधर : तुला कधी आठवण येते की नाही तिची ?
बुन्दू : अंहं ! विचारा बेलाताईला. तुम्हांला येते तिची आठवण ?

[ नीलकंठ दारात उभा आहे. ]

गंगाधर : ( बाजूला टेबलावर काचेच्या बाटलीत फुलं ठेवली आहेत ती

दाखवत ) ही फुलं आहेत ना बाटलीतली ? ती तुझ्या आईनं भरली होती. इथं नवीन आल्या तेव्हा. ती पाहिली की मला ताबडतोब ताईंची आठवण होते. ( डोळे टिपतो. ) कशी अजून जशीच्या तशीच छान आहेत ही फुलं.

बुन्दू : पण मला नाही आवडत ती. बेलाताई, तुला आवडतात ?

बेला : ( अंहं ! आपण ती आतच ठेवून देऊ. चल. )

[ बेला बाटली उचलते. आत नेऊ लागते, दाराशी नीलकंठ दिसतो. ]

नीलकंठ : बेला, जिथली गोष्ट तिथंच हवी. ठेव ती बाटली.

[ बेला नीलकंठकडे बघते. बाटली टेबलावर ठेवते. ]

नीलकंठ : गंगाधर, मनातली गोष्टसुद्धा जागेवरच हवी.

गंगाधर : नाही बापू, मी सहजच बुन्दूला विचारलं.

नीलकंठ : काही हरकत नाही रे. तुला वाटलं, तू विचारलंस.

[ इतक्यात दारू पिऊन झिंगलेला छबूराव आत येतो. ]

छबूराव : बेला–

नीलकंठ : तुम्हांला कोण पाहिजे ?

[ बेला बुन्दूचा हात धरून आत पळते. ]

छबूराव : ऐकू नाही आलं ? बेला पाहिजे आहे मला. बेला.

नीलकंठ : तुम्ही कोण ?

छबूराव : विचारणारे तुम्ही कोण ?

नीलकंठ : मी या घराचा मालक. तुम्ही माझ्या घरात आलात म्हणून विचारतोय. तुम्ही कोण ? नाव काय तुमचं ?

छबूराव : छबूराव ! बेला– ( इकडे तिकडे बघतो. ) बेला कुठं गेली ?

नीलकंठ : बेलाशी काय काम आहे तुमचं ?

छबूराव : माझं सगळंच काम आहे तिच्याशी ( हसतो ) हां—

नीलकंठ : हे सभ्य माणसाचं घर आहे.

छबूराव : अरे जा रे सभ्यवाल्या. बेला कुठंय सांग.

नीलकंठ : नाही सांगितलं तर?

छबूराव : मी कोण आहे माहीत आहे तुला?

नीलकंठ : तुझ्यासारखी दारुडी माणसं माझ्या माहितीची नसतात. तू बाहेर हो आधी.

छबूराव : च्यायला. सांगू का? मी बेलाचा नवरा आहे नवरा. पंधरा वर्षांखाली आमचं मॅरेज झालंय.

नीलकंठ : आणि तू आज उगवलास?

छबूराव : वाइफ माझी आहे. मी साला केव्हाही उगवेन. (इकडे तिकडे बघतो.) बेला—(त्याला गंगाधर दिसतो.) आँ? इकडे ये. इकडे ये. तू आप्पाजींचा गंगाराम ना?

गंगाधर : गंगाराम नाही, गंगाधर.

छबूराव : तोच तो. ओळखलंस मला?

गंगाधर : तावडतोब.

छबूराव : मग थोबाड का बंद ठेवलंस? ओपन टु क्लोज?

गंगाधर : दारू प्यालेल्या माणसाशी मी तावडतोब काडीमोड घेतो. काडीमोड माहीत आहे ना?

नीलकंठ : गंगाधर, तू ओळखतोस याला?

गंगाधर : ओळखतो. आमच्याच पलीकडे खोपटं होतं याचं.

छबूराव : बेलाला सामने हजर कर पहिले छूट.

नीलकंठ : या घरात हुकूम माझा.

छबूराव : बेला—

नीलकंठ : तुझ्या हाकेला ती ओ देणार नाही. तिला हाक मारू नकोस तू.

छबूराव : मला अरे-तुरे? मी बाँबेला असतो म्हटलं.

नीलकंठ : तू इंग्लंडला असतास तरी मी असाच बोलणार. घर माझं आहे, इथं हुकूम माझा आहे. समजलं तुला?

छबूराव : पुन्हा अरे-तुरे? मी काय तुझ्या वर्गात होतो?

नीलकंठ : माझ्या वर्गात येण्याची तुझी सात जन्मांत पात्रता नाहीए. आता मी बोलायचा हुकूम देईपर्यंत तोंड बंद....गंगाधर, बेलाला सांग मी

बोलावलंय. न भिता बाहेर ये म्हणावं. छबूराव बोलायला बघतो.) चूप राहा.

[ बेला येते. ]

नीलकंठ : बेला, तू ओळखतेस याला ! खरं सांगायचं. तुला माहीत आहे.

बेला : (हो. मी ओळखते)

नीलकंठ : हा म्हणतोय, तुमचं लग्न झालं होतं.

छबूराव : मॅरेज....मॅरेज....

बेला : (हो.)

नीलकंठ : (छबूरावला) बोल आता.

छबूराव : बेला—

नीलकंठ : आधी माझ्याशी बोलायचं.

छबूराव : मी बेलाला घेऊन जायला आलोय. माझे सगळे साले वांधे झालेत. जेवणखाण करायला, घर सांभाळायला—

नीलकंठ : मुंबईत कुठं राहातोस तू ?

छबूराव : धारावी झोपडपट्टीत.

नीलकंठ : उद्योगधंदा ?

छबूराव : असा काय फिक्स नाय.

नीलकंठ : आणि दहा वर्षांनी तुला बायकोची आठवण झाली ! तू गावात जा. इथली पाच–दहा माणसं गोळा कर. त्यांची खात्री पटवून दे आणि मग ये. बेलाला मी पाठवतो तुझ्याबरोबर.

छबूराव : कसली खात्री ?

नीलकंठ : तू हिला नीट वागवशील, पोसशील याबद्दल.

छबूराव : आयला वाइफ माझी आहे, तिचं मी वाटेल ते करीन. (पुढे होतो.)

गंगाधर : बापू, लोकांची कशाला ! माझीच खात्री पटवून दे म्हणावं.

छाबूराव : गंगाराम—

गंगाधर : तावडतोब चूप. बापू, यांचं लग्न झालं तेव्हा बेला अगदी लहान होती. हा तिला मारझोड करायला लागला. एकदा ह्यानं बेलाच्या बडलांवर सुऱ्याचे वार केले.

छबूराव : मग ? साला आमच्या भांडणात कशाला पडला खालीपिली ?

गंगाधर : चूप....बापू, तो भयानक प्रकार पाहून बेला बेशुद्ध पडली आणि....आणि तेव्हापासून तिची वाचाच गेली. हा कारणीभूत आहे सगळ्याला. याला शिक्षासुद्धा झाली होती. मग गावानं सभा घेतली आणि याला काडीमोड घ्यायचा हुकूम केला.

नीलकंठ : तू काडीमोड घेतली आहेस ना ?

छबूराव : मग काय भीती आहे कुणाची ? मिष्टेक होते माणसाची.

नीलकंठ : आधी बाहेर हो घराच्या.

छबूराव : मी पुन्हा मॅरेज करीन बेलाशी.

नीलकंठ : आधी बाहेर—

छबूराव : (हसतो) अच्छा. तुला ही पोरगी हवीय काय ? तू मॅरेज नाय करणार, हिला तशीच (एकदम पुढे जाऊन बेलाचा हात धरतो.) तू चल माझ्याबरोबर. इथं साली चटक लागलीय तुला. (बेलाला ओढत नेऊ लागतो.)

[ नीलकंठ पुढे जातो. एकदम छबूरावाचा हात धरतो. बेलाला दूर करतो. ]

छबूराव : तुझी वाईफ दुसऱ्याचा हात धरून गेली तेव्हा कुठं गेली होती तुझी पावर ? साला मी दारू खाल्लीय म्हणून पावर दाखवतोस ? आख्खा गाव बोंब मारतोय, बेलाला तू ठेवून घेतलं आहेस म्हणून.

[ गंगाधर छबूरावाची गचांडी धरतो. त्याला बाहेर ढकलतो. क्षणभर कोणी काही बोलत नाही. नीलकंठ अस्वस्थ झालेला. मग— ]

गंगाधर : बापू—

नीलकंठ : अं ?

गंगाधर : आठ दिवस झाले, तुम्हांला सांगायचं म्हणत होतो.

नीलकंठ : काय ?

गंगाधर : हल्ली गावात सगळीकडे हेच बोलताहेत.

नीलकंठ : अं ?

गंगाधर : बेला इथं राहाते—

नीलकंठ : मग तिला काय वाऱ्यावर सोडायची ?

गंगाधर : तसं नाही, पण उगाच लोकांनी आपल्याबद्दल बोलायचं—

नीलकंठ : गंगाधर, तू या घरात वावरतोस. तुला कधी काही वावगं दिसलं ? कणभर तरी संशय घेण्यासारखं ?

गंगाधर : दिसलं असतं तर ताबडतोब जाब नसता विचारला ?

नीलकंठ : मला विचारला असतास ?

गंगाधर : चुकणाऱ्यांत राजा असेल, तर आधी त्याला जाब विचारावा असंच शिकलोय आम्ही तुमच्याकडून.

नीलकंठ : मग गंगाधर, गाव असं बोलताना ऐकलंस तेव्हा का गप्प बसलास ?

गंगाधर : कोण म्हणतो गप्प बसलो ? घसा कोरडा करून सांगितलं मी, पण— ( थांबतो )

नीलकंठ : सांग ना. थांबलास का ?

गंगाधर : शंभर मूर्खांमध्ये एक शहाणा गेला तर तो सगळ्यांत मूर्ख ठरतो ! बापू, आज ताई असत्या घरात, तर कुणाची हिंमत नव्हती असं बोलायची. म्हणून म्हटलं, या सगळ्यापेक्षा बेलाला जायला—

नीलकंठ : ते होणार नाही, मी धैर्यानं तोंड देईन.

गंगाधर : एकट्याचं धैर्य पुरत नाही.

नीलकंठ : एकट्याचं धैर्य सैन्याच्या धैर्यापेक्षा जास्त असतं. फक्त ते स्फटिका-सारखं हवं.

गंगाधर : बापू, ऐकताना हे पटतं हो, पण आजच्या जगात—

नीलकंठ : आजच्या जगात कालच्यासारखी माणसं नाहीत असं कालच्या जगात सुद्धा म्हणत होते. आणि तरीदेखील डोळे दिपवून टाकणारं कर्तृत्व गाजवणारी मोठमोठी माणसं देशादेशांत निपजत होतीच. ( क्षणभराने ) गंगाधर, पण असं व्हायला नको होतं.

गंगाधर : ( नीलकंठ एकदम अस्वस्थ झालेला पाहून ) बापू—

नीलकंठ : असं काहीच व्हायला नको होतं. गंगाधर, तू जा. प्रार्थना झाल्यावर मी दवाखान्यात येतोय. तू काही वाटून घेऊ नकोस. अरे, आयुष्यात इतकं

मिळवलंय आणि घालवलंय मी— ( पुन्हा विचारात पडतो. )

[ गंगाधर हळूच जातो. ]

नीलकंठ : गंगाधर, गावात खरंच का रे.... ( इकडे तिकडे बघतो. कुणीच दिसत नाहीत. मग हाक मारतो ) बुन्दू – ( चेहऱ्यावर स्वस्थता आणण्याचा प्रयत्न करतो. )

[ बेला बुन्दूला घेऊन येते. ]

नीलकंठ : हं....काय बुन्दूजी ! ( हात पुढे करतो. )

बुन्दू : ( त्याची अस्वस्थता ओळखून ) काही नाही....बेलाताई, माझी पुस्तकं, वह्या काढून ठेव. आज खूप अभ्यास दिलाय गुरुजींनी. उद्या शाळेत गेल्यागेल्याच विचारतील.

नीलकंठ : ( बुन्दूचे बोलणे ओळखून ) उद्या रविवार आहे बुन्दू. ( बुन्दू ओशाळतो. ) शाळेच्या काही गमती सांगणार का आम्हांला ?

बुन्दू : अं ! हो सांगतो. सांगतो ना. ( आठवण्याचा प्रयत्न करतो. ) छेः असं विचारलं की काही आठवत नाही, नाही ? बापू, आठवण कशी राहाते हो ?

नीलकंठ : ( स्वतःशीच ) काही गोष्टी जितक्या विसरायला बघाव्यात तितक्या त्या आठवणीत जास्तच खोल जातात. ( क्षणभराने ) बुन्दू, मी उगाच काही तरी बोललो. पण तू शाळेच्या गमती सांगत होतास ना ?

बुन्दू : हो. आज गोष्टीच्या तासाला गुरुजींनी मला एक गोष्ट सांगायला सांगितलं. मी म्हटलं, मला नाही गोष्ट येत. बापू, बेलाताईला बोलता आलं असतं तर छान झालं असतं. तिनं मला आईसारख्या गोष्टी सांगितल्या असत्या छान छान. म्हणजे हं, एक होता राजपुत्र. त्याचं केवढं तरी मोठं राज्य होतं.

नीलकंठ : सुंदर राजवाडा, नोकरमाणसं, ऐटबाज रथ....चिक्कार संपत्ती.

बुन्दू : हं, अशी गोष्ट. बेलाताई, इकडे ये ना गोष्ट ऐकायला....

नीलकंठ : तर तो राजपुत्र खूप खूप आनंदात होता. ( बेला जवळ येऊन बसते ) त्याचं लग्न झालं नव्हतं. मग एक दिवशी दुसऱ्या राजाची एक सुंदर राजकन्या आपल्या वडलांबरोबर फिरत फिरत राजपुत्राच्या राजधानीत आली.

बुन्दू : हं. पुढं ?

नीलकंठ : तिनं राजपुत्राचा राजवाडा पाहिला. नोकरमाणसं, संपत्ती पाहिली, सोन्याचा रथ पाहिला आणि तिला वाटलं, या राजपुत्राशी लग्न करावं.

बुन्दू : पण तिनं अजून राजपुत्राला कुठं पाहिलं होतं ?

नीलकंठ : अं ? नाही, तिनं राजपुत्राला पाहिलंच नव्हतं.

बुन्दू : पण बापू, तो राजपुत्र मनानं खूप चांगला होता ना ?

नीलकंठ : हो. गरिबांबद्दल त्याला प्रेम वाटायचं. त्यांच्यासाठी काही करावंसं त्याला वाटायचं. राजवाड्यात त्याचं मन रमत नव्हतं. त्याला वाटायचं, जंगलात जावं, झोपडीत राहावं,....मीठभाकरी खावी.

बुन्दू : पण राज्यकन्येचं काय ?

नीलकंठ : सांगतो ना. हं....तर राजकन्येचं त्या राजपुत्राशी लग्न झालं, खूप थाटामाटात. राजकन्या खुशीत होती. राजपुत्र कधी तरी तिला म्हणायचा, आपण जंगलात जाऊन राहायचं का ? ती म्हणायची, नको. मग त्यांना एक गोडसा मुलगा झाला. खूप हुशार, खूप शहाणा. दिसायला खूप सुंदर. राजपुत्राला आनंद झाला.

बुन्दू : बापू, त्या मुलाला आपल्या वडलांप्रमाणंच जंगलात राहाणं आवडायचं ?

नीलकंठ : त्यानं कुठं जंगल पाहिलं होतं ? तो तर छोटा होता. पण.... (विचार करून) हं. राजपुत्रानं त्याला जंगलाच्या गोष्टी सांगितल्या होत्या. छोटीशी झोपडी, सारवलेल्या भिंती, सगळीकडे हिरवं हिरवं जंगल. मग राजपुत्रानं ठरवलं, आपण तिघांनी आता जंगलात जाऊन राहायचं. राजवाडा वगैरे सोडून. राजकन्या आधी तयार झाली. तिला वाटलं, जंगलात थोडे दिवस झाले की राजपुत्राला कंटाळा येईल. तो पुन्हा राजवाड्यात येईल. पण राजपुत्र जंगलातच राहिला. त्याला जंगलातच मजा वाटायला लागली.

बुन्दू : आणि मग राजकन्येलासुद्धा जंगल खूप आवडायला लागलं. हो ना ?

नीलकंठ : अं ? नाही....नाही. तिला कधीच आवडलं नाही जंगल. मग बुन्दू, एक दुष्ट दिवस उगवला. कुठल्या तरी देशाचा एक सौदागर घोड्यावर बसून जंगलात आला आणि राजकन्या गेली त्याच्याबरोबर निघून. (गहिवरतो) गेली निघून....खूप लांब.

बुन्दू : आणि तो छोटा मुलगा ? तो नसेल गेला आईबरोबर. जंगलातली गंमत कशी सोडणार तो ?

नीलकंठ : हो नं. तो नाही गेला. त्या राजकन्येनंच नेलं नाही त्याला. एक वर्ष झालं, दोन वर्षं झाली, तीन वर्षं झाली. राजकन्या परत आली नाही. राजपुत्राला तिची आठवण व्हायची, वाईट वाटायचं.

बुन्दू : हे चुकलं हं राजपुत्राचं. आठवण कशाला काढायची त्यानं ?

नीलकंठ : त्याला कधी कधी वाटायचं, आपण आपल्या आवडीप्रमाणं जंगलात आलो. तिला जंगल आवडत नव्हतं ते लक्षातच कसं घेतलं नाही आपण ? प्रत्येकाची आवड वेगळी असते. नाही का ? आणि कधी कधी संध्याकाळी त्याला वाटायचं, आपण तिला राहा म्हटलं नाही याची शिक्षा आपल्या मुलाला भोगावी लागतेय उगाचच.

बुन्दू : मी तिथं असतो ना जंगलात, तर त्या राजपुत्राला सांगितलं असतं, बाबा रे, तू काही वाईट वाटून घेऊ नकोस.

बेला : (अरे, पण त्या छोट्या मुलाचं काय ?)

बुन्दू : छोट्या मुलाचं काय ? त्याला मिळाली असती एखादी बेलाताई ! (बेला त्याचा मुका घेते.) हे काय ग बेलाताई ? गोष्ट ऐकतोय मी तर—

नीलकंठ : बुन्दूजी, प्रार्थनेची वेळ झाली. चला—

[ बुन्दू प्रार्थनेसाठी चटई पसरतो. नीलकंठ आणि बुन्दू प्रार्थनेला बसतात. ]

नीलकंठ : हं. करायची सुरुवात ? (म्हणू लागतो) की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने ।

बुन्दू : थांबा. एक विचारायचं राहिलं.

नीलकंठ : काय ?

बुन्दू : ती राजकन्या निघून गेली, तिचं काय झालं ?

नीलकंठ : अं ?

— काळोख.

शाखा.
२०००८ २८।१०।९३
वि. ०११८०

शेखरचा मुंबईतील अलिशान फ्लॅट. वेळ संध्याकाळची. दार उघडून अरुंधती आणि शेखर येतात. अरुंधती रागावलेली. शेखर नेहमीच्या मूडमध्ये. शेखर दिवा लावतो.

शेखर : (हसतो) तू किती संतापली आहेस ते गाडीत दिसलं नव्हतं. आत्ता दिसलं.

अरुंधती : (कुत्सितपणे) आणखी दिवे लावायचे आहेत का!

शेखर : तू लावलेले पुरतील, मला वाटतं.

अरुंधती : शोफरच्यादेखत तू जे बडबडत होतास—

शेखर : तू मोठी गप्प होतीस की नाही!

अरुंधती : सुरुवात तू केलीस भांडायला.

शेखर : तू मूर्खासारखी वागलीस ना स्टुडिओत, ती सुरुवात होती भांडणाची.

अरुंधती : शोफर आता काय किंमत ठेवील माझी!

शेखर : माझ्याबरोबरच्या स्त्रियांची किंमत तो चांगली जाणतो.

अरुंधती : शेखर, माइंड वेल. मी त्यातली नाहीए.

शेखर : वंडरफुल! अगदी हेच बोलते माझ्याबरोबर येणारी प्रत्येक स्त्री.

अरुंधती : तीन वर्षं मी तुझ्या घरात राहातेय.

शेखर : काही उपकार करत नाही आहेस. मीच उपकार करतोय तुझ्यावर

म्हटलं तर. तुझ्यापायी माझा खर्च वाढलाय. तुझ्या हौशी, चैनी....खेडे-गावातून आलीस. म्हटलं, पहिल्यानं वाटते हौस.

अरुंधती : मी मूळची मुंबईतलीच आहे. घरची चांगली आहे मी.

शेखर : मग जातेस तुझ्या चांगल्या घरी ?

अरुंधती : तुला तेच हवंय आता (शेखर हसतो.) मी पक्कं ओळखलंय. आता तू नवीन नोकरी मिळवली आहेस. ॲड्व्हर्टायझिंग कन्सर्न म्हणजे नव्या नव्या बाहुल्यांना–

शेखर : आज जुनी बाहुली नेली ना तुझी स्टुडिओत ! काय केलंस तू तिथं ?

अरुंधती : तुला पुन्हा सांगते, कांतिलालचं वागणं–

शेखर : (हसतो) मला पटणार नाही, पण सांग. तुला बडबडायची सवय आहे. त्यापेक्षा तुझ्या तिथल्या त्या बेलाला आणलं असतं ना मी मुंबईला–

अरुंधती : शेखर—

शेखर : एक तर मुळीच बडबड नाही. म्हणजे डोकेदुखी नाही. दुसरं–(हसतो)

अरुंधती : कळलं.

शेखर : थँक्यू. तिसरं, आजच्या जाहिरातीत ती खेडवळ बाई म्हणून तुझ्याहून जास्त शोभली असती. इथं असा ट्रॅक्टर उभा. समोर ती ओलेती. तू ओलेती हवीस असं म्हटलं असतं, की बेलानं लगेच सगळे कपडे उतरवून–

अरुंधती : ट्रॅक्टरचा आणि ओलेतीचा संबंधच काय ?

शेशर : हा प्रश्न क्लाएंटचा आहे. ट्रॅक्टरकडे लक्ष जायला त्याला ओलेती बाई हवी होती. तुला तसं करणं भाग होतं. कारण तुला पोसायला मला पैसा लागतो. त्यातला काही भाग तूच कमवायला पाहिजे. आधी मारे आढेवेढे घेतलेस—

अरुंधती : शेवटी ऐकलं ना तुझं ?

शेखर : म्हणूनच ते आढेवेढे हास्यास्पद ठरले !

अरुंधती : त्याचा परिणाम तू पाहिलास. कांतिलालनं मला एकदम मिठी—

शेखर : त्याला आमच्या शास्त्रात ॲप्रिसिएशन अर्थात कौतुक म्हणतात.

अरुंधती : शेखर....शेखर...तो प्रकार तू थंड डोळ्यांनी बघत होतास.

शेखर : तू काही लग्नाची बायको नाहीस माझी.

अरुंधती : पण एके काळी आपलं प्रेम होतं.

शेखर : तू नकार दिलास तेव्हाच ते संपलं आणि राहिला फक्त भोग. अरुंधती, तुला मी इकडे आणलं तुझ्या संसारातून, ते सूड उगवण्यासाठी. लेट् मी बी फ्रँक.

अरुंधती : (दचकून) शेखर, हे तू तेव्हाच सांगितलं असतंस—

शेखर : (हसतो) ट्रॅक्टर खपवण्यासाठी आधी ओलेत्या बाईचं चित्र दाखवायचं असतं.

अरुंधती : आपलं प्रेम आठवून मी आले—

शेखर : अंहं ! तिथं कंटाळा आला म्हणून तू आलीस. तुला असं नटायला, मुरडायला, चैनीत भटकायला मिळत नव्हतं, म्हणून तू आलीस. इथं मुंबईत तुझ्या नवऱ्याबरोबर श्रीमंतीत डुंबत असतीस, तर तुला आपल्या प्रेमाची चुकून कधी आठवण झाली नसती. तुझ्यासारख्या मुली माणसावर नाही प्रेम करत, त्या प्रेम करतात पैशावर. ऐश्वर्यावर. चैनीवर. बोल, खरं आहे की नाही ?

अरुंधती : तू बोलशील ते खरं.

शेखर : अंहं ! तू वागलीस ते खरं.

अरुंधती : तुझ्याबरोबर आले. तू असा प्रेमानं वागत होतास. ते घर सोडल्याचा कधी पश्चात्तापच झाला नाही. आपण हिंडत होतो, फिरत होतो, दिवसभर हसत होतो. हसण्यातच रात्र जागवत होतो.

शेखर : तुमच्या त्या खेडेगावात कधी बोकडांना बळी द्यायचे का ग !

अरुंधती : (न कळून) ह्यांनी ती पद्धत बंद केली होती.

शेखर : तरीच.

अरुंधती : तरीच काय ?

शेखर : हे बळी द्यायचे बोकड असतात ना, त्यांना आधी खूप माजवतात. त्यांना चांगलं खायला प्यायला घालतात. बोकड लेकाचे खूश असतात. त्यांना माहीतच नसतं, आपल्याला बळी देण्यासाठी—

अरुंधती : (संतापून) शेखर, तू इतका दुष्ट असशील हे आधी ठाऊक नव्हतं.

शेखर : पण तू इतकी मूर्ख असशील हे मला पक्कं ठाऊक होतं.

अरुंधती : यापुढं तुमच्या स्टुडिओत मी पाऊल टाकलं तर विचार.

शेखर : नुसतं विचारणार नाही, तुला धक्का मारून बाहेर काढीन. मॉडेल म्हणून तू एकदम थर्ड रेट आहेस. तुला सांगू ? सध्या माझी सांपत्तिक स्थिती तितकीशी उत्तम नाहीए. तुला मॉडेल म्हणून बसवलं की चार पैसे मिळतील—

अरुंधती : त्या कांतिलालसारखा एखादा भेटेल. बोल ना.

शेखर : आणि मॉडेल म्हणून नाही, तरी—(हसतो)

अरुंधती : असा माझा बाजार मांडायला तुला शरम नाही वाटत ?

शेखर : विकण्यासारखी वस्तू असेल तर....नाही.

अरुंधती : तेव्हा तुझ्याशी लग्न केलं असतं तर तू माझं हेच करणार होतास ?

शेखर : यू आर रॉंग, माय बेबी. यू आर रॉंग. अन्यायाचा सूड घेतला जातो आणि न्यायाचा सन्मान केला जातो. अरुंधती, मी कुणी मग वेगळाच झालो असतो. मी फक्त तुझाच असतो आणि तू माझीच असतीस. फक्त माझीच. हे भोगाचं, चैनीचं आयुष्य असं माझ्या घरात धिंगाणा घालायला शिरलं नसतं. (अरुंधती बघत राहते.) अशी जुन्या नजरेनं बघू नकोस अरू. माझ्या मस्तकातला सूड थंड होईल. तुझी दया वाटेल मला. गेल्या दिवसांच्या आठवणींनी मी मूर्खासारखा हळवा होईन. स्टॉप इट. (तिच्या डोळ्यांसमोर हात पालवतो.) देअर यू आर. यू हॅव लॉस्ट इट. अरुंधती, आता तुझ्यावर सूड उगवून तुला–

अरुंधती : रस्त्यावर फेकून द्यायचंय ?

शेखर : रॉंग. रस्त्यावर आणायचंय. पोषणासाठी पैसा मिळवायला मी एक सभ्य रस्ता दाखवतोय तुला. प्रतिष्ठितपणाचा. एखादा श्रीमंत गध्धा इथं येईल तेव्हा तू बिचकू नयेस म्हणून.

अरुंधती : अरे, सगळं विसरून मी तुझ्यामागं धावत आले–

शेखर : अंहं ! माझ्या पैशामागं, मी राहातोय त्या शहरामागं तू धावत आलीस ! तेव्हा पैसेवाला डॉक्टर मिळाला तुला धावायला. (हसतो) तुझ्याहून ती बेला हुशार. मुंबईला येत नाही म्हणाली.

अरुंधती : बेला....बेला ! तीन वर्षांत तू इतक्या वेळा तिचं नाव घेतलं आहेस–

शेखर : हा दोष माझा नाही; तिच्या रूपाचा, तिच्या तारुण्याचा आहे.

कधी तरी वाटतं, तुला इकडे आणलं पण तिकडे फायदा झाला असेल तुझ्या नवऱ्याचा. बेलासारखी पोरगी मिळाली असेल त्याला. पुन्हा मला हवी असलेली पोरगी त्यानं घेतली.

अरुंधती : ते कसेही असले तरी या बाबतीत त्यांची मी खात्री देते.

शेखर : तुला हरकत नाही म्हणा खात्री द्यायला. बायको जुन्या मित्राबरोबर जाईल हे ज्याला कळलं नाही—

अरुंधती : त्यांना सगळं कळलं होतं.

शेखर : आणि तरी त्या मूर्खानं एका अक्षरानंसुद्धा मला विचारलं नाही ?

अरुंधती : मी वचन घेतलं होतं त्यांच्याकडून तसं.

शेखर : एनी वे, दॅट फूल मस्ट बी हॅविंग ब्लडी गुड टाईम विथ् ब्युटिफूल बेला.

अरुंधती : त्यांच्या चारित्र्याबद्दल आता बोललास ना—

शेखर : त्याच्या चारित्र्याचे गोडवे गाण्याआधी तुझं चारित्र्य बघ– ( हसतो ) आय नो इट.... आय नो इट.

[ बेल वाजते. शेखर उठून दार उघडतो. दारात मोहन. मोहनच्या पोषाखात शहरी बदल झालेला. ]

शेखर : एक्सक्यूज मी.... आपल्याला मी ओळखत नाही.

मोहन : अरुंधती आहे ?

अरुंधती : मोहन—

शेखर : नाऊ यू कॅन कम् इन् विथ धिस पासपोर्ट. बसा. बसा. बसा आरामात.

अरुंधती : येरे.... बस. ( मोहन बसतो. ) तुझी ओळख करून देते. हे शेखर. आणि हा मोहन. माझा भाचा.

शेखर : ( कुत्सितपणे ) भाचा का ?

अरुंधती : म्हणजे मी याची मामी.

शेखर : आलं, लक्षात आलं सगळं. मग आता निघावं मी अरुंधती ? ( मोहनला ) निघतोच आहे मी. आपण आरामात—

अरुंधती : तुम्ही बसा ना.

शेखर : नको. मला गेलंच पाहिजे. ( उठतो. दाराशी जातो. ) आपण काय करता मोहनराव ?

मोहन : हल्ली मी ट्रॅक्टर्स फर्ममध्ये चीफ अकाउंटंट म्हणून—

शेखर : ट्रॅक्टर्सच्या कांतिलालना ओळखतो मी. ॲड्व्हरटायझिंग फर्ममध्ये मी आहे. ट्रॅक्टर्सचं वर्क आमच्या फर्मकडे असतं. ( दार उघडत ) वरंय. बी कंफर्टेबल. अरुंधती, मी केव्हा यावं परत ?.... ( हसत ) म्हणजे तुला जेवण्यासाठी—

अरुंधती : केव्हाही या.

[ शेखर धाडकन दार लावून जातो. ]

अरुंधती : कसा आहेस मोहन ?

मोहन : छान आहे.

अरुंधती : नोकरी चांगली मिळालेली दिसतेय ?

मोहन : पण आपल्या शाळेत शिकवण्यासारखी गंमत नाही इथं. सकाळी उठून मोकळ्या हवेत फिरून यायचं. मग तुझ्या हातचा चहा घ्यायचा—

अरुंधती : तुला जरा साखर जास्तच लागायची नाही चहात ?

मोहन : रविवारी कधी शाळेतली मुलं घरी यायची.

अरुंधती : मुलं कसली ती ? चांगली मोठी माणसं होती. तो तंबाखू खाणारा कोण रे ?

मोहन : कोण ?

अरुंधती : तो रे च आणि ज लिहिताना नेहमी चुकायचा तो ? काय त्याचं नाव बघ—

मोहन : ( हसतो. ) जयराम. तू त्याला ‘ चयराम ’ म्हणायचीस.

अरुंधती : अरे, त्याला एकदा मी नाव लिहून दाखवायला सांगितलं, तर त्यानं च– य– रा– म असंच लिहिलं. तेव्हापासून तो चयराम झाला.

मोहन : घराजवळच शाळा होती.

अरुंधती : आतल्या खोलीतून दिसायचा ना मला तुझा वर्ग. काही खायला केलं की मी घरातून खूण करून विचारायची. ( खाण्याची खूण करते. हसते. ) तुझीच सगळी कामं ना ? शाळेची घंटा वाजवायची.

मोहन : पितळेची बेल येईपर्यंत मी घरातली परात घेऊन टण्–टण्–टण्–टण् वाजवायचा पळीनं.

अरुंधती : सुरुवाती–सुरुवातीला किती मजा यायची. एकदा तू जेवत बसलास आणि शाळेची वेळ झाली. आठवतं ?

मोहन : बापूमामा रागावतील म्हणून मी खरकट्या हातांनीच परात वाजवत शाळेत शिरलो. हो ना ?

अरुंधती : सगळ्यात तुझा मजेचा तास म्हणजे रात्री गंगाधरला शिकवणं.

मोहन : बिचाऱ्याच्या डोक्यात काही शिरत नसे. पण विचारलं, गंगाधर, कळलं का रे ? की म्हणायचा—

अरुंधती<br>मोहन : ताबडतोब कळलं.

[ दोघे हसतात. एकदम गंभीर होतात. कुणी काही बोलत नाही. ]

मोहन : (क्षणभराने) तू इकडे कशी आलीस ?

अरुंधती : ठरवलं, आले. यावं लागलं.

[ स्तब्धता ]

अरुंधती : पण आज तू अचानक.... माझा पत्ता कसा कळला ?

मोहन : आमच्या फर्मकडे ॲड्व्हर्टाइझमेंटसाठी फोटो आले होते—

अरुंधती : त्यात माझा फोटो दिसला.

मोहन : हो. तुमच्या एजन्सीला फोन करून तुझा पत्ता विचारला. आज वेळ काढला आणि आलो. तुला भेटायची खूप इच्छा होती. पण तू मुंबईत भेटशील असं– ( थांबतो. )

[ स्तब्धता ]

मोहन : मी नोकरी सोडून परत बापूमामाकडे जातोय. माझं क्षेत्र तेच आहे. इथं सारखा कोंडल्यासारखा असतो मी. परवा आपला गंगाधर अचानक भेटला आणि—

अरुंधती : गंगाधर ? तो कुठं भेटला ?

मोहन : आमच्या ऑफिसात. ट्रॅक्टरची ऑर्डर नोंदवायला आला होता.

अरुंधती : काय म्हणत होता तो ?

मोहन : त्यानं एकदम हाक मारली मला, मोहनराव. पाहिलं तर गंगाधर. त्याला केबिनमध्ये घेऊन गेलो. चहापाणी केलं. खूश झाला.

अरुंधती : एस्. एस्. सी. झाला की नाही ?

मोहन : तेवढंच जमत नाहीए त्याला ताबडतोब. पंधरा वेळा बसलो म्हणाला. अजून पास झाला नाहीए.

अरुंधती : अभ्यास सोडला तर बाकी सगळ्यात लक्ष होतं त्याचं. ( अती उत्सुकतेने ) काय म्हणाला आणखी ?

मोहन : तिकडचं ? ( अरुंधती मान हलवते ) गावात म्हणे खूप सुधारणा झाल्या आहेत. आता एस्. टी. गावात येते, वस्ती वाढलीय. शेतीचं उत्पन्न तर म्हणे इतकं येतं एकेकाला– सगळ्यांनी घरंदारं सुधारून घेतली आहेत. शाळा मोठी झालीय. चार मास्तर आहेत आता शाळेत. लायब्ररी वाढलीय. व्यायामशाळा नवीन झालीय.

अरुंधती : ( उत्सुकता वाढलेली ) आणखी ?

मोहन : म्हणाला, तुमच्यासारखा मास्तर आता शाळेत हवा. गावातला प्रत्येक-जण लिहाय-वाचायला उत्सुक आहे. अशा ठिकाणी जायला चांगले मास्तर सहजासहजी तयार होत नाहीत. गंगाधर केबिनमधून गेला आणि मी अस्वस्थ झालो. डोळ्यांसमोर आपलं छोटंसं गाव, ती भोळीभाबडी माणसं, त्या बुटक्या इमारती, अरुंद रस्ते, लाल मातीच्या पायवाटा आल्या. हिरव्या सावलीतलं गाव मला हाका मारू लागलं. दिला राजीनामा आणि आता तिकडे जायचं ठरवलंय.

[ स्तब्धता ]

अरुंधती : अरेच्या, तुला मी काय घेणार काहीच विचारलं नाही.

मोहन : अंहं ! काही नको. तू भेटलीस, बोलणं झालं, बस्स !

अरुंधती : निदान गूळ-पाणी तरी ? चुकून.... चुकून जुन्या सवयीनं विचारलं. चहा–कॉफी ?

मोहन : अंहं !

[ स्तब्धता ]

अरुंधती : तो कांतिलाल तुझ्याच फर्ममध्ये आहे ना ?
मोहन : अर्धा मालकच आहे.
अरुंधती : वागायला कसा आहे ?
मोहन : तू जपून रहा.
अरुंधती : हो ना ? त्याच्यावरून मघाशी आमचं कडाक्याचं—
मोहन : पण तू या ॲड्व्हर्टाइझमेंटमध्ये—
अरुंधती : इलाज नव्हता मला.
मोहन : पैशासाठी ? ( अरुंधती गप्प ) दुसऱ्या कशासाठी ? ( ती गप्पच ) कुणी तुला बळजबरी करून—
अरुंधती : अं ? नाही नाही. मी सहज विचारलं. खूप आनंदात आहे मी. ( रडणे आवरते. )

[ स्तब्धता ]

मोहन : नाही. तू आनंदात नाहीएस. तू इथं कसल्या तरी सापळ्यात अडकली आहेस. तुला पुन्हा बापूमामांची आठवण येतेय आणि परत जायचा तर धीर होत नाहीए. ( दार उघडल्याचा आवाज होतो. ) लौकर ठरव. तू येतेस का माझ्याबरोबर ?

[ दार उघडले जाते. दारात शेखर. ]

अरुंधती : अं ? नाही. नाही, जमणार नाही.
शेखर : ( मोहनला ) काय मिस्टर ? अजून तुमचा ट्रॅक्टर इथंच ?
मोहन : ( शेखरकडे लक्ष न देता अरुंधतीला ) विचार कर. चार–आठ दिवसांनी मी फोन करीन तुला.
शेखर : ( चिडतो ) मी तुम्हांला विचारतोय.
मोहन : आमचं बोलणं चाललेलं दिसतंय ना ? ( अरुंधतीला ) तू शांतपणं निर्णय घे. ( शेखरला ) बोला आता.
शेखर : मला वाटलं होतं तुम्ही गेला असाल.
मोहन : नाही गेलो. गोष्टी रंगल्या, बसलो बोलत.
शेखर : तुमचं बोलणं ऐकलंय मी.

मोहन : चोरून ऐकणं फार वाईट.

शेखर : स्टॉप इट. तुम्ही अरुंधतीला काय पळवून नेणार आहात ?

मोहन : असली निर्लज्ज गोष्ट सगळ्यांना नाही जमत !

शेखर : मी हाकलल्याशिवाय ती इथून बाहेर पाऊल टाकणार नाही. समजलं ? माझ्या घरात आहे ती. तिचं मी वाटेल ते करू शकतो.

अरुंधती : शेखर—

शेखर : मध्ये बोलू नकोस. मी घरात नसताना आपल्या मित्रांना मिठ्या मारून बसणारी तू—

मोहन : आता असलं एक जरी वाक्य बोललात—

शेखर : मिस्टर, तुम्ही वाघाच्या गुहेत शिरला आहात.

मोहन : नेमबाज शिकारीच वाघाच्या गुहेत शिरण्याचं धाडस करतो. (अरुंधतीकडे बघून ) जातो मी.

अरुंधती : पुन्हा आपली भेट ?

मोहन : आपली भेट एकाच ठिकाणी शक्य आहे आता. तू नक्की ठरव. मी फोन करतो. ( दाराशी जातो ) विसरू नकोस. ताबुतातल्या वाघाला भ्यायचं नसतं. ( जातो )

शेखर : अरुंधती, तुला जायचंय तुझ्या मित्राबरोबर !

अरुंधती : माझा भाचा आहे तो.

शेखर : ही असली नाती मला सांगू नकोस. तुम्ही नेहमी असे चोरून भेटता.

अरुंधती : अरे, आजच प्रथमच—

शेखर : मला हा संशय होताच. पुरुषांच्या रक्ताला चटावते आहेस तू. तुला सवयच आहे ती. तेव्हा मला पत्र पाठवलंस, घर सोडून माझ्याबरोबर आलीस. इथं रान मोकळं मिळालं, नवीन नवीन मित्र जमवलेस. बाई नवऱ्याच्या घरातून पळून येताना नेमकं शील बरोबर घ्यायला विसरते. यू आर अ बीच. डर्टी बीच. नो बेटर दॅन अ प्रॉस्टिट्यूट.

अरुंधती : शेखर—

शेखर : डोन्च्यू बार्क, यू बीच— बेवकूफ, माझ्या मागून येताना तुला तुझ्या कार्ट्याचीसुद्धा आठवण झाली नाही. इथं एवढा बाजार भरवतेस मित्रांचा, आणि आज स्टुडिओत केवढा कांगावा केलास ! तुला नुसतं अंग भिजवा-

यचं होतं. अंगावरचं वस्त्र न् वस्त्र काढून ठेवायला सांगण्याच्या लायकीची आहेस तू !

अरुंधती : ( घाबरते ) शेखर, प्लीज. तशी मी नाहीए रे. तुझ्याबरोबर आले, आपलं प्रेम आठवून. एकमेकांना तेव्हा दिलेले शब्द स्मरून.

शेखर : प्रेम गेलं खड्डयात. तुला एकच सांगतो. तू काय किमतीची आहेस, आता आपल्या दोघांना कळलंय्. शहाणी असशील तर याच भांडवलावर पैसा करू आपण. येस. मी ठरवलंय. ते भांडवल संपायच्या आत. (हसतो) अरुंधती, पूर्वीच्या नोकरीत असताना मी शेतकऱ्यांना सांगायचा, लेको, हंगाम आहे तोपर्यंत काढता येईल तितकं पीक काढा. ( दाराची बेल वाजते. )...वाजू दे. बाहेर कोण आहे माहीत आहे मला.

अरुंधती : तुझा असा डाव आहे ! माझ्यावर आरोप ठेवायचा. मला बदनाम ठरवायचं आणि मग त्याच गोष्टीवर—

शेखर : त्याच गोष्टीवर पैसा मिळवायचा ! ( बेल वाजते ) थांब रे गध्या.

अरुंधती : बाहेर कोण आहे ? ( शेखर हसतो ) सांग ना कोण आहे ?

शेखर : तुझा नवीन दोस्त.

अरुंधती : मोहन ?

शेखर : डॅम इट ! स्वीट हार्ट, थोडासा मेकअप् करून घे. ( हसतो ) मघाशी विस्कटला असेल.

अरुंधती : ( रडवेली होते ) का छळतो आहेस मला ?

शेखर : लोखंडाचे चणे खाल्ल्याशिवाय आजकाल सोनं मिळत नाही. बी रेडी, माय बेबी. सम वन इज वेटिंग फॉर यू. माझ्याबरोबर आलाय तो. हो, मीच आणलंय त्याला.

अरुंधती : कांतिलाल ?

शेखर : कांतिलालचा बाप ! हा मासा गळाला लागला तर कांतिलालचा नंबर यायला फार वेळ लागेल. ( हसतो )

अरुंधती : नाही—नाही—शेखर ! ( बेल वाजते )

शेखर : हा स्टुडिओ नाहीए कांगावा करायला. ( अरुंधती रडू लागते. शेखर तिचे खांदे धरतो. ) रडायचं नाही. हसायचं. रडू आलं की जास्त हसायचं. यू बीच, चाबूक मारून हसायला लावायची शक्ती आहे माझ्याजवळ.

विसरू नकोस. ( ओरडतो ) हास. हास.

[ अरुंधती हसण्याचा प्रयत्न करते. ]

शेखर : अशीच हसत राहा.

[ शेखर दाराशी जातो. दार उघडतो. मायकेल फर्नांडिस आत येतो. मायकेल प्रौढ वयाचा. श्रीमंती पोशाख केलेला. चेहऱ्यावर मद्याचा परिणाम. ]

शेखर : कम् इन, कम् इन, मिस्टर फर्नांडिस. सॉरी टु कीप यू वेटिंग.

मायकेल : मायकेल फॉर यू....चालायचंच्. चांगल्या क्वॉलिटीचा माल हवा, म्हणजे विलंब लागणार.

शेखर : राईट. बसा ना साहेब. ( अरुंधतीला ) बस ना डार्लिंग.

[ अरुंधती शेखरकडे बघत रडू दाबण्याचा प्रयत्न करते. तिघे बसतात. ]

शेखर : काय साहेब, चहापाणी काही घेणार ?

मायकेल : समय कोणता आहे ? चहापाणी करून समयचा इन्सल्ट नाय करायचा. काय बाई ? ( अरुंधती कसनुशी हसते. ) तुमचे फोटो पाहिले मी. एकदम फर्स्ट क्लास. मी तर शेखरला सांगितलं, आमच्या प्रॉडक्टला हीच फिगर हवी. काय शेखर ?

शेखर : राईट्. पण त्यासाठी जरा—

मायकेल : द्रव्य ! बोल ना. द्रव्य–द्रव्य काय ? चेकबुक तुझ्याकडेच ठेवतो साईन करून. ( अरुंधतीला ) आमचे खूप प्रॉडक्टस् आहेत. सगळे स्पेशल. ॲडव्हर्टाइझमेंटमध्ये जेवढी धमाल कराल तुम्ही तेवढी अपूर्ण. बाकी शेखर, फिगर बिगर तर––

शेखर : ती बघालच तुम्ही आता.

मायकेल : कुठं––मिळालं कुठं हे मॉडेल तुला ?

शेखर : मिळालं एका खेड्यात. ( हसतो ) फूक मारली तशी आलं मागून.

मायकेल : तू तर साली सुवर्णाची माईन शोधलीस.

[शेखर अरुंधतीला काही तरी तरी बोल अशी खूण करतो.]

अरुंधती : तुमची जाहिरात म्हणजे कसली आहे ?

मायकेल : आधी फिगर बघू आणि मग सांगू. शेखर, शेखर, समय फुकट जातोय.

शेखर : अरुंधती, समय फुकट जातोय म्हणताहेत साहेब. (मायकेलला) चला, तुम्हाला फ्लॅट दाखवतो माझा.

मायकेल : फ्लॅट राहू दे. शयनगृह दाखव पहिले. बेडरूम. काय ? (टाळी मागतो.)

[ शेखर मायकेलला बेडरूममध्ये नेतो. दार ओढून घेतो. बाहेर येतो. ]

अरुंधती : शेखर, तुझा विचार काय आहे ?

शेखर : तुझं व्यसन पुरं करायचं आणि त्यातूनच पैसा ! तूच म्हणाली होतीस ना ? पैशाशिवाय आजच्या जगात चालत नाही ? आता– (आत जा अशी खूण करतो.)

अरुंधती : मी तयार नाहीए.

शेखर : मग परत जातेस नवऱ्याकडे ? जायचं असेल तर आत्ता या घटकेला चालती हो. आणखी पाप वाढण्याआधी. बोल, जातेस ? तुला जागा आहे आता तिथं ?––ती बेला पोरगी तुला येऊ देईल ? बघ वाटल्यास जाऊन तिकडे. लाथ मिळाली तर मात्र परत येऊ नकोस माझे पाय चाटायला.

अरुंधती : तुला कंटाळा आलाय माझा ?

शेखर : केव्हाच आलाय तो. हाकलायला बघितलं तर तू जायला तयार नव्हतीस. इथंच चिकटून राहिलीस घोरपडीसारखी. कुणा पोरीला दोन घटकेसाठी घरात आणता येत नाही, मौज मजा लुटता येत नाही. तुझी किळस आलीय मला. होतेस चालती आत्ता ? तुझ्यासारख्या शेकडो जणी बाहेर थांबल्या आहेत. माझ्या फ्लॅटचा दरवाजा उघडण्याची वाट बघत. पैशाशिवाय चालत नाही ना आजकाल ? (आत बघत) हा गाढव तुझं कौतुक करतोय त्यावर जाऊ नकोस. तुझ्यापेक्षा एकेक सुंदर मुली....अग, साधी ती बेला तुझ्यापेक्षा ॲट्रॅक्टिव्ह होती.

अरुंधती : तुला मी जायला हवी आहे ?

शेखर : येस. इमिजिएटली. जातेस ? ( दाराशी जातो. दाराच्या मुठीवर हात ठेवतो ) उघडू दार तुला लाथ मारायला ?

अरुंधती : आता जाणार नाही मी. तुझ्याबरोबर इथं आलेय. माझं काय वाटेल ते होऊ दे. पण तुला मी माझा बाजार मांडू देणार नाही.

शेखर : काय करशील तू ?

अरुंधती : त्यावेळी मला सुचेल ते ! तुझ्याबरोबर आलेय ती बाजारात बसायला नाही.

शेखर : मग चालती हो ! गेट आऊट !

अरुंधती : नो. आय ॲम नॉट गोइंग....आय विल् नॉट गो....नेव्हर....आय विल् डाय हिअर, बट.... ( शेखर हसतो. अरुंधतीचे लक्ष बेडरूमच्या दाराकडे वेधतो. )

[ मायकेल टाय वगैरे काढून दारात उभा ]

मायकेल : समय फुकट जातोय. साली डोक्यात किक् आहे तेवढ्यात.... ( अरुंधतीला ) डार्लिंग, चल ना लौकर.

[ शेखर पटकन दिवा घालवतो. हसतो. दार उघडल्याचा आवाज. ]

शेखर : बाय. हॅव अ गुड टाईम.

अरुंधती : ( किंचाळते ) नो. नेव्हर....

— पडदा

नीलकंठचे घर. वेळ संध्याकाळनंतरची. बुन्दू अभ्यास करतोय. गंगाधर अस्वस्थपणे फेऱ्या घालतोय.

बुन्दू : गंगाधरदादा, मला जरा गणित शिकवता का ?

गंगाधर : गणित ! गणित मी केव्हाच सोडलं. गणितात नापास झालो आणि गायन विषय घेतला. आधी आपल्या मारुतीच्या देवळामागं मोकळं मैदान आहे ना, तिथं जाऊन गाणं म्हणून बघितलं आणि मग तो विषय घेतला. (सुस्कारा सोडतो.)

बुन्दू : काय झालं हो ?

गंगाधर : आठवण झाली त्या परीक्षेची ! माझं गाणं ऐकलं परीक्षा घेणाऱ्यानं आणि तावडतोब कोपऱ्यातला तंबोरा उचलून त्यानं माझ्यादेखत भोपळा फोडला. बिचाऱ्याचं केवढं तरी नुकसान झालं.

बुन्दू : म्हणजे तुम्ही मला गणित शिकवणार नाही !

गंगाधर : गणित काय ? मी काहीच शिकवणार नाही. म्हणजे असं आहे बुन्दू, मी नापास होतोय तेवढा पुरे. तुम्ही पास व्हा. (पुन्हा फेऱ्या मारतो.)

बुन्दू : बापू अजून कसे नाही आले ?

गंगाधर : एव्हाना सभा संपायला हवी होती. (आतून बेला येते. तिच्याकडे बघत) बापू भलेपणानं कुणावर उपकार करायला जातात आणि गाव त्यांना जाब विचारतो.

बेला : (बुन्दूजवळ जाते. चला बुन्दूबाबा झोपायला.)

बुन्दू : झोपायला चला ना ?

बेला : (हो)

बुन्दू : मला झोप येत नाहीए.

बेला : (आता अभ्यास पुरे. चल, मी थोपटते तुला.)

बुन्दू : मला खरंच झोप येत नाहीए. आणि तू काय ? तुला गाणंबिणं काहीच म्हणता येत नाही. बाळा जो जो रे बिजोरे.

गंगाधर : त्यांनी तंबोरा आपटून अपमान केला नसता ना माझ्या गाण्याचा, तर मी असं छान गाणं म्हटलं असतं– (गातो) बाळा जो जो रे. अंहं ! प्रॅक्टिस नाही ना आता.

बुन्दू : चल बेलाताई, मला झोप यायला लागली.

[ बेला आणि बुन्दू आत जातात. गंगाधर फेऱ्या घालतो. दाराशी जातो. मग आत बघतो. ]

गंगाधर : झोपलास का रे बुन्दू ?

बुन्दू : (आतून) हो, ताबडतोब झोपलोय.

[ गंगाधर दाराशी जातो. नीलकंठ येतो. खूप अस्वस्थ

गंगाधर : केव्हाची वाट बघतोय. झाली सभा ?

नीलकंठ : झाली. (येऊन खुर्चीवर स्वस्थ बसतो.)

[ स्तब्धता ]

गंगाधर : गर्दी केली असेल लोकांनी ?

नीलकंठ : बेताची.

गंगाधर : खात्री पटली त्यांची ?

नीलकंठ : अं ?.... गंगाधर, न्यायालयातच न्याय मिळतो. तो चवाठ्यावर मिळत नाही. ज्यांना संशय वाटत होता माझ्या वर्तनाचा, ते बोलत होते. ज्यांचा माझ्यावर विश्वास होता, ते तसे गप्पच होते.

गंगाधर : म्हणजे त्यांची संमती धरून चालणार बाकीचे !

नीलकंठ : तेवढं मात्र झालं नाही. लोकांनी माझ्यावर बहिष्कार टाकायचं म्हटलं, तेव्हा त्यांनी विरोध केला.

गंगाधर : पाहिलंत बापू ? आपण समजत होतो, सगळा गाव आपलाच आहे. पण आज काय झालं ? आपलंच चुकतं.

नीलकंठ : नाही गंगाधर, गावाबद्दलचं प्रेम एवढंदेखील कमी झालेलं नाहीए माझं. प्रत्येकाचा स्वतःचा एक न्याय असतो. स्वतःच्या घड्याळासारखा. दोन घड्याळं कधीही जमत नसतात आणि तरीसुद्धा प्रत्येकाला आपलंच घड्याळ बरोबर वाटतं. पण गंगाधर, आज एक समाधान मिळालं. आपले गावकरी– त्यांना सत्याची चाड आहे. सत्य पारखून घ्यायला ते कुणालाही जाब विचारू शकतात. मनाला पटलं नाही, मानवलं नाही की अविचारी-पणानं होकार देत नाहीत.

गंगाधर : पण शेवटी ठरलं काय ?

नीलकंठ : तसं काहीच ठरलं नाही. आणखी आठवडाभराची मुदत घेतली.

गंगाधर : गावानं बहिष्कार टाकला तर ?

नीलकंठ : खात्री पटवून त्यांनी तो मागे घेईपर्यंत इथंच राहिलं पाहिजे.

गंगाधर : ताई असत्या तर आज हा प्रश्न नव्हता.

नीलकंठ : अंहं! बेलाचं रक्षण करायला तिचे वडील नाहीतर आई, भाऊ कुणी असते तर हा प्रश्न नव्हता. आज या क्षणी माझं मन स्वच्छ आहे. ते तसंच राहिलं पाहिजे असं मी सतत म्हणत राहातो.

गंगाधर : बापू, मुक्या माणसाला मन असतं का हो ?

नीलकंठ : म्हणजे ?

गंगाधर : बेलाच्या मनाचासुद्धा असाच विचार करायला हवा.

नीलकंठ : ( दचकून ) गंगाधर—

गंगाधर : मी गावातलाच आहे, बापू. तुमच्यावर प्रेम करणारा, तुमच्या लौकिकाला जपणारा. आम्ही तुमच्या मनाची खात्री देऊ. पण बेलाच्या मनाची ? एखाद्या विलक्षण क्षणाची कशी खात्री द्यावी ?

नीलकंठ : गंगाधर, माझ्या ठिकाणी तू असतास तर ? — सांग मला गंगाधर.

गंगाधर : मी ताईचा शोध घेऊन त्यांना इथं आणलं असतं.

नीलकंठ : स्वतःला केवळ वाचवायचं, आपल्या नावाला काळिमा लागेल तो

केवळ टाळायचा म्हणून ? ज्याला परत आणायचं असतं, त्यानं घर थांब म्हणत असताना ते सोडलं नसतं.

गंगाधर : बापू, माफ करा. मी तुमच्या खाजगी गोष्टीत बोललो.

नीलकंठ : ही एवढीच माझी खाजगी गोष्ट आहे. ही खाजगी गोष्ट सोडून तुला काही उपाय सुचत असेल तर सांग.

गंगाधर : पण बापू, गाव आडून आडून हेच म्हणतोय.

नीलकंठ : मग मलाच पुन्हा विचार केला पाहिजे. मन पूर्णतः शांत, स्वस्थ ठेवून. जा तू गंगाधर.

[ गंगाधर जातो.
नीलकंठ एकटाच विचारात बसलाय. आतून बेला दुधाचा ग्लास घेऊन येते. ती अरुंधतीची साडी नेसली आहे. ]

नीलकंठ : बेला, मला वाटलं होतं, रोजच्यासारखी तू बुन्दूला थोपटता थोपटता निजलीस.

बेला : ( बोलते ) अंहं ! मी जागीच होते तुमची वाट पाहात. असं काय बघताय ? खरंच.

नीलकंठ : बेला—

बेला : माझ्यात आज काय मोठा फरक पडलाय सांगा.

नीलकंठ : सांगू ? काय हरशील ?

बेला : म्हणाल ते.

नीलकंठ : तू अरुंधतीची साडी नेसली आहेस.

बेला : बरोबर.

नीलकंठ : मला भास झाला, अरुंधतीच दूध घेऊन आलीय.

बेला : तो भास विसरा हं आता. मी बेलाच आहे. हं, घ्या दूध. किती थकला आहात.

नीलकंठ : बेला, हा थकवा मनाचा आहे.

बेला : सगळं माहीत आहे मला. आज इतकी वर्षं एकटे आहात—

नीलकंठ : बेला, अरुंधती निघून गेली ना, तेव्हापासून—

बेला : आता कशाला त्यांची आठवण काढता ? तुम्ही त्यांचं नाव घेतलेलं मला मुळीच आवडत नाही. ( त्याच्या हातात ग्लास तसाच आहे. ) आधी दूध घ्या पाहू.

नीलकंठ : किती माझी काळजी घेतेस तू बेला !

बेला : आपल्या माणसासाठी करायलाच हवं.

नीलकंठ : बेला !

बेला : बुन्दूची मी आई झालेय ना ? ( हसते )

नीलकंठ : पण बेला—

बेला : मला स्वतःला फसवायचं नाहीए. तुम्ही माझ्यासाठी—आपल्या माणसासाठी इतकं केलंय, तुमचे उपकार फेडायचे, तर माझ्याजवळ एवढंच आहे. मी अशिक्षित आहे. उपकार करणाऱ्याच्या पायावर आपल्याजवळ आहे ते सगळं वाहायचं इतकंच कळतं मला. बुन्दू मला विचारतो, बेलाताई, तू माझी आई आहेस, म्हणजे बापूंची तू बायको की नाही ? मी त्याला हसून हो म्हणते. सांगते, बापूंना मात्र हे सांगायचं नाही हं. ( जरा रुसव्यात ) पण तुमच्या हे लक्षात आलं नाही ना कधी ? असेच आहात तुम्ही. सांगा ना, कधी हे कळलं होतं तुम्हांला ?

नीलकंठ : हो. कळलं होतं. बेला, कधीच कळलं होतं. पण मी मनाला सारखा बजावत होतो, हे कळलंय, ते स्वतःलादेखील कळू द्यायचं नाही.

बेला : जितके शहाणे आहात, तितकेच वेडे आहात, हं, घ्या आता ( दुधाचा ग्लास त्याच्या तोंडाशी नेते ) आपल्या प्रकृतीकडे लक्ष द्यायचं नाही— ( ग्लास रिकामा झाल्यावर टेबलावर ठेवते, टॉवेलने त्याचे तोंड पुसते ) मी बुन्दूचं असं तोंड पुसलं की तुम्ही निरखून पाहात असता की नाही माझ्याकडे ? ( नीलकंठ हसून होकार दर्शवतो ) असं जरा हसावं माणसानं.

नीलकंठ : ते विसरलो आहे मी. तत्त्व तत्त्व करत राहिलो—

बेला : रात्रभर जागे राहाता. सारखे फेऱ्या मारत राहाता इथं.

नीलकंठ : तू पाहिलं आहेस ?

बेला : मी पाहिलेलं तुम्ही पाहिलं आहे. इतक्या वेळा मनात यायचं माझ्या-

नीलकंठ : काय ?

बेला : उठून तुमचा हात धरावा आणि म्हणावं, ह्या फेऱ्या थांबवा आता. मी

तुमची आहे असं समजा.

नीलकंठ : बेला !

बेला : खरं सांगितलेलं आवडतं ना तुम्हांला ?

नीलकंठ : हो.

बेला : (त्याचा हात धरते) मी असा हात धरला असता तर तुम्ही काय केलं असतंत हो ?

नीलकंठ : (दाराकडे बघत) हात सोड बेला.

बेला : असंच म्हटलं असतंत ना ? (रुसव्याने त्याचा हात लोटते) तुम्हांला मी आवडत नाही. मी शिकलेली नाही. मुकी आहे. मला काही येत नाही की कळत नाही.

नीलकंठ : नाही नाही. बेला, तू खूप हुशार आहेस. तुला सगळं कळतं.

बेला : ते राहू दे. मी तुम्हांला आवडते की नाही, सांगा....सांगा ना ?

नीलकंठ : बेला–

बेला : वाटल्यास नाही म्हणून सांगा.

नीलकंठ : बेला—

बेला : आवडते की नाही, एवढंच सांगा.

नीलकंठ : आवडतेस.

बेला : मनापासून ?

नीलकंठ : अगदी मनापासून.

बेला : आता आणखी एक सांगायचं.

नीलकंठ : काय ?

बेला : तुम्हांला माझ्याबद्दल केव्हा वाटायला लागलं ?

नीलकंठ : खरं सांगू ? आत्ता, या घटकेपासून.

बेला : याच्या आधी कधी ?

नीलकंठ : अंहं !

बेला : आत्ताच वाटायचं कारण ?

नीलकंठ : बेला, आज सभा झाली ना गावाची ? बोलणारे सारखं हेच बोलत होते, माझ्या कानांवर हेच शब्द पडत होते. घरात आपण दोघं असतो. तू बुन्दूला आईसारखी आहेस त्याच्या. आणि मग आपला गंगाधर म्हणाला,

बेलाला कशावरून काही वाटत नसेल तुमच्याबद्दल ? विचारचक्रात हा प्रश्न अडकला. चक्राची गती थांबवली त्यानं.

बेला : गावाला कशाला किंमत द्यायची ?

नीलकंठ : आपण तिथं सुखासमाधानानं राहातो म्हणून.

बेला : तुम्ही मला जवळ केलंत तर गावाला आवडणार नाही ते. हो नं ?

नीलकंठ : मुळीच आवडणार नाही. ( क्षणभराने बेलाचा हात हातात घेतो. ) पण बेला, मी स्वतःचा सुद्धा आहे ना ? गावाचा आहे तसा स्वतःचा आहे. तुझ्याबद्दल ही अचानक उत्पन्न झालेली ओढ....माझ्या, या घराच्या नियमात बसत नाही. नियम शिक्षा फर्मावतील ती मुकाट्यानं स्वीकारावी लागेल.

बेला : तुम्ही घाबरताय शिक्षेला. मी घाबरत नाहीए. मला तुम्ही हवे आहात. माझ्यावरले तुमचे उपकार फेडायचे आहेत मला. बापू—( त्याच्या पायाशी पडते. )

[ नीलकंठ बेलाला उठवतो. दोघे समोरासमोर उभी ]

नीलकंठ : बेला—

[ मोहन दारात उभा आहे. क्षणभराने—]

नीलकंठ : बुन्दू झोपलाय ना ?

बेला : ( लाडात ) हो–

नीलकंठ : नक्की ?

बेला : थांबा. बघून येते. ( आता जाऊ लागते )

नीलकंठ : बेला—

[ बेला आत जाते. नीलकंठ तसाच उभा राहातो.]

मोहन : बापूमामा, मी आलोय.

[ नीलकंठ दचकतो. ]

नीलकंठ : मोहन ? केव्हा—आताच आलास की–

मोहन : झाली दोन मिनिटं ( नीलकंठच्या पाया पडतो. ) बापूमामा, मी इथंच राहणार आहे आता. तुमच्या आधारानं. तुमच्या सावलीत.

नीलकंठ : मोहन, पण माझा आधार, माझी सावली आता....मोहन, तू मघाशीच आलास ? तुला पाहिलं नाही मी.

मोहन : तुम्ही विचारात गढला होता. पुढं आलात तेव्हा हाक मारली. तुम्ही ठीक आहात ना बापूमामा ?

नीलकंठ : अं ? हो. ठीक आहे.

मोहन : गंगाधरकडे उतरलोय. तिथंच सामान ठेवलंय. दुपारी आलो मी इथं.

नीलकंठ : ( गोंधळलेला ) मोहन, तू आलास तेव्हा–

मोहन : आता सारं आयुष्य इथंच काढणार आहे मी. मुंबईला तसं चांगलं बस्तान बसलं होतं. बस्तान बसलं नव्हतं मनाचं. गंगाधर अचानक भेटला आणि मी राजीनामा देऊन टाकला. मुंबईचाच.

नीलकंठ : मोहन— ( अजून गोंधळलेला. आत बघतो. )

मोहन : बापूमामा, मी बेलाशी लग्न करायला तयार आहे. मी याच गावात संसार थाटणार आणि राहणार. आता तुमची परवानगी आहे ना मला ?

नीलकंठ : अं ?

मोहन : तेव्हाची माझी चूक मी दुरुस्त करतोय. बेलाबरोबरच मी सुखी होईन. बापूमामा, माझ्या कानावर गोष्ट आलीय. बेलाला इथं ठेवून घेतल्या-मुळं गावाच्या मनात तुमच्या चारित्र्याबद्दल संशय आलाय.

नीलकंठ : मी—( विचारात पडतो )

मोहन : मी सभेला आलो होतो.

नीलकंठ : मग दिसला नाहीस कुठं ?

मोहन : मी बाहेर खिडकीशी उभा होतो. सभा झाली तसा गंगाधरकडे गेलो. पण तुमचं धैर्य पाहिलं मी आणि—

नीलकंठ : धैर्य ?

मोहन : सभेतलं तुमचं धैर्य पाहून केवढा आदर, अभिमान वाटला तुमचा तेव्हा ! म्हटलं, इथं येऊन तुमचं दर्शन घ्यावं, आपले अपराध पोटात घ्यायला सांगावं.

नीलकंठ : मोहन, मी अत्यंत सामान्य माणूस आहे. सामान्य माणसाचे

अविचारी मोह मलासुद्धा—

मोहन : बापूमामा, बेलाच्या बाबतीत तुम्ही स्वतःचा विचार केलात, स्वतःची तत्त्वं दूर केलीत—(नीलकंठ दचकतो) तरच तुम्ही सामान्य माणूस ठराल.

नीलकंठ : मोहन, तू बोलतोएस ते–

मोहन : अगदी मनापासूनचं आहे. अशा मोहाच्या विचारांचा तुम्हांला जरी वारा लागला—

नीलकंठ : थांब मोहन, तुझं बोलणं मला समजत नाहीए. तू इथं आलास, तेव्हा तुला काही दिसलं ?

मोहन : अंहं ! असं का विचारलंत ?

नीलकंठ : (स्तब्ध राहातो. मग) बेलाला हाक मार.

मोहन : (आत बघतो) बेला बुन्दूच्या उशाशी डोकं ठेवून झोपलीय.

नीलकंड : तिला हाक मार. नाही तर थांब. (हाक मारतो.) बेला– बेला–

[क्षणात बेला आपल्या जुन्या कपड्यांत बाहेर येते. हातात ग्लास. डोळ्यांवर झोप आहे. ती जांभई देते.]

बेला : (मला झोपच लागली.)

नीलकंठ : (ग्लास बघतो) दूध ?

बेला : (तेच सांगतेय, मला डुलकी लागली.)

नीलकंठ : मी...मी आल्याचं कळलं नाही ?

बेला : (नाही)

वीलकंठ : पण मी मघाशीच दूध घेतलं ना ?

बेला : (कुठून घ्याल ? ग्लास तर तसाच आहे. हे घ्या.)

नीलकंठ : (क्षणापूर्वीचा सारा भास होता हे कळून सुस्कारा सोडतो. दूध पितो.) बेला, मोहन आलाय.

बेला : (नमस्ते.)

[मोहन नमस्कार करतो.]

नीलकंठ : मोहन आता इथंच राहाणार आहे गावात.

बेला : (खरंच ? छान झालं.)

मोहन : बेला, मी तुझ्याशी लग्न करायला तयार आहे. आपण या गावात संसार मांडू, सुखानं राहू—

बेला : (आँ!)

नीलकंठ : बेला, तू मोहनशी लग्न करायला तयार आहेस!

नीलकंठ : काय ?

गंगाधर : बेलाचा प्रश्न आपोआप सुटतोय. मोहनराव बेलाशी–

मोहन : राहू दे गंगाधर. ती नाही म्हणाली आहे.

गंगाधर : (चिडून) ती इथंच राहील आणि बापूंच्या जीवाला गावाचा छळ सोसावा लागेल. आणि गावानं का बोलू नये ? जीव लागतो तिथंच जीभ सुटते. आपले बापू स्वच्छ चारित्र्याचे आहेत असं अभिमानानं सांगावंसं वाटतंय प्रत्येकाला. तशी मला खात्री नाहीए का बापूंची ? पण मीदेखील म्हणतो बापू एकटे आहेत घरात. बेलानं इथं राहाणं गैर दिसतं. माणूस आहे, मोह होणार त्याला. मनात मोह शिरला आणि तो ताबडतोब तोडला नाही तर काय होईल ? बेलाला सरळ सांगायचं. बाई ग, तुझ्यामुळं मला लोकांचे बोल ऐकावे लागतात, तू घराबाहेर हो.

नीलकंठ : गंगाधर, तुला एकदा सांगितलं ना ?

गंगाधर : बापू, बेला मोहनरावांसारख्याला नाही म्हणते म्हणजे तिचा विचार काय आहे ? मोहनराव, एखादे वेळी ती बापूंच्या मनावर भुरळ घालायची. बापू, नाही तर तुम्ही ताईंना....पण ते पटत नाहीए तुम्हांला. मी सांगतो म्हणजे मोह ! मनाला मोहाचा स्पर्श होणं म्हणजे पापानं पाऊल उचलणं आहे. बापू, तुमच्याच तोंडून ऐकलंय आम्ही हे.

नीलकंठ : हे पापानं उचललेलं पाऊल माणसाला त्याच्या तत्त्वापासून दूर फेकतं हेसुद्धा मी सांगितलं असेल. (उठतो. आत जातो.)

गंगाधर : मोहनराव, ही बेला नाही का म्हणाली ?

मोहन : तिचं तिला ठाऊक.

गंगाधर : मी विचारू तिला ?

मोहन : नको.

[ इतक्यात नीलकंठ बॅग घेऊन बाहेर येतो. बॅग भरू लागतो. ]

नीलकंठ : मोहाचा स्पर्श होताच तो तोडला पाहिजे. खरंय गंगाधर. मन स्वस्थ केलं की त्यातला गाळ आपोआप खाली बसतो. मन स्वच्छ होतं आणि ते नव्या उमेदीनं उजळून जातं. जगण्याची तत्त्वं ठरवून घेतली

असली की कधीकधी अशा मनःशांतीची आवश्यकता भासते.

मोहन : तुम्ही काय करताय बापू ?

नीलकंठ : मनःशांतीची तयारी. जायची तयारी. दोन–तीन दिवस जाऊन येतो. गंगाधर, आता मोहन आलाय. तू दवाखान्याकडे बघ. दुसऱ्या गोष्टी बघायला तो आहेच मी येईपर्यंत.

गंगाधर : कुठं जाताय ?

नीलकंठ : सांगितलंच पाहिजे ? एका अटीवर सांगेन. त्यानंतर पुढं प्रश्न विचारायचा नाही. मी मुंबईला जातोय.

गंगाधर : मुंबईला ?

नीलकंठ : ताबडतोब प्रश्न विचारलास बघ ! बेलाला सांगायचं बुन्दूकडे लक्ष ठेव. त्याला आता मी मुद्दाम उठवत नाही. (दोघे गोंधळलेले) अंहं ! परत येतोय ना मी.

[ नीलकंठ बाहेर पडताच— ]

—काळोख.

पहिल्या दृश्यानंतर दोन दिवस. वेळ उतरत्या दुपारची. बेला आणि बुन्दू सागरगोटे खेळत आहेत.

बुन्दू : बेलाताई, हे काय ? मला डावच मिळत नाही.

बेला : ( म्हणजे ? )

बुन्दू : तू आऊटच होत नाहीस. ( बेला हसते. ) मध्ये मध्ये तू चुकलं पाहिजेस हं. ( बेला खेळतेच. ) मी काय नुसतं बघत राहायचं ?

[ बेला खेळत असताना बुन्दू वरच्या वर सागरगोटा झेलतो. हसतो. ]

बुन्दू : आता डाव गेला हं तुझा. ( सागरगोटे टाकतो. ) माझी तिरखई चाललीय. ( खेळताना चुकतो. बेला हसते. ) ए, सागरगोटे नकोत आता. आपण–आपण भेंड्या लावायच्या ? पण तुला बोलता येत नाही ना ? शी: मला जाम कंटाळा आलाय. ( हाक मारतो ) गंगाधरदादा—

[ बाहेरून गंगाधर येतो ]

गंगाधर : काय बुन्दू ?

बुन्दू : तुम्ही इथं येऊन बसा ना. मला करमत नाहीए.

गंगाधर : अरे, पण माझा अभ्यास चाललाय ना ? ( बेला हसते. ) तू हसू

नकोस. या फटक्यात ताबडतोब पास होणार आहे मी. मोहनराव आहेत आता मला शिकवायला. ( जाऊ लागतो. )

बुन्दू : तुम्ही जायचं नाही हं. इथं बोलत बसा ना माझ्याशी. उद्या डबल अभ्यास करा.

गंगाधर : बरं बाबा. (बसतो ) हं बोला.

बुन्दू : गंगाधरदादा, बापू केव्हा येणार आहेत ?

गंगाधर : एक-दोन दिवसांत येतील. परवा तर गेलेत.

बुन्दू : कुठं— मुंबईला गेले आहेत ना बेलाताई ? ( बेलाला मुंबईचा उल्लेख आवडत नाही. ती फक्त मान डोलावते. ) मुंबईला कशाला गेले आहेत बापू ?

गंगाधर : देवाला ठाऊक !

बुन्दू : म्हणजे बापूंना ठाऊकच नाहीए ? (गंगाधर हसतो. ) देवाला सगळं ठाऊक असतं, नाही बेलाताई ? बेलाताईला बोलता का येत नाही—

गंगाधर : मी अजून पास का होत नाही ? सगळं त्याला ठाऊक.

बुन्दू : ( कानोसा घेतो ) कुणी तरी आलंय मला वाटतं. बापूच आले असतील.

गंगाधर : अंहं ! मला नाही कुणाची चाहूल लागली.

बुन्दू : आमचे वाणीगुरुजी म्हणतात, आपल्या माणसाची चाहूल आधी ऐकू येते.

[ एव्हाना अरुंधती दारात आलेली. गंगाधरचे लक्ष जाते. तो एकदम उठतो. ]

गंगाधर : बुन्दू, कोण आलं बघ—

बुन्दू : ( आनंदाने, आश्चर्याने ) आई ? तू कशी आलीस एकदम ?

अरुंधती : ( हसत ) आपलं माणूस चाहूल घेत असलं की वाटतं, एकदम जावं. ( त्याला जवळ घेते. )

बुन्दू : पण मी पुण्याहून इकडे आलो, तेव्हा चाहूल घेतली होती, आणि तू नाहीच आलीस.

अरुंधती : ( नर्व्हस होते ) अरे, तेव्हा ना, तेव्हा मी खूप गडबडीत होते.

बुन्दू : कसल्या गडबडीत ?
अरुंधती : ( विषय टाळते ) तुला माझी खूप आठवण यायची ना ?
बुन्दू : छे ! बेलाताई होती की इथं. ती माझं सगळं करते. अगदी तुझ्यासारखं.
अरुंधती : ( बेलाकडे बघत ) बुन्दू , पण खरी आई ती खरी आई. नाही का ?
बुन्दू : देवाला ठाऊक ! ( बेला हसते. अरुंधती आश्चर्याने बघते ) आपल्याला सांगता येत नसलं की ताबडतोब देवाला ठाऊक म्हणायचं. गंगाधरदादासारखं.
अरुंधती : बेला, माझं सामान तिकडे आत ठेव. अंहं ! त्या खोलीत. ( बेला सामान उचलते. )
बुन्दू : ( अरुंधतीच्या जवळून उठतो ) थांब बेलाताई. तू एकटी कशी नेणार हे सगळं ? ( बेलाबरोबर सामान घेऊन आत जातो. )
गंगाधर : दुपारच्या गाडीनं आलात ?
अरुंधती : हो. ( इकडे तिकडे बघते )
गंगाधर : डायरेक्ट मुंबईहून ?
अरुंधती : हो.
गंगाधर : बापू आले आहेत ना बरोबर ?
अरुंधती : नाही.
गंगाधर : म्हणजे ? मला वाटलं होतं ते एकदम मुंबईला गेले, ते तुम्हांला आणायला.
अरुंधती : मुंबईला गेले आहेत ?
गंगाधर : भेटले नाहीत तुम्हांला ते ?
अरुंधती : नाही.

[ बेला आतून गडबडीने येते. बाहेर जाते. ]

अरुंधती : मोहन आलाय ना इथं ?
गंगाधर : हो. माझ्या शिक्षणाची ताबडतोब सोय झाली त्यामुळं.
अरुंधती : ( हसते ) अजून तू—
गंगाधर : हो. वाऱ्या करतोय. ही आता शेवटची वारी. सोळावी. पास झालो की ताबडतोब पंढरपूरच्या वारीबरोबर जाऊन देवाचं दर्शन घेणार आणि

शिक्षण बंद करणार.

अरुंधती : पंधरा वाऱ्या झाल्या तुझ्या ?

गंगाधर : हो. घरी खडूनं रेघा मारून ठेवल्या आहेत भिंतीवर. नाही तर लक्षातसुद्धा राहिलं नसतं. भिंत भरत आलीय. परवा मोहनरावांनी त्या रेघा पाहिल्या आणि विचारलं. मी म्हटलं, ही अज्ञानेश्वरांची भिंत आहे. पास झालो की याच भिंतीवर सर्टिफिकेट लावायचं ताबडतोब.

[ बेला आणि मोहन बाहेरून येतात. ]

मोहन : कशी आहेस मामी ?

अरुंधती : ठीक आहे. ( बेलाकडे बघते. मग मोहनकडे ) बेला आली होती ना सांगायला ?

मोहन : हो.

अरुंधती : अगदी जवळचंच माणूस गेलं होतं सांगायला !

मोहन : नाही. तसं नाही.

अरुंधती : म्हणजे ?

गंगाधर : बेला नाही म्हणाली लग्नाला.

अरुंधती : का ग बेला ? वेडीबिडी की काय तू ?

[ बेला रडवेली होते. आत पळते. ]

अरुंधती : ह्या बेलाच्या डोक्यात हे काय खूळ भरलंय ?

गंगाधर : बघा तुम्हीच. परवा गावात मोठी सभा झाली.

अरुंधती : कशाबद्दल ?

मोहन : बापूंच्या चारित्र्याबद्दल.

गंगाधर : तुम्ही घरात नाही. ही तरणीताठी बेला इथं राहाते. गावाला पसंत नाहीए ते.

अरुंधती : पण तुम्ही घरात वावरणारे. तुम्ही सांगितलं नाहीत गावाला ? हे शुद्ध आहेत, यांच्या हातून कधीच काही चुकणार नाही ?

गंगाधर : सांगितलं ना ताबडतोब. पण गावानं सभा घेतलीच.

अरुंधती : ह्यांच्यावर त्यांनी वाटेल ते घाणेरडे आरोप केले असतील. ह्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवले असतील.

मोहन : तशी सगळ्यांना खात्री आहे बापूंची, पण हे दिसायला बरं नाही हाच त्यांचा मुख्य आक्षेप.

गंगाधर : गावानं बहिष्काराची भाषा सुरू केली. म्हणाले, एक तर बेलाला ताबडतोब बाहेर जायला सांगा, नाहीतर–

अरुंधती : नाहीतर काय ?

गंगाधर : तुम्हांला परत आणा. अर्थात हे आडून बोलणं होतं.

मोहन : बापूमामा पहाडासारखे उभे होते. ते म्हणाले, बेलाला मी असं बाहेर काढणार नाही. माझ्या तत्त्वाविरुद्ध आहे ते.

अरुंधती : आणि...आणि काय म्हणाले ?

मोहन : ज्यांना बेलाच्या रक्षणाची काळजी वाटत असेल त्यांनी माझ्या घरात येऊन राहावं.

अरुंधती : ( नर्व्हस होते ) पण–

गंगाधर : बुन्दूचं बेलाशिवाय चालत नाही. मी बापूंना म्हटलं, तुम्ही वाटेल ते करून ताईंना आणा. तर ते म्हणाले, माझा तो खाजगी प्रश्न आहे. गावानं आठवड्याची मुदत दिलीय. पण हा प्रश्न सोडवायचा कसा ?

अरुंधती : तुम्हांला कुणालाच सुचलं नाही ? यांनासुद्धा नाही सुचलं ? गावात घरदार असणारं, मुलंबाळं, माणसं असणारं ठिकाण असेल तिथं बेलाची व्यवस्था करायची. आपल्या धाकल्याकडे बेलाला ठेवायचं. खर्चासाठी आपण पैसे द्यायचे.

गंगाधर : हो, पण बुन्दू ?

अरुंधती : बुन्दू गेला असता धाकल्याकडे बेलाला भेटायला. त्याला काही चोवीस तास बेलाताई हवी आहे असं नाही, आणि असतं तसं, तरी त्याला बजावायचं. यांच्याच तालमीत तयार झालाय तो. तुम्हांला कुणालाच हा उपाय सुचला नाही ?

गंगाधर : खरंच ताई, ताबडतोब हे सुचायला हवं होतं आम्हांला. चुकलंच आमचं.

अरुंधती : फार चुकलं....फार चुकलं.

मोहन : त्याच रात्री ते मुंबईला गेले. आम्हांला वाटलं, ते गेले तुलाच आणायला.

अरुंधती : चुकामूक झाली असेल. पण तुमच्या एवढ्याशा वाटणाऱ्या चुकीचं प्रायश्चित्त त्यांना मिळालं ना ! त्यांच्या तत्त्वाविरुद्ध त्यांना माझ्याकडे जावं लागलं. त्यांनी का यायचं माझ्याकडे ? दोष माझा होता, अपराध माझा होता. मी यायला हवं त्यांच्याकडे. माझा शोध काढून ते तिकडे जातील आणि....छे ! असं व्हायला नको होतं, गंगाधर.

[ बुन्दू मधल्या दारात उभा राहातो. ]

बुन्दू : गंगाधरदादा— ( इकडे या अशी खूण करतो. )

अरुंधती : काय रे ?

बुन्दू : बेलाताई रडतेय आत.

अरुंधती : काय झालं ?

गंगाधर : मला माहीत आहे सगळं. मी बघून येतो. ( आत जातो. )

[ वरील बोलणे चालू असताना अरुंधती तिथले सामान पूर्वीसारखे लावून ठेवते. इतर आवराआवर करते. मोहन काही तरी विचारणार याची तिला खात्री आहे. ]

मोहन : तेव्हा फोनवर तू इकडे यायचं नाही म्हणालीस आणि आज अचानक कशी आलीस ?

अरुंधती : तू भेटून गेलास त्याच दिवशी त्यानं एकाला घरी आणलं. माझी विक्री करायची होती त्याला. मी संतापले, त्या आलेल्या इसमाच्या डोक्यात फ्लॉवरपॉट मारला मी. त्याला चावले—

मोहन : शेखर आल्यावर चिडला असेल.

अरुंधती : हो. आठदहा दिवस त्याच्या हातचा मार सोसला मी; पण त्याच्या डावाला बळी पडले नाही. ज्या घटकेला वाटलं, यापुढं जगणं अशक्य आहे त्या घटकेला सामान उचललं आणि.... ( एकदम ) मोहन, या पाहिल्यास यातना ? ( पाठीवरचे वळ दाखवते. ) यातला प्रत्येक वळ मला किंचाळून सांगतोय—

[ इतक्यात बाहेरून नीलकंठाची ' बुन्दूजी '— अशी हाक ऐकू येते. मोहन दचकतो. आतून बुन्दू आणि गंगाधर

येतात. अरुंधती सगळ्यांना गप्प राहा अशी खूण करून आत पळते. नीलकंठ येतो. अगदी स्वस्थचित्त. हातात दोन-तीन खोके, बॅग. ]

नीलकंठ : अरे, असे बघत काय उभे राहिलात? मला मदत तर कराल? ( गंगाधर खोके घेतो. बाजूला ठेवतो. मोहन बॅग घेऊन आत जातो. ) थँक्यू. ( बुन्दूला ) हं बुन्दूजी, बोला. माझ्यावर रागावला असशील तू?

बुन्दू : अंहं !

नीलकंठ : थोडासा तरी नक्की रागावला आहेस. जाताना तुला भेटलो नाही—

बुन्दू : उगाच मुंगीएवढा रागावलो.

नीलकंठ : ( इकडे तिकडे झालेली आवराआवर बघून बुन्दूला जवळ घेत ) इकडची काय हकीकत?

बुन्दू : अं? वाः आहे ना. ( गंगाधर डोळे मोठे करतो. )

नीलकंठ : वा रे वा ! सांग....सांग !

बुन्दू : गंगाधरदादाच सांगेल.

गंगाधर : ( गोंधळून ) हं, धाकल्याच्या गाईला पिल्लू झालं, तेच ना?

बुन्दू : पिल्लू नाही, वासरू म्हणायचं.

गंगाधर : कुणी सांगितलं वासरूच म्हणायचं म्हणून?

बुन्धू : गाईनं.

[ सगळे हसतात ]

नीलकंठ : ( नाटकीपणाने ) वाः मोठीच बातमी आहे.

बुन्दू : तुम्ही मुंबईला गेला होता?

नीलकंठ : हो.

गंगाधर : तुम्ही मुंबईला गेलात तेव्हाच मी ओळखलं होतं—( बुन्दू डोळे मोठे करतो ) तुम्ही काही तरी घेऊन येणार.

नीलकंठ : बरं, या खोक्यात काय असेल?

गंगाधर : औषधं.

नीलकंठ : आणखी?

गंगाधर : पुस्तकं.

नीलकंठ : बरोबर! बुन्दू, तुझ्यासाठी मी एक छान पुस्तक आणलंय. 'श्यामची आई.'

गंगाधर : (पटकन) आणखी बी-बियाणं आणलं असेल तुम्ही.

नीलकंठ : हे सगळं विनामूल्य मिळालंय आपल्याला, बरं का? एक मित्र फॉरमॅस्युटिकल कंपनीचा मॅनेजर आहे, त्यानं औषधं दिली. एका प्रकाशक मित्रानं पुस्तकं.

गंगाधर : आणि शेतीवाडीवाल्या दोस्तानं बी-बियाणं.

नीलकंठ : एवढंच चुकलास. मुंबईत कुठली आली शेतवाडी?

गंगाधर : मुंबईत शेतीवाडी नाही? म्हणजे कमालच आहे बॉम्बेची.

नीलकंठ : हे बी-बियाणं दिलंय एका दुकानदार मित्रानं...बेला काय म्हणतेय?

गंगाधर : हो, बापू. बेलाचा प्रश्न सुटला हं. आज अचानक आपल्या (बुन्दू खुणा करतो) आपल्या मोहनरावांना एक कल्पना सुचली. मग सांगतोच.

बुन्दू : बापू, तुम्हांला खरी गंमत सांगायची आहे ना, ती—

गंगाधर : बुन्दू, ती आपली गंमत मग सांगायची. गमती गमतीनं. बापू दमून आले आहेत ना?

[नीलकंठ बुन्दूला खाली ठेवतो. गंगाधर आणि बुन्दू खुणा करतात.]

नीलकंठ : कुठं तरी बाहेर जायचं ठरलं होतं मन स्वस्थ करण्यासाठी. पटकन तोंडातून मुंबई आलं. म्हटलं गेलोच मुंबईला तर या गोष्टी घेऊन येऊ आणि गेलो झालं. दोन दिवसांत मुंबईचा कंटाळा आला. हं! केवढी गर्दी झालीय तिकडे.

गंगाधर : असं हो? मला आपलं वाटलं—(बुन्दू खूण करतो.) बरं, पण मन तरी स्वस्थ झालं का त्या गर्दीत?

नीलकंठ : अरे, प्रवासातच झालं. एस्टीत. खिडकीजवळ जागा मिळाली. बाहेर निसर्ग आनंदात खेळत होता, नाचत होता. त्यानं अशी एक हिरवी-गार शीळ घातली मला—मन कधी शांत झालं कळलंच नाही. बुन्दू, मी आपला सरळ कविताच म्हणायला लागलो....इथं सगळं आलबेल?

गंगाधर : (खुणा चालल्या आहेत) अं ? हो.
नीलकंठ : (मागे न बघताच) कसल्या खुणा चालल्या आहेत बुन्दू ?
बुन्दू : ह्याच आपल्या—
गंगाधर : (बुन्दूला खुणावत) हॅः खुणा-बिणा काही नाहीत.
बुन्दू : नाहीत काय ? आहेत बापू. (गंगाधर पार गोंधळतो.)

[नीलकंठ दोघांना खुणा थांबवा अशी नजरेने सूचना देतो. मग हसतच—]

नीलकंठ : (स्वच्छ आवाजात) अरुंधती—

[गंगाधर, बुन्दू चकित. आतून अरुंधती येते. तीही चकित झालेली.]

नीलकंठ : केव्हा— मघाशीच आली आहेस ना ? (अरुंधती मानेने हो सांगते) या खोलीतल्या वस्तूंनी आल्याबरोबर तुझा स्पर्श झाल्याचं सांगितलं. हे वेडे खाणाखुणा करत बसले होते. कशी आहेस तू अरुंधती ?
अरुंधती : छान. ठीक आहे मी.

[मोहन बाहेर येतो]

नीलकंठ : पण प्रकृती सांगत नाहीए तसं.
अरुंधती : मला वाटलं होतं, मला पाहून तुम्ही चकित व्हाल, तर तुम्ही हाक मारून मलाच चकित केलंत.
नीलकंठ : (हसत) काही गोष्टी आधी जाणण्याचा माझ्यात दोषच आहे. बुन्दूशी गप्पा झाल्या की नाहीत ?
अरुंधती : झाल्या थोड्याशा. तो होता सारखा बेलाताईच्या मागं.
नीलकंठ : तिनं लाडावून ठेवलाय ना त्याला ? तुला पाहून खूश झाला असेल बुन्दू.
अरुंधती : वा ! झाला ना ! झाला.

[बुन्दू नीलकंठच्या मांडीला चिमटा घेतो.]

बेला : ( पण का ? )

नीलकंठ : तू तयार आहेस की नाही, मी विचारणार नाही. तू तिथं राहाणं साऱ्यांच्या सुखाचं आहे.

बेला : ( बुन्दूला जवळ घेत–आणि बुन्दूला करमणार नाही त्याचं काय ? )

अरुंधती : बुन्दूचं ना ? तो येत जाईल की तुला भेटायला.

नीलकंठ : आणि बेला, तू इथं यायचं नाही असं नाहीए.

बेला : ( रडवेली होत, पण मला करमायचं नाही हो तिथं. )

नीलकंठ : बेला, मला कल्पना आहे. पण अनेकदा जवळची माणसं तोडणं भाग पडतं या जगात.

गंगाधर : पण बापू, आता काय हरकत आहे ? ताई घरात आहेत—

नीलकंठ : बेलानं धाकल्याकडेच गेलं पाहिजे. ( बुन्दू रडवेला होतो ) बुन्दू, बेलाताई कुठं निघून जात नाहीए. ती इथं गावातच राहणार आहे. तुला भेटणार आहे ती.

बुन्दू : पण बापू–

नीलकंठ : बुन्दूजी, मी एकदाच ठरवतो. बेलाताईनं धाकल्याकडेच राहायला गेलं पाहिजे. अरे, तुझी खरी आई मुंबईला गेली तेव्हा तुझी मी समजूत घातली आणि तू म्हणालाससुद्धा–बापू, तुम्ही आणि मी दोघंच मित्र म्हणून राहू. आठवतं ? ( बुन्दू मान डोलावतो. ) तीच हिंमत दाखव रे आता. तू हिंमत दाखवलीस की मलासुद्धा हिंमत येते की नाही ? ( बुन्दू होकार देतो. ) अरे, माझ्यामागून तू येतो आहेस, माझ्या पावलांमागं तुझी इवलीशी पावलं वाजताहेत याचा मला किती आनंद होतो ! अनेकदा मनात येतं, एक दिवशी माझ्या आयुष्याचं हे गाणं संपेल आणि त्याचा सूर तुझ्या ओठांवर राहील. तो याच वातावरणात रेंगाळेल.... अहं ! डोळ्यांत पाणी आणत नाहीत तुझ्यासारखी मुलं. जाऊ दे ना बेलाताईला ?

बुन्दू : ( डोळे पुसतो. ) जाऊ दे. तुम्ही आणि मी. आपण दोघंच राहू. बेलाताई, तुला भेटायला मी रोज येत जाईन.

बेला : ( बुन्दू, तूसुद्धा ! बुन्दूला कवटाळते. )

नीलकंठ : गंगाधर, तू धाकल्याकडे जा आणि त्याला सांग. म्हणावं, पोटच्या पोरीसारखी काळजी घे बेलाची. मोहन, गंगाधर, अरुंधतीनं कसा सुवर्णमध्य

नीलकंठ : ए, चिमटा काय काढतोस ?
बुन्दू : बापू, हे काय हो !

[ सगळे हसतात. क्षणभराने एकदम गप्प होतात. बेला आतून चहा घेऊन येते. नीलकंठ चहाचा घोट घेतो. ]

नीलकंठ : चहा तुझ्या हातचा आहे, अरुंधती. एका घोटात तरतरी आली. बुन्दूजी, तू असा चहा करायला शिकलं पाहिजेस. (दुसरा घोट घेतो) याला म्हणतात खरा चहा.
अरुंधती : तुमचा आवाज ऐकला आणि आधण ठेवलं मी.

[ नीलकंठ चहा संपवतो. रिकामा कप बुन्दूजवळ देतो. ]

अरुंधती : गंगाधर आणि मोहननं मला गावातल्या सभेबद्दल सांगितलं.
नीलकंठ : चालायचंच. असं एखादं वादळ आलं की, पालापाचोळा उडून जातो. अंगावरची धूळ उडून झाडं पुन्हा सतेज होतात.
मोहन : बापूमामा, ताईंनी एक चांगली सूचना मांडलीय बेलाबद्दल.
नीलकंठ : असं ? तुला सांगतो मोहन, मुंबईहून परत येताना मला सारखं वाटत होतं, घरी पोचेपर्यंत काही तरी मार्ग मिळेल यातून. अरुंधती, शेवटी स्त्रीसाठी मार्ग शोधायला स्त्रीचीच गरज भासली, नाही ? उगाच नाही मी निःशंक मनानं आलो.
अरुंधती : माझी सूचना तर ऐका. बेलाला धाकल्याकडे राहायला सांगायचं. त्याच्या भरल्या घरात बेला सहज खपेल. तिच्या पालनपोषणाला पैसे लागतील ते आपण द्यायचे. म्हणजे गावाची शंका दूर झाली आणि बेलाच्या रक्षणाची काळजीसुद्धा—
नीलकंठ : शाबास. गंगाधर, हे कसं सुचलं नाही कुणाला ? हां, सुचण्यालासुद्धा जन्मवेळ असते. त्यानं ठरवलेलं असतं, कुणाला आणि केव्हा काय सुचावं ते. अरुंधती, त्यानंच तुला योग्य वेळी पाठवलं इथं बेलासाठी. गावातले ढग आता दूर होतील आणि निर्मळ निळं आकाश पुन्हा एकदा हिरव्यागार गवताला प्रेमानं साद घालायला लागेल. बेला, यापुढं तू धाकल्याकडं राहायला जायचंस.

बेला : (पण का?)

नीलकंठ : तू तयार आहेस की नाही, मी विचारणार नाही. तू तिथं राहाणं साऱ्यांच्या सुखाचं आहे.

बेला : (बुन्दूला जवळ घेत–आणि बुन्दूला करमणार नाही त्याचं काय?)

अरुंधती : बुन्दूचं ना? तो येत जाईल की तुला भेटायला.

नीलकंठ : आणि बेला, तू इथं यायचं नाही असं नाहीए.

बेला : (रडवेली होत, पण मला करमायचं नाही हो तिथं.)

नीलकंठ : बेला, मला कल्पना आहे. पण अनेकदा जवळची माणसं तोडणं भाग पडतं या जगात.

गंगाधर : पण बापू, आता काय हरकत आहे? ताई घरात आहेत—

नीलकंठ : बेलानं धाकल्याकडेच गेलं पाहिजे. (बुन्दू रडवेला होतो) बुन्दू, बेलाताई कुठं निघून जात नाहीए. ती इथं गावातच राहणार आहे. तुला भेटणार आहे ती.

बुन्दू : पण बापू–

नीलकंठ : बुन्दूजी, मी एकदाच ठरवतो. बेलाताईनं धाकल्याकडेच राहायला गेलं पाहिजे. अरे, तुझी खरी आई मुंबईला गेली तेव्हा तुझी मी समजूत घातली आणि तू म्हणालाससुद्धा–बापू, तुम्ही आणि मी दोघंच मित्र म्हणून राहू. आठवतं? (बुन्दू मान डोलावतो.) तीच हिंमत दाखव रे आता. तू हिंमत दाखवलीस की मलासुद्धा हिंमत येते की नाही? (बुन्दू होकार देतो.) अरे, माझ्यामागून तू येतो आहेस, माझ्या पावलांमागं तुझी इवलीशी पावलं वाजताहेत याचा मला किती आनंद होतो! अनेकदा मनात येतं, एक दिवशी माझ्या आयुष्याचं हे गाणं संपेल आणि त्याचा सूर तुझ्या ओठांवर राहील. तो याच वातावरणात रेंगाळेल.... अंहं! डोळ्यांत पाणी आणत नाहीत तुझ्यासारखी मुलं. जाऊ दे ना बेलाताईला?

बुन्दू : (डोळे पुसतो.) जाऊ दे. तुम्ही आणि मी. आपण दोघंच राहू. बेलाताई, तुला भेटायला मी रोज येत जाईन.

बेला : (बुन्दू, तूसुद्धा? बुन्दूला कवटाळते.)

नीलकंठ : गंगाधर, तू धाकल्याकडे जा आणि त्याला सांग. म्हणावं, पोटच्या पोरीसारखी काळजी घे बेलाची. मोहन, गंगाधर, अरुंधतीनं कसा सुवर्णमध्य

शोधून काढला, नाही ?

गंगाधर : खरं तर मला हे ताबडतोब सुचायला हवं होतं. आता निदान ताबडतोब धाकल्याकडे जातो. ( जायला निघतो ) मोहनराव, तुम्ही येताय माझ्याबरोबर ?

मोहन : नको. मी थांबतो जरा. बापू, मला तुमच्याशी काही बोलायचं आहे. ( अरुंधतीकडे बघतो. )

नीलकंठ : नंतर.

[ मोहन गंगाधरबरोबर जायला वळतो. ]

बेला : ( थांबा गंगाधर, मी पण निघते. बापू–अरुंधतीच्या पाया पडते–निघते मी. )

[ तिघे दारात जातात. ]

बुन्दू : ( आवेगाने ) बेबीताई ! ( पुढे दाराशी जातो. )

नीलकंठ : बुन्दू, तिच्याकडे उद्या जा वाटल्यास. आतापासून सवय कर एकटं राहाण्याची.

[ नीलकंठ बोलत असतानाच बुन्दू एकदम थांबतो. रडू आवरत झटकन आत जातो. नीलकंठ आणि अरुंधती उरतात. दोघे एकमेकांकडे बघतात. अरुंधती हसते. ]

अरुंधती : मुंबईला गेला होता ?

नीलकंठ : हो.

अरुंधती : गंगाधर म्हणाला मला.

नीलकंठ : हं—

अरुंधती : मला वाटलंच होतं, एक दिवशी तुम्ही मला बोलवायला याल.

नीलकंठ : असं म्हणाला गंगाधर ? मी तुला बोलवायला नव्हतो गेलो मुंबईला.

अरुंधती : आता पुरे हं.

नीलकंठ : अरुंधती, मी खरं तेच सांगितलं. मी नको म्हणत असताना तू हे घर सोडून गेलीस, त्या दिवशीच माझ्या लेखी तुझा विषय संपला होता.

अरुंधती : मोहनलासुद्धा वाटलं होतं—

नीलकंठ : दुसऱ्याला वाटणं आणि आपण असणं यात बहुधा अंतरच असतं.

[ स्तब्धता ]

अरुंधती : बेलाला काही दिवस जरा जड जाईल.

नीलकंठ : तिला नेहमीच जड जाईल. या घराचा लळा होता तिला.

अरुंधती : मला पटकन् सुचली ही कल्पना. ती धाकल्याकडे राहिली—

नीलकंठ : अरुंधती, बेलाला कुणा भल्या माणसाच्या घरी ठेवावी हाच निश्चय करून मी आलो होतो. तू म्हणालीस आणि माझ्या निश्चयाला बळकटी आली. मी हे फक्त बोललो नाही. कारण परिणाम तोच होता. आपल्या माणसाचं सुख बघण्याचं श्रेय घेण्याचा नव्हता. आणि असं श्रेय घ्यायचंही नसतं.

[ स्तब्धता ]

अरुंधती : आणि आता ती इथं राहिली असती तरी—

नीलकंठ : माझा ठरलेला निश्चय मी बदलत नाही. तसा तो बदलावा लागत नाही. कारण निश्चय करण्याआधी सहस्र वेळा विचार करण्याचं वळण लावून घेतलंय मी स्वतःला. तू आली नसतीस तरी आज रात्री बेला गावानं भल्या ठरवलेल्या घरातच वस्तीला असती.

[ क्षणभराने ]

अरुंधती : बुन्दूला फार वाईट वाटलं.

नीलकंठ : मलासुद्धा वाईट वाटलं. या घराशीच गट्टी जमली होती तिची. प्रत्येक माणसाशी, प्रत्येक वस्तूशी.

[ स्तब्धता ]

अरुंधती : मी परत आलेली पाहून तुम्हांला आश्चर्य—

नीलकंठ : नाही वाटलं. अरुंधती, अविचारी गोष्टींची पावलं पुढं पडत असली तरी त्या पावलांच्या खुणा परतीच्या दिशेच्याच असतात...हां, तू आजच

येशील हे मात्र ठाऊक नव्हतं मला.

[ क्षणभराने ]

अरुंधती : मी आल्याचा तुम्हांला आनंद नाही झाला ?
नीलकंठ : ह्याच प्रश्न मी स्वतःला विचारत आहे.
अरुंधती : उत्तर ?
नीलकंठ : अजून मिळालं नाहीए.

( स्तब्धता. अरुंधती आत जायला वळते. )

अरुंधती : रात्री जेवणार आहात ना ?
नीलकंठ : का ?
अरुंधती : म्हणजे तसा स्वयंपाक करायला—
नीलकंठ : नको. जरा थांब ना इथंच.

[ स्तब्धता ]

नीलकंठ : तुला जाऊन आज साडेतीन वर्षं झाली.
अरुंधती : हो.
नीलकंठ : या कालावधीत तुला–
अरुंधती : खूप आठवण झाली इथली.
नीलकंठ : अंहं ! आठवणीचं विचारत नाहीए. या कालावधीत तुला काय अनुभव आले ते विचारतोय. तुला हवं असलेलं सुख, पाहिजे असलेली सोबत पुरेपूर मिळाली ? तुझ्या प्रियकरानं तुझ्यावर प्रेमाचा वर्षाव–
अरुंधती : नाही....नाही. तसं काही झालं नाही. मी अनुभव घेतला तो चांगला नव्हता, वाईट होता. पश्चात्ताप करायला लावणारा.
नीलकंठ : तू घर सोडण्यापूर्वी मी हीच शंका मांडली होती.
अरुंधती : माझं चुकलं. फार चुकलं. मी त्याच्याबरोबर जायला नको होतं. त्याच्या शब्दावर विश्वास ठेवायला नको होता.
नीलकंठ : शब्द हे पानांसारखे असतात झाडांच्या. पानं जितकी जास्त तितकी अर्थाची फळं थोडी.

अरुंधती : मला फसवलं त्यानं. माझा सूड घ्यायचा होता त्याला.

नीलकंठ : म्हणून परत आलीस !

[ स्तब्धता ]

नीलकंठ : अरुंधती, तेव्हा तू ऐकायला हवं होतंस माझं.

अरुंधती : हो. मी गेले आणि इथं तुमच्या चारित्र्यावर लोकांनी शिंतोडे उडवले.

नीलकंठ : माझ्या म्हणण्याचा तो उद्देश नव्हता. तू गेली नसतीस तर घरच्या समाधानानं मला अधिक बळ आलं असतं. गावात कष्ट करताना अधिक हुरूप वाटला असता. मी आयुष्याची ठरविलेली दिशा भराभर उजळत गेली असती. नाही म्हटलं तरी तू मला मनानं पांगळं केलंस.

अरुंधती : यापुढं तुमचं ऐकायचं ठरवलं आहे मी.

नीलकंठ : खरंच ?

अरुंधती : खरंच. अगदी खरं. तुमचा प्रत्येक शब्द मी आनंदानं ऐकणार आहे. त्याप्रमाणं वागणार आहे. इथून बाहेर पडल्यावर कळलं, मी मूर्ख, अगदी मूर्ख आहे.

नीलकंठ : ( हसतो ) एका आश्रमात गुरुजी आपल्या शिष्याला सांगत होते, बाहेर जाऊन माथ्यावरच्या मोकळ्या आभाळाकडे तासभर जरी पाहात राहिलं, तरी आपल्याला सत्याचं दर्शन होतं. शिष्य तसाच बाहेर गेला आश्रमाच्या आणि तासभर धो धो कोसळणाऱ्या पावसात उभा राहिला. वर आभाळाकडे बघत. मग काही वेळानं परत येऊन गुरुजींना म्हणाला, 'गुरुजी, मी तासभर मूर्खासारखा भिजत राहिलो पावसात, पण सत्याचं काही दर्शन झालं नाही मला.' गुरुजी म्हणाले, 'अरे, आपण मूर्ख आहोत हे सत्य तरी कळलं ना ?'

[ स्तब्धता ]

नीलकंठ : अरुंधती, माझं तू ऐकणार आहेस असं म्हणालीस.

अरुंधती : हो. मी वचन देते तसं. ( नीलकंठ शांतपणे तिच्याकडे पाहतो. ) वचन देणाऱ्याकडे ते पाळण्याचं दायित्व असतंच. वचन देणं म्हणजे ते

पाळणं मी जाणते.

नीलकंठ : अरुंधती, मग ऐक. तू आलीस तशी परत निघून जा.

अरुंधती : आँ ?

नीलकंठ : माझं तू ऐकणार आहेस. तू परत निघून जा. या घरात तुला आता स्थान नाहीए. तू गेलीस त्याच क्षणी सारा जिव्हाळा संपला होता. तू उगाच परत आलीस. निश्चिती होती तरीसुद्धा मी सारखा म्हणत होतो, तू परत येऊ नयेस आणि परत येऊन माझ्या तोंडून जा असं ऐकू नयेस. तुझा तसा जय आणि माझा असा पराजय मला अधिक प्रिय होता. पण तू आलीस आणि माझ्या पराजयाचा पराजय केलास. तू— तू माझा, माझ्या संसाराचा, माझ्या तत्त्वांचा अपमान केलास. आयुष्यात माझी एवढीच खाजगी गोष्ट होती. जिथं जाब विचारणारा माझा मीच आहे. तत्त्वं वगैरे दूर सारून एका अति–सामान्यानं आपल्यापुरता घेतलेला हा निर्णय आहे.

अरुंधती : पण हा सूड आहे हो—

नीलकंठ : प्रियकराला सूड घ्यायला परवानगी दिलीस ! हा सूड ? मला तो सूड वाटत नाहीए पण तो असूही शकेल. ही मी तुला दिलेली शिक्षासुद्धा असेल. अरुंधती, माझ्यावर झालेला अन्याय न्यायासाठी कंठशोष करत होता, मला शिक्षा द्या म्हणून विनवत होता. पण माणसाला शिक्षा द्यायचा अधिकार माणसाला नाहीचए. तो अधिकार आहे फक्त त्याचा. पण गुन्हे इतके वाढताहेत, प्रत्येक ठिकाणी त्याला लक्षच देता येत नाही. आणि मग माणूसच माणसाला शिक्षा देतो. अधिकाराविना दिलेल्या अशा शिक्षेबद्दल त्या शिक्षा देणाऱ्या माणसाला पुन्हा शिक्षा आहेच. मनस्तापाची. देहान्त मनस्तापाची ती शिक्षा मी आनंदानं भोगणार आहे.

अरुंधती : मी....मी इथं राहायचं नाही ?

नीलकंठ : नाही.

अरुंधती : मग कुठं जाऊ मी ?

नीलकंड : जगाच्या नकाशात माझं घर म्हणजे एक सूक्ष्म ठिपका आहे. त्या ठिपक्यावर कशाला विसंबावं ?

अरुंधती : मला आता कुठं आसरा नाहीए हो.

नीलकंठ : म्हणून परत आलीस ! या घराच्या ओढीनं आली नाहीस की

बुन्दूच्या ओढीनं आली नाहीस....अंहं ! उगाच खोटं बोलण्याचं पाप माथी घेऊ नकोस. साडेतीन वर्षांनी येते आहेस याचा बोध हाच आहे. तू कुठं आसरा घ्यावास हा तुझा प्रश्न आहे.

अरुंधती : तुम्हांला माझी गरज नाहीए ?

नीलकंठ : होती. अरुंधती, तेव्हा गरज होती. आता तुझ्याशिवाय राहाण्याची सवय झालीय मला आणि बुन्दूलादेखील.

अरुंधती : पण बुन्दूला मी हवी आहे. हक्काची आई असताना—

नीलकंठ : साडेतीन वर्षं तशीच काढली आहेत त्यानं. पण हवं असेल तर विचारून बघ त्याला.

अरुंधती : तो हो म्हणाला तर ?

नीलकंठ : त्याच्या कमकुवतपणाबद्दल खेद होईल मला !

अरुंधती : पण तुम्ही परवानगी द्याल ?

नीलकंठ : आधी त्याला विचारून तर बघ.

[ अरुंधती दाराशी जाते. ]

अरुंधती : बुन्दू—

बुन्दू : ( आतून ) काय ?

अरुंधती : जरा बाहेर येतोस ?

बुन्दू : ( आतूनच ) कशाला ?

अरुंधती : ( नीलकंठला ) तुम्ही त्याला काही खाणाखुणा करायच्या नाहीत.

नीलकंठ : तसली सवय नाहीए मला.

अरुंधती : नाही म्हटलं तरी तो तुमच्याकडे पाहील.

नीलकंठ : मी आत जातो. ( मुद्दाम ) तो बाहेर आल्यानंतर. ( हाक मारतो ) बुन्दूजी, बाहेर ये बेटा.

[ बुन्दू बाहेर येतो. नीलकंठ त्याच्याकडे न बघता आत जातो. ]

अरुंधती : बुन्दू—

बुन्दू : काय ?

अरुंधती : जवळ ये ना माझ्या.

बुन्दू : (जवळ जातो) काय ?

अरुंधती : बुन्दूराजा, बेलाताईला मी जायला सांगितलं म्हणून रागवला आहेस ?

बुन्दू : हो.

अरुंधती : अरे, पण आता मी आहे ना तुला ?

बुन्दू : तू काय ? तू निघून जाशील मुंबईला. मग बुन्दूराजा नाही आणि काही नाही तुला.

अरुंधती : तसं नाही रे राजा.

बुन्दू : खोटं !

अरुंधती : आता एकच सांग. मी इथं राहू का जाऊ ?

बुन्दू : सांगू ? बापूंना विचार. ते म्हणतील तसं कर.

अरुंधती : ते जा म्हणाले आहेत रे.

बुन्दू : मग जा.

अरुंधती : आणि इथं घरात ?

बुन्दू : मी आणि बापू. राहू दोघंच. मी बेलाताईला रोज दोनदा भेटायला जात जाईन.

अरुंधती : (बुन्दूला कवटाळत) बुन्दू, बुन्दूराजा—

बुन्दू : तू जा आता. आमची प्रार्थनेची वेळ झालीय. बापूंना उशीर आवडत नाही.

(अरुंधती त्याला सोडते) थांब, तुझं सामान आणून देतो. (आत जातो.)

[क्षणभराने बुन्दू बाहेर येतो. अरुंधतीजवळ तिची बॅग देतो. मागे वळून न बघता प्रार्थनेला बसण्यासाठी चटई पसरतो.]

बुन्दू : (हाक मारतो) बापू, प्रार्थनेला येताय ना ? बापू—

[नीलकंठ बाहेर येतो. तो आणि अरुंधती क्षणभर एकमेकांकडे बघतात. अरुंधती बाहेर जाऊ लागते. बुन्दू आणि नीलकंठ चटईवर बसतात.]

बुन्दू : करायची सुरुवात ?....

[ नीलकंठ यांत्रिकपणे हात जोडतो. ]

बुन्दू : ( प्रार्थना म्हणू लागतो )

की घेतले व्रत न हे अम्ही अंधतेने ।
लब्ध प्रकाश इतिहास निसर्ग माने ॥

( थांबतो ) बापू—तुम्ही म्हणताय ना माझ्याबरोबर ?
नीलकंठ : ( गहिवरतो ) नाही बुन्दूजी, आज मनच लागत नाहीए रे.

[ नीलकंठ बुन्दूच्या खांद्यावर डोके टेकतो.
डोळ्यांतून अश्रू ओघळतात. ]

— पडदा

म. ग्रं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. २०००८ नों. दि. २८।१०।९३
वि. ४।२५

IRBK-0120008

IRBK-0120008